Presented to the Deccan Vernacular Translation Society on 23rd March 1901 by the Hindu Union Club of Kolhapur — Sent by the publisher — Author said to be dead, leaving no wife nor children; his father in law said to be alive. [signature] Secy.

गिलच्यांचा सूड

अर्थात्

पानिपतचा मोबदला.

हें नाटक

'दि हिंदु यूनियन क्लब' कोल्हापूर

करितां

त्यांतील एका सभासदानें

लिहिलें, तें

हरि शिवराम नातू

यांनीं,

कोल्हापूर येथें 'श्रीसमर्थप्रसाद' छापखान्यांत छापवून

प्रसिद्ध केलें.

सन १९०० इसवी.

किंमत ०१२ आणे.

कैलासवासी

श्रीमंत जयसिंगराव घाटगे

ऊर्फ

आबासाहेब कागलकर

सर्जेराव वजारत माआब संस्थान कागल,

रीजंट इन्कौन्सिल कोल्हापूर,

यांचें

आत्यंतिक प्रजावात्सल्य व देशहितबुद्धि

मनांत आणून त्यांचें

स्मारक

ह्मणून हें पुस्तक कर्त्यानें अति प्रेमपुरःसर

अर्पण केलें आहे.

प्रस्तावना.

सुज्ञ वाचक—

एकोणिसाव्या शतकांत ऐतिहासिक नाटक लिहिणारांचा उद्देश—मागील इतिहासप्रसिद्ध पुरुषांचें सर्वस्वी अनुकरण करा असें सांगण्याचा केव्हांही नसून, फक्त आपल्या पूर्वजांनीं कोणकोणतीं स्तुत्य अगर निंद्य कृत्यें केलीं व त्यामुळें समाजावर कसकसे बरेवाईट प्रसंग ओढवले एवढें दाखविणें हा असतो.

गेल्या तीन शतकांत महाराष्ट्रांत ज्या ज्या उलाढाली झाल्या, त्या सर्व स्वतंत्रतेकरितां झाल्या. सतराव्या शतकांत छत्रपति शिवाजी व राजाराम महाराजांनीं स्वातंत्र्यासाठींच खटपट केली; अठराव्या शतकांत पेशव्यांनीं तिच्यासाठींच अलौकिक कृत्यें केलीं. आपल्या पूर्वजांनीं समशेरीवर स्वातंत्र्य मिळवलें, कारण त्यावेळचे प्रतिस्पर्धी अडदांड होते. समशेरीवांचून न्याय होण्यास त्यावेळीं दुसरें साधनच नव्हतें. अडदांडपणाचा काळ आतां गेला. तो फिरून केव्हांही हिंदुस्थानाला न येवो.

सध्या आपण ब्रिटिश साम्राज्याचे छायेखालीं आहोंत. हे प्रभू परके आहेत; परंतु ते न्यायशीलता हें आपल्या वर्तनाचें आदितत्व समजतात व तसें त्यांनीं उघडपणें जाहीरही केलें आहे. या न्यायशीलतेचा राष्ट्रीयसभा फायदा करून घेऊं पहात आहे, व तिच्या प्रयत्नानें श्वेतद्वीपाप्रमाणें येथेंही सौराज्याचा सोन्याचा काळ पुढें मागें खचित येईल.

प्रस्तुत भागाच्या खरेपणाबद्दल सर्वांप्रमाणें खुद्द कर्त्यासही शंकाच आहे; भाग बखरींत सांपडतो–इतिहासांत असणाऱ्या गोष्टी बखरींत नाहींत; व बखरींतल्या इतिहासांत नाहींत असे कांहीं भाग आहेत. खऱ्याखोट्याचा निर्णय इतिहासपटूंनीं करावा. भाग खरा असेल तर त्यावेळच्या धामधुमीचें

हें चित्र समजावें; संशयात्मक असल्यास, पानपतनंतरच्या शूर महाराष्ट्र पिढीच्या विचारांचें हें एक प्रदर्शन आहे. मिळालेला ऐतिहासिक भाग मुख्य धरून कथानकाला सुरसता येण्यापुरते (नाटककारानें करणें उचित ते) फेरफार केले आहेत.

रघुनाथराव दादा बोलूनचालून अडदांड गडी–अडदांडाचें वर्णन करतांना भाषाही तशी घालणें भाग आहे. (मात्र दादाप्रमाणें कर्त्याला कुणाचा सूड घेण्याचा नाहीं. अगर सूड घ्यायला संमतीही द्यायची नाहीं). जर्मनीसारखीं सुशिक्षित राष्ट्रें सुद्धां जर ‘ सूड ’ घेण्याबद्दल खुळीं होतात, –तर दादासारखा तापट व भोळसर प्राणी आपल्या देशबांधवांची–व भाऊसाहेब, विश्वासराव यांची कत्तल ऐकून सूड घेण्याच्या कल्पनेनें प्रत्यक्ष खुळा व्हावा यांत आश्चर्य नाहीं, व खुळ्याला योग्य अशी भाषा वापरली तर ग्रंथकर्ताही दोषी नाहीं.

प्रयोगाचे सोईकरितां रंगावृत्ति वेगळी केली आहे.

नाटक क्लबकरितां लिहिलें, स्वीकारणें सभासदांच्या मर्जीवर आहे.

अखेर या पुस्तकाची हस्तलिखित प्रत ज्या विद्वान्, कायदेपंडित, नाट्यकलाभिज्ञ मंडळींनीं वाचून दुरुस्तीचीं स्थळें दाखविलीं, व ज्यांनीं छापण्याला येणारी मुख्य नड भागविली; तसेंच ‘ श्रीसमर्थप्रसाद ’ छापखान्याचे म्यानेजर (ज्यांनीं योग्य सवलतीनें व अल्प मुदतींत पुस्तक छापवून दिलें) त्यांचा मी अत्यंत आभारी आहे.

शुद्धलेखन, पुनरुक्ति, अप्रौढ विचार व हेतूचा विपर्यास करणारे शब्द इत्यादि दोषाबद्दल क्षमा होईल अशी आशा धरून हा प्रस्तावना लेख पुरा करितों.

कोल्हापूर,
विजयादशमी, १८२२
ता० ३१।१०।१९००.

VASUDEO NARAYAN,
AUTHOR.
पुस्तककर्ता.

नाटकांतील पात्रें.

पुरुष.

१	श्री० रावपंडित पंतप्रधान नानासाहेब.	पेशवे.
२	श्री० रघुनाथराव दादासाहेब.	नायक.
३	नाना फडणवीस.	पेशव्यांचे मुत्सद्दी.
४	विठ्ठल शिवदेव विंचूरकर.	पेशव्यांचे सरदार.
५	राजेबहादर.	
६	सुभेदार मल्हारराव होळकर.	
७	महादजी शिंदे.	
८	अहंमदशहा अबदाली.	अफगाण बादशहा.
९	नजीबखान.	अहंमदशहाकडील सरदार.
१०	नबाब सुजाउद्दौला.	

स्त्रिया.

११	गोपिकाबाई.	श्री० नानासाहेबांचें कुटुंब.
१२	पार्वतीबाई.	श्री० भाऊसाहेबांचें कुटुंब.
१३	लक्ष्मीबाई.	श्री० विश्वासरावांचें कुटुंब.
१४	मर्झीना.	नजीबखानानें पकडून आणलेली स्त्री.

शिवाय सरदार; वकील; काजी; भालदार; नोकर; सैनिक; बादशहा वगैरे.

श्रीगजानन प्रसन्न.

गिलच्यांचा सूड

अर्थात्

पानिपतचा मोबदला.

अंक १ ला.

प्रवेश १ ला.

स्थळ—बऱ्हाणपूरच्या छावणीनजीकचें मैदान.

पात्रें—मल्हारराव होळकर (पानिपतांत कामास आलेल्या महाराष्ट्र-वीरांचे कबिले घेऊन मागें फिरलेले); पार्वतीबाई व लक्ष्मीबाई.

पार्वती०—नाहीं, तुह्मीं कांहीं जरी ह्मटलंत, आपला जीव जरी माझ्यापुढं तोडून ठेवलात, तरी अशानं कांहीं माझी खात्री केव्हांही व्हावयाची नाहीं. सुभेदार-काका, खरं सांगा हो; तुमच्यापुढं मी पदर पसरते, तुमच्या पाया पडते, तुमच्यापुढं—

मल्हारराव—आईसाहेब, वयानं मोठा असलो, तरी मानानं मी आपल्यापुढं केर आहे. हा मल्हारी आपला बंदा नोकर-गुलाम आहे.

दया करा. असं करून मला विनाकारण पापांत पाडूं नका. आपल्यापुढं नाक घासण्याचा माझा मान आहे. असले शब्द—

पा०—कसले शब्द, काका, तो काळ गेला. आपलं लेकरूं नरडीला नख देऊन मारण्याची आईला इच्छा; सख्या भावंडांना एकमेकांच्या रक्ताची चटक; बापाला मुलाचा अंत्यविधी करण्याची हौस; धन्याला रसातळाला पोंचवून, त्याच्या सर्वस्वावर वर्चस्व स्थापन करण्याची नोकरांची हाव; स्वामिभक्ताचा सेवाचोर राजनिष्ठाचा राजद्रोही; काका, जगांत प्रत्येक सजीव--निर्जीव वस्तुचं असं रूपांतर होऊं लागलं; सारंच उलट, मग मी आपल्यापुढं हात जोडले, नाक घासलं--तर त्यांत वावगं काय?

म०—(स्वगत) अरेरे!--भवानी शंकरानं गिळलेलं हलाहलसुद्धां इतकं झोंबत नसेल; पण हे शब्द माझ्या अंतःकरणांतल्या जखमेला झोंबून पाणी--पाणी करतात,पण काय, मी बोलूं काय, मला बोलायला जागा नाहीं!

पा०—काका--कसला हो विचार करतां? मला सांगा हो--खरंच कां पण स्वारी दिल्लीला गेली, का विश्वासाच्या--

म०—खरंच, ते, श्रीमंत--

पा०—नाहीं, नाहीं हो नाहीं, तुह्मीं आपल्या मनाच्या अगदीं उलट बोलण्याच्या खटपटींत आहांत, तुमचा शब्द चांगला उमटत नाहीं, तुमच्या चित्तवृत्तींत चलबिचल दिसते, तुह्मी सांगत नाहीं, पण तुह्माला माहित असलेली दुष्ट वार्ता, तुमच्या चेहऱ्यावर--मला चांगली लिहिलेली दिसते, तुमच्या मनांत उडालेल्या गोंधळाचं प्रतिबिंब, तुमच्या पाण्यानं भरलेल्या डोळ्यांत मला चांगलं स्वच्छ दिसतय. काका, एकदां काय तो सोक्षमोक्ष होऊंद्या हो.

म०—आईसाहेब, माझ्या चेहऱ्यांत जर कांहीं विपरीत दिसत असेल, तर तें आपण ह्मणतां तशा विपरीत वार्तेबद्दल खास नव्हे. जो मल्हारी, आपल्या धन्याकडं, शत्रूचीं शिरं–त्यांचा सरंजाम–त्यांचीं निशाणं हिरावून घेऊन जात असे, तोच आज–आपल्या धन्यांच्या विधवा–(चपापतो.)

पा०—हाय! कांहीं ह्मणा, तर मग मी सुद्धां त्यांत आहेच. काका, तुमच्यानं जर उघड सांगवत नसेल, तुमच्या मनाला–तुमच्या धन्यांच्या विधवा झालेल्या स्त्रियांबद्दल जर खरं दुःख होत असेल, या लंगड्या, आंधळ्या, गाईंची जर तुह्माला खरी कींव येत असेल, तर नवऱ्यावांचून, मुलावांचून, त्यांच्या घरांत–त्यांच्या वाड्यांत–नव्हे–आतां यापुढं त्या कसाईखान्यांत त्यांना ढकलून देण्यापेक्षां पुष्कळ लढायांत जय मिळवून--लाखो शत्रूंचं रक्त प्यायलेल्या, पण या प्रसंगीं म्यानांतून बाहेर न काढलेल्या तरवारीनं, आमची दावण लावून, तुह्मीच आमच्या माना सपासप कां उतराना? आणि तुह्मी तरी रक्ताला लाचावलेल्या आपल्या तरवारीला–भरपंक्तींतून काढून अजून उपाशीं कां ठेवतां? आमचं रक्तमांस तिला पोटभर खाऊं घाला. कां तिचा नाहक श्राप घेतां! (मल्हाररावांच्या हातांतून तलवार गळून पडते.) अहो पण आतां परत जाऊन बसायचं कुठं, बोलायचं कुणाशीं, करायचं काय? आह्मी पुढं येऊं–हंसूं--बोलूं तर अपशकून, कशाला शिवूं तर विटाळ, अपशकून–विटाळ–अपवित्रता–घाण–सारी घाण झालीहो काका आमच्या जन्माची!

म०—आईसाहेब, थोडा विवेक–जरा विचार–आणि मी ह्मणतों काय हें तरी आधी नीट ऐकून घ्या. तुमच्यावर खरोखर प्रसंग—

लक्ष्मी—आणि काका, माझ्यावर मात्र तो प्रसंग–पण तो प्रसंग येऊं देण्यापेक्षां तुह्मीं आपल्या तरवारीनं माझ्या जन्माची अपवित्रता कां हो

काढून टाकीत नाहीं? काका, माझ्याबद्दल तर तुह्मीं मुळींच दिरंगाई करूं नका. माझ्यासारख्या मुलींना असला जन्म घालविण्यांत फार यातना आहेत हो. थोडी ध्यानांत गोष्ट आणा, काका, माझ्यासारख्या मुली दु:खानं रडत असल्या, तर जगाला त्या दु:खाश्रूंत प्रेम चकाकलेलं दिसतं—त्यांच्या उदास चेहऱ्यावर--जगाला बारीक हंसल्याचा भास होतो, त्यांच्या साध्या बोलण्याचं जगाला मोठं गहन पडतं, त्यांच्या शुद्ध वर्तनांत, चालण्यांत, पाहण्यांत, साऱ्या कृतींत अनंत दृष्टीनं जगाला त्यांच्या दुर्दैवानं सारं उलट दिसत बरं —

म०—बाळ, पण जग तुझ्यापुढं येईल कशाला, तुला तुझा वाडा, तुझी दौलत:–

ल०—छे! छे! काका, तें स्मशान, ते कोळसे बरं यापुढं मला आतां. काका, आतां तो वाडा--ती दौलत मला घेऊन काय करावयाची आहे बरं. पाण्यांतून काढलेल्या माशाला किनाऱ्यावर मोत्याच्या राशींत, केशर कस्तुरीच्या ढिगांत जरी टाकलं, तरी त्याला तें काय होय. रत्नखचीत देवालयांत देव नाहीं, संगमरवरी दगडाच्या, चांदिसोन्याच्या पाहिऱ्याच्या विहिरींत पाण्याचा एक थेंब नाहीं—कामधेनुसारखी उत्तम कपिला गाय, पण तिला दुध नाहीं, तर काय किंमत? काका, प्रेमसूत्रांत ओवलेला तो मंगळमणी जोंपर्यंत गळ्यांत चमकतो आहे, तोंपर्यंतच इतर भूषणांची शोभा--तो गळून पडला, ह्मणजे हिऱ्यांचे चंद्रहार, रत्नांच्या माळा, मोत्यांचे सर--तावडतोब नागिणी होतात, त्या मण्याच्या प्रभेचा स्राव जोंपर्यंत शालुशेल्यावर होत असतो तोंपर्यंत ते आंगाला मऊ लुशलुशीत लागतात; नाहीं तर, तावडतोब तेच खरबडीत काटेरी साली होतात. काका, त्या मंगल सूर्याचीं किरणं जोंपर्यंत पडतात तोंपर्यंतच बायकांचा मुखचंद्र सतेज, तीं नाहींतशीं झालीं, कीं लगेंच तोच काजळाचा गोळा बनतो! काका, प्रेमाची—ममतेची खूण--फक्त प्रेमानं--ममतेनंच जाणावी!

म०—बायानो (चपापून लक्ष्मीस उद्देशून) बाळ--मला तुझ्या अंतर्यामांत पेटलेल्या अग्नीच्या ज्वाळा चांगल्या जाणवतात. तुझ्यासारख्या मुलींची नवऱ्यावांचून होणारी स्थिति--मी जाणतों. पण या ईश्वरी घाल्यापुढं कुणाचा इलाज आहे? येऊं नये पण दुर्दैवानं वखत आला!

ल०—काका, दुर्दैव—पण आमचा अन्याय तरी कोणचा हो? आह्मी दुर्दैवी—ह्मणून आमची प्रत्येकाला अनास्था—आमच्याबद्दल प्रत्येकाची अपूज्य बुद्धि--आमचा अपमान; काका, माझं हें सुदैव इतक्यांतच दुर्दैव-- (घेरी येऊन बेशुद्ध होते.) असं काय बरं—मी इतकी गयावया करिते, पण माझी नाहींना काकळूत येत, मला किनई--हा रुप्याचा पलंग, या पराच्या गाद्या, रत्नांचे दागिने, हा सोनेरी महाल--हा जडावाचा करंडा--कांहीं, कांहीं नको बरं, मी आपली नुसती भाकरी खाईन, फाटक्या घोंगड्यावर निजेन, सुताडे नेशीन, यांच्याशिवाय इतर जिनसांचं नांवसुद्धां काढायची नाहीं, पण मला स्वारीला न्यायची, एक घटकाभर कुणी नजरेस नाहीं पडलं--ह्मणजे माझा प्राण कसा खालीं वर होतो; लागलींच सारा वाडा मला खायला उठतो, मग कसं? न्यायची ना मला; आणखी हेंहि पण आधिं सांगते हो, कीं मला अर्ध्यावाटेंतच मागं परतवायची नाहीं, मग कसं? मी नाहींच पण ऐकायची (एका कुशीवर हात टाकते; तों पार्वतीबाईच्या अंगावर पडून दचकून सावध होते व लज्जित होऊन.) हाय! हायरे दैवा!!

पा०—(स्वगत) देवा! या पोरीच्या अंतःकरणांत भावी दुःखद स्थितीच्या विचारांची केवढी आग भडकली असेल बरं, तिचे विचार कुत्र्यासारखीं तिचीं आंतडीं तोडतोडून खात असतील. डोक्यावर अक्षता पडल्यापासून हा काळपर्यंत भोगलेल्या सुखाचीं साधनं, तिच्या डोळ्यांला सुरीसारखीं दिसून, तिच्या उरांत रुतून, तिची आंतल्याआंत अगदीं तरफड तरफड होत असेल नाहीं! देवा, अग आईग, माझ्या पोटांत असं एकदम चक्क कां बरं झालं? माझ्या अंतर दृष्टीला सारं

जग असं ओंगळ कां दिसतं, अंतरयाम एकाएकीं असं हलक होण्याचं कारण, माझ्यावर कांहीं वेडावांकडा प्रसंग नाहींनारे देवा! मग मी काय करूं. आई जोगेश्वरी! पण तुझे अजून हळदीकुंकवाचे सडे व्हावयाचे आहेत, अजून सौभाग्यवायनं वाटायचीं आहेत, जोडप्यानं बसून व्रतं उजवायचीं आहेत, छे! माझ्या काळजानं ठावच टाकला, देवा, त्या निर्मल प्रेमाच्या झऱ्याकडं पाहून मी सदा तृप्त आहेरे. आईबाप, इतर गणगोत याचीसुद्धां कैकवेळां माझ्या हातून धिःकारणी झाली आहे; पण हें काय, बायकांचे आईबाप, नातलग, प्रपंच, सुख, स्वर्ग, देव, सारें त्यांचे पतीना! मग मी त्या सेवेवांचून एक पळ तरी वावगं दवडलं आहे कां? जन्मांत--साऱ्या जन्मांत नाहीं मला आठवत. सदाशिवाचीना अर्धांगी मी पार्वती, देवा तूं माझ्यावर रुसलास, मला सोडलंस, तरी मी पार्वती तुझ्याच सेवेसाठीं खडतर तपश्चर्या करून पुन्हा तुझ्याच पायाची प्राप्ती करून घेईन. छे, पण काय बोलते मी हें, मला तपश्चर्येचं कारण, कुणी सोडील तर ना मला. पण माझं मन असं तरंगल्यासारखं कां मग? तो, तो प्रसंग, देवा नकोरे नको, आह्मा आर्यकन्यांना त्यांच्या पतीबरोबर कुठंही ठेव, तिथं त्यांना इंद्रभुवनापेक्षांही जास्त सुख आहे. पण पतिवांचून प्रत्यक्ष इंद्रपुरी त्यांना नर्कपुरी आहे. देवा! तूं नाहींना त्या नर्कपुरींत मला ढकलणार! पहा बाबा, मी तर मुकं जनावर आहे. वाटेल तर चारा चार, नाहींतर मानेवर सुरा ठेव. (प्रकाश.) पण काका, आटपाच, नकाहो तुह्मी इतके निर्दय होऊं! लक्ष्मीची, माझी लौकर पाठवणी करा. तिचा तर वर संसारच सुरूं होईल; आणि माझाही, पण तुह्मी ह्मणतां तें जरी खरं असलं, तरी मी रत्नखचित निरांजनाची आरती, दुध हातांत घेऊन, स्वर्गाच्या दारांत अप्सरांच्या पुढं उभी राहून, तिकडची वाट पहात बसेन. मुलींनीं नवऱ्याबरोबर सुखानं नांदावं अशीना वडील माणसांची इच्छा असते. मग काका, तुह्मीच कां बरं असे सृष्टीविरुद्ध जातां?

म०—सरकार, नकाहो, माझ्या अंतःकरणाला असे डाग नकाहो देऊं, देवानं मला पुरी शिक्षा केली आहे. (स्वगत) मल्हारी, जगाप्रमाणं तुझ्याहि दृष्टीला माझे विचार घातुक दिसून, मला ही शिक्षा केलीस कायरे. हाय! काय करूं! कुणाकुणाला काय काय ह्मणून सांगूं, तुमचा आधार, तुमचं जन्माचं सौख्य, गेलं—ठार गेलं, असं सांगून किती अबलांना तळमळत पाडूं, तुझा बाप, तुझा काका, तुझा मामा, तुझा भाऊ, कुणाला कुणाला कितीजणांचे मृत्यू सांगून त्यांना दुःखाऱ्या खाईत ढकलून देऊं, समजूत करूं तरी कुणाकुणाची, पुत्रांच्या भेटीसाठीं कंठांत प्राण ठेवून वाट पहाणाऱ्या आईबापांची, खाऊसाठीं वाट पाहणाऱ्या लहान छोकऱ्यांची, कीं सर्वस्वी वाटोळं झालेल्या बालविधवांची. करूं तरी काय? देवा! या महाराष्ट्रावर एवढा कोरडा काय ह्मणूनरे ओढलास, आतां तिकडे जाऊन काय पहावं? ऐकावं काय, प्रत्येक वाड्यांत, जंगलांतल्या प्रत्येक झोंपडींत, पशुपक्ष्यांना रडवणारे हंबरडे, प्रत्येकाचीं प्रफुल्लित पण या दुःखानं काळीं ठिक्कर पडणारीं तोंडं, यावांचून दुसरं काय असणार! जिथं आनंद तिथं शोक, जिथं उल्हास तिथं सदां कष्ट, सुख तिथं सारी हाय हाय! आर्यमाते! कायग तुझ्यावर प्रसंग! केवढी तुझी ही अप्रतिष्ठा! हे पुण्यनगरी! तुझी पुण्याई इतक्यांतच कशी सरली, सदा गजबजलेली असस, पण कोरडी पडलीस. नको, हा शोक करण्याची माझी लायखी नाहीं, माझी लायखी, जाऊंदे, पण मराठ्यांच्या मर्दुमकीची लायखी घालविली, हर! हर!! काय हा योग, राजहंस, चातक, यांच्याप्रमाणें मार्गप्रतीक्षा करणारी ही श्रीमंतांची छावणी दिसूं लागली, आतां तिच्या तोंडांत माती, चिखल मी जाऊन टाकूं काय! वधस्तंभाकडे चालविलेल्या माणसाप्रमाणं इथवर बाईसाहेबांना निरर्थक आशा दाखवून मी त्यांना ओढीत आणलं, पण आतां यांना काय सांगूं? आणि उघड निंदा करून माझ्या नांवानं बोटं मोडणाऱ्या लोकांना मी काय उत्तर देऊं. अरेरे! संक्रांतीच्या सणाची

कोण धांदल उडालेली दिसते छावणींत, पण बायांनों, पुरी संक्रांत बसलीग तुमच्यावर. (रडूं लागतात.)

(मराठ्यांच्या छावणींतले लोक येतात.)

पा०—काका, नकाहो, नकाहो आतां भ्रमांत ठेऊं.

म०—काय सांगू, आईसाहेब तुह्माला मी काय सांगू! परमेश्वरानं तुमच्या वांट्याला तेंच–तेंच (रडूं लागतो.)

पा०—हायरे दैवा, घात! घात!! घात!!! (मूर्च्छा.)

म०—भाऊसाहेब, श्रीमंत--कायहो केलंत हें! (भाऊ, विश्वास- अशी ओरड होऊन एकच कल्होळ उडतो. सर्व मूर्च्छित होतात.)

(पडदा पडतो.)

प्रवेश २ रा.

स्थळ—बऱ्हाणपूरची छावणी.

[भाऊ व विश्वासराव यांच्या मृत्यूनें व पराजयानें संतप्त झालेले श्री० रघुनाथराव प्रवेश करतात.]

रघुनाथरावदादासाहेब—हाय! माझ्या दीड लाख मराठे मर्दांची शेळ्यामेंढ्यांप्रमाणें कत्तल! आर्यमाता, हजारो आर्यभगिनी यांच्या अब्रूची, या भ्रष्ट शिखानष्टांच्या हातून नालास्ती! अरे अहमदशहा, या हातांनीं, तुझ्या शूर शिपायांचे, मर्द सरदारांचे ढिले केलेले सांधे अजून दुखत असतील! धर्मयुद्धांत नागावलेल्या तुझ्या लेंकीबहिणींच्या किंकाळ्यानं, तुझी राजधानी, अजून दीन–उदास दिसत असेल! दुःखाश्रूनीं भिजलेला तुझा वाडा अजून ओला असेल! रणमैदानांत उभारलेला धुळीचा मंडप अजून नभोमंडप व्यापून असेल! तुमच्या रक्तानं गढूळ झालेली महानदी अजून वितळली नसेल! तुमचा प्रदेश पेटवून, त्यांतून

निघालेल्या ज्वाळा, अजून तुह्मांला नखशिखांत जाळीत असतील! आणि तुझ्या छातीवर पाय देऊन, पंजाबच्या सरहद्दीवर, जरिपटका, भगवा झेंडा उभारतांना, तोफांना दिलेल्या सरबत्तीचा प्रतिध्वनि तुमच्या कानांत घुमून, अजून तुमचा दिल फाटत असेल! इतकं असून, या कर्दनकाळ–सैतान–राघुभराऱ्याला विसरलास!! सिंह दरींत निजलेला पाहून, त्याच्या कच्चाबच्चांचा घात करून पळून चाललास! जाशील कुठं! सप्तपाताळ फोडून, अस्मान फाडून, जिथं लपशील तिथून तुला जोड्याच्या लाथाखालीं तुडवीत–तुडवीत बाहेर ओढीन! तुला पालथा उलथा पाडून, तुझं हिरवंकच्चं काळीज कचाकच फोडून, ज्या माझ्या देशबंधूंच्या रक्तानं ही आर्यमाता विटाळलीस, त्या तुझ्या रक्तानं तिला शुद्ध करीन! हाय! (दुःख) सारं करीन, छत्रपतीसाठीं इंद्राचं तख्त हिरावून आणीन, लत्ताप्रहारानं हिमालय जमीनदोस्त करीन, या वज्रमुष्टीनं भूगोलाचा चकाचूर उडवीन, पण, मी जरी प्रत्येक रजन्‌रज शोधला, तरी भाऊ— तूं मला फिरून या लोकीं दिसशील कायरे! अरेरे! माझ्या त्या शब्दांची आठवण झाली ह्मणजे माझ्यासारखा मांग–नीच–राक्षस–या साऱ्या दीन दुनियेंत मीच! या प्रळयाची आग प्रथम चेतवली मी! त्यावेळीं खर्चाच्या पेंची फार आल्यानं निव्वळ प्रेमळबुद्धीनं केलेला उपदेश न जुमानून ' तूं फक्त खर्डेघाशी करावीस, मुलूखगिरीचं तुझं काम नव्हे ' अशी अपमानाची भाषा तुझ्यासारख्या मानी पुरुषाला मी वापरली, ती मला भाऊ, आठवतेरे! हाय! माझी ही चवचाल जीभ अजून--कुजून–गळून कशी पडत नाहीं! अधमपणानं भरलेलं हें माझं अपवित्र शरीर--पाण्यांत बुडून--वीज पडून--वणव्यांत सांपडून--रौरव नरकांतल्या नीच कीटकांच्या भक्ष्यस्थानीं अजून कसं पडत नाहीं! आमचे लाखों वीर, हजारों सरदार, मानकरी, हिंदुपदपादशाहीच्या खजिन्यांतले दिव्य हिरे अखेरपर्यंत चमकून, धारातीर्थीं पवित्र होऊन, सुरासुरांच्या पुष्पवृष्टींत स्वर्गीं गेले! हत्ती, घोडे, बैल, हीं मुकीं जनावरंसुद्धां आमच्यासाठीं अखेरपर्यंत इमानाला जागलीं,

आणि मी आर्यभूमींत, या स्वामिभक्त, देशभक्त, अशा शुद्ध वंशांत जन्मून आपल्या कृतीनं साऱ्या देशबंधूंचे, पाठच्या, पोटच्या लेकरांचे, तेरावे झोडायला तयार झालों अं! धिःकार! धिःकार!! धिःकार!! (वर पाहून) ते पहा, स्वधर्मसंस्थापनेसाठीं अवतार घेऊन, हिंदुपदपादशाही स्थापन करणारे शिवाजी महाराज; स्वधर्मासाठीं अंगाचे तुकडे तुकडे तोडून देणारे संभाजी; त्यांच्याच व्रताचं हातांत कंकण बांधून कन्याकुमारी-पासून हिमालयपर्यंत उघड्या घोड्यावर, एका मांडीवर उपाशीं हिंडणारे माझे रणशूर बाबा; माझं मस्तक तरी किल्ल्यांत पडूंदे, म्हणून तोफेच्या तोंडीं उभे राहणारे माझे हिम्मतबहाद्दर काका; ते तानाजी; धनाजी; माझ्याकडं—या कुलांगाराकडं पाहून आपली छाती बडवून घेताहेत. पानपतांत, गिलच्यांच्या रक्तांत गारद झालेला भाऊ, विश्वास हे माझे वीर माझ्याकडं पाहून ' दादासाहेब काय हो भाऊबंदकी साधलीत, ऐन प्रसंगाला कसे आला नाहींत ' म्हणून धाय धाय रडताहेत. हाय! पण, थांबा! बाबांनों थोडे थांबा, तुमच्याबद्दल या लोकींच—तुमच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबाबद्दल—पुरा सूड उगवण्याचं माझं कर्तव्य करून, आणि अहमदशहाची नरडी दांतांनीं कडाकड फोडून, त्याच्या ताज्या—उन्हुनीत रक्तानं तुम्हांला तिळांजुळी देऊन, स्वर्गलोकीं देवादिकांशीं होणाऱ्या जंगी सामन्याला मदत देण्याकरितां हा दादा, आतां मात्र खास येतो! सूड! सूड!! सूड!!! (जातो.)

प्रवेश ३ रा.

स्थळ०—बऱ्हाणपूरची छावणी.

पात्रें:— पार्वतीबाई, गोपिकाबाई, रघुनाथरावदादासाहेब.

पा०—अरे चांडाळा! कायरे अंतर्वैर साधलंस! कुणी दिल्लीकडं गेलं, म्हणून खोटंच सांगून, मला मागं फिरवून आमची अक्षयची ताटातूट करून,

कायरे बाबा पदरांत पुण्याई बांधून घेतलीस! गर्दी उसळली, मण मण मिशांचं फुकट ओझं बाळगणाऱ्या आमच्या सरदारांचीं पथकं मागं फिरलीं, प्रत्येकजण कुणाच्या नांवानं हाक मारून सैरावैरा धावूं लागला, पोटांत अन्न नाहीं, पाण्याबद्दल जिकडंतिकडं हाकाहाक, उन्हाचा ताप, बंदुकीच्या गोळ्यांची आग, धांवाधांव, सारखी कापाकापी, जखमा लागून पिसाळलेल्या जनावरांचा सारखा धुमाकूळ, जिकडंतिकडं उरापर्यंत प्रेतांचे ढीग, रक्ताचे सारखे लोट, पण त्यालाहि मी न जुमानून, कुणा-बरोबर आपल्या देहाची सार्थकता करून घ्यावी, हिंदुस्त्रियांच्या पतिवरच्या निःसीम प्रेमाचं, सुखदुःख, रंगमहाल, रणमैदान, या साऱ्या ठिकाणीं आपल्या प्रियपतीची सारखी एकनिष्ठ सेवा करण्याचं उदाहरण करून ठेवावं, या हेतूनं, कुणाची तलवार हातांत धरून, अपेश येईल या लाजेनं चवताळून, त्या मेल्या गिलच्यावर उडी घालण्याकरितां, ते प्रेताचे ढीग तस्से तुडवीत गेलें, पण माझ्या फुटक्या प्राक्तनानं, तो मांग आडवा घाडून, ‘ जय झाला, गिलच्यांचा पाठलाग करीत, स्वारींनीं दिल्लीची वाट धरली, अशी माझी खोटीच समजूत घालून, हें काळं तोंड जगाला दाखवायाला मला जगवलं, हायरे दैवा!

गोपिकाबाई—पार्वती, दिवसाचेदिवस, रात्रीच्यारात्री, महिने, वर्षाचींवर्षं आपण, भाऊभाऊ—विश्वास—ह्मणून जरी आकांत केला, तरी ते आपल्याला फिरून या लोकीं दिसणार कां आहेत? नाहीं, आपल्याला, आपल्या सुखाला सोडून, या शूरांच्या बेइमानाला कंटाळून, ते गेले. भाऊ—विश्वासाला दिल्लीच्या, रुमशामच्या तख्तावर बसवणार होतासनारे? इतक्यांतच तुला स्वर्ग जिंकण्याची काय घाई झाली!

पा०—बाई, ज्याप्रमाणं रजपूत आपल्या बायकांचा ‘ जोहार ’ करून आधि त्यांना पंचारती घेऊन पुढं येण्याकरितां पाठवून देतात, आणि मग तलवार धरून लढाईला जातात, तसं करावं, ह्मणून मी तिनतिनदां

हातीपाईं पडून, नाहींनाहीं त्या तऱ्हा करून विनवलंहो, पण तें कांहीं मनाला आलं नाहीं, उलट मराठ्यांच्या बायका आपल्या नवऱ्याच्या मागं राहून, त्यांची अब्रू खराब करण्या इतक्या उछृंखल नाहींत. धैर्य, निर्मळ प्रेम, सदाचार, यांच्या त्या मूर्तिमंत खाणी आहेत, त्यांची–नीतीनं, सत्याचरणानं चालून, आपल्या पापीपतीला उद्धरून नेणाऱ्या साध्वींची कत्तल करून, स्त्रीहत्येच्या पापाचा बोजा विनाकारण लादून घेण्याची काय जरूर आहे, असं मला दटावून सांगणं झालं. आतां तें सारं धैर्य, प्रेम, कुणालाहो दाखवायचं?

गो०----आतां या जन्मांत तें सारं जागच्या जागीं राहिलं बरं, जंवर बायकांचं तोंड उजळ, तोंपर्यंत, त्यांच्या साऱ्या गुणाचं चीज. देवा! या पोरीनां संसाराचं सुख अजून कांहींच लागलं नाहीं!

पा०---बाई, आतां आमचा कसला संसार–आणि आतां त्याचं दुःख तरी कसलं! बाकी लक्ष्मी मात्र नाहक नाडली. ओंठावरचा जारसुद्धां वाळला नाहीं पोरीच्या. बाळा विश्वासा, तुला आमचा लहानपणापासून लळा, माझ्याकडं सारी तुझी ओढ, थोडक्यांत सुखाचा चटका लावून, तूं सुद्धां कसारे गेलास! आह्मीं मूळचेच हतभागी! आमच्या प्रेमानं फुकट प्राणाला अंतरून मात्र सर्वस्वी निराधार केलंस.

गो०–हं--एवढं बरीक मात्र ह्मणूं नका अँ! माझ्या गळ्याची, भाउजींच्या पायाचीच तुह्माला शपथ आहे फिरून असं ह्मणाल तर. माधव माझा, नी नारायण तुमचा बरं. त्याचासुद्धां सारा ओढा—

पा०—नको! आतां कांहीं नको!! मला कोणाच्या ओढ्याचं, प्रेमाचं, नांवसुद्धां नको. माझं सार प्रेम, सारी हौस, पानपतच्या आगींत जळून गेली. बाई, या–पांढऱ्या फटफटीत–अमंगल–निरुपयोगी- -प्रेतासारख्या सांगाड्यांत, जन्मभर डोळ्यांतून टाकण्याकरितां रक्ताचं बनलेलं पाणी, आणि ही अंधुक प्राणज्योत, यावांचून कांहीं उरलं नाहीं. प्रेम--

आतां तें कुठलं, कोरडं पडलं, परमेश्वर करो, आणि ही नारायणमाधवाची जोडी तरी आतां पूर्णायुषी होवो. देवा! आतां हें कष्टमय आयुष्य, त्यांना घालून, मला—या अनाथ गाईला—तिकडच्या सेवेला लवकर ने. अपजयानं होणाऱ्या वेदना अगदीं सहन होत नसतील. कुठं तरी बसून सारखा शोक चालला असेल. कित्येक दिवस आधींच अन्न नाहीं, आणि आतां तर मुळींच नांव टाकलं असेल, माझ्याशिवाय तिकडली समजूत व्हावयाची नाहीं. लौकिकाचं सुख नाहीं, आतां जगून तरी काय उपयोग, तेव्हां या तुझ्या अनाथ लेकीला एकदां लवकर ने. (मूर्च्छा)

गो०—(घाबरून) पार्वती, बाई असं ग काय करतेस, कुणी तरी या लौकर, पार्वतीला घेरी—

पा०—(सावध होऊन) अहो नाहीं, घेरी येण्याइतका माझा नाजुकपणा आतां गेला बरं! राबता नको, माझं हें काळं तोंड कुणी पाहिलं! भिऊं नका, मला आतां कांहीं व्हायचं नाहीं, दगडांनीं चेचला, कुऱ्हाडीनं तोडला, तरीसुद्धां हा माझा प्राण आतां जायचा नाहीं.

गो०—नकोग कांहीं भलतं बोलूं! कोण आहे? गोविंदा, थोडं पाणी आणि—

पा०—नको, नांवसुद्धां नका माझ्यापुढं काढूं, अहो मी पुष्कळ खाल्लं. कुणीं उपास काढीत, पण मला पोटभर घालीत. बाई, 'माझ्या घोड्याला चंदी नाहीं, त्यांना पोटभर वैरणसुद्धां नाहीं, शिपायांना अन्न नाहीं, पोटाला ते घड्या बांधतात, मी कसा जेवूं, कसा खाऊं, नोकराचाकरांना उपाशीं मारून, अन्नासाठीं त्यांना तळमळत ठेऊन, आपण पक्कान्न झोडण्यापेक्षां या पोटाची खांच, कांटे, खडे, माती खाऊन कां भरून काढूं नये.' असं सदोदित ह्मणायचं. बाई, तीन तीन दिवस दांताला दांत लागला नाहीं. अगदीं कडकडीत उपास हो. 'गिलच्यांना जिंकून, माझ्या शिपायांना कडींतोडे देऊन, जेव्हां त्यांना

मेजवानी देईन तेव्हांच अन्न खाईन, ' हा सारा नाद. महाराजांचा भगवा झेंडा इस्तंबूलवर लावीन, लौकर लावीन, हा सारा ध्यास, सैन्यांत पडलेल्या दुष्काळाचं दुःख, हे सारे लोक यश घेऊन आपल्या पोराबाळांत आनंदानं कसे जातील ही सारखी काळजी, यामुळं पोटाची शुद्धीच उडाली हो, देवावर–दैवावर--सारा भरंवसा देवा ! तुझ्या दरबारीं तरी कांहीं न्याय असायाचा होता, अन्नावांचून हात पाय कांपत, तरी, सूर्यनारायणा ! तुझे हजार नमस्कार कधीं चुकले नाहींत, यांची तुला तरी कांहीं लाज असायची होती. आपल्या देशाचं आपल्या धर्माचं, आपल्या लोकांचं संरक्षण करण्यापेक्षां कांहीं तरी दुसरी वासना होती कारे? आणि त्या झाडाला हें फळ! काय करूं, मी इच्छा पुरवली असती, पण मला त्या कसायानं आपल्या छावणींत खोटंच सांगून परतवली. सर्वस्वी माझी निराशा केली !

गो०—पार्वती, अग एक तुकडा तरी खाग!

पा०—बाई, नकाहो--नकाहो तुह्मी माझ्यावर जुलुम करूं. माझ्या डोळ्यांपुढून, ती उपासानं सुकलेली मूर्ति अगदीं हालत नाहीं, आणि मी कशी बरं खाऊं? एवढं वज्रासारखं शरीर, पण अखेर नुसतीं काष्ट उरलीं होती. आज अमुक सरदार कामाला आला, उद्यां पंत आले, परवां माझा आपाराया आला, असे एकामागून एक दुःखाचे डोंगर कोसळूं लागले, तरी भवानीवर पुरी भिस्त. नेहमीं कपाळाला हात, अखेरच्या दिवशीं, अंगांत चढलेल्या त्वेषाचं तें उग्र तेज, जिथल्या तिथं खेंचलेलं तें चिलखत, शिरस्त्राण, कपाळावर रक्तचंदनाचा तो लाल टिळा, आदले दिवशींच्या लढाईत रक्तानं माखलेलीं तीं हत्यारं, उपासानं निस्तेज, पण सूड घेण्याच्या इराद्यानं चढलेले ते तांबडे लाल डोळे, प्रळयकाळचंच स्वरूप ! माझा निरोप घेण्याकरितां स्वारी केव्हां आली होती कोण जाण, मी झोपेंत, त्या दुष्ट स्वप्नांत ओरडत

उठले, तों स्वारी आपल्या आपल्याशींच कांहीं पुटपुटत माझ्या उशाशीं उभी. पुष्कळ ह्मटलं, पण बसणं नाहीं, स्वप्न सांगितलं, तेव्हां खिन्न मुद्रा करून, माझी आपली कांहीं तरी समजूत काढली. माझ्याकडं सारखं न्याहाळून पहाणं, डोळ्यांतून टपाटप पाणी, वरचेवर उष्ण श्वास, उपासानं असं होत असेल, अशी माझी आपली वेडी समजूत, पण तिकडं सारे- शेवटचे--युद्धाचे विचार. कांहीं केलं तरी दया येईना, अखेर नाक घासलं, तेव्हां एक चिंचुक्याएवढा बत्ताशाचा तुकडा तोंडांत टाकून, कित्येक दिवसांच्या उपासाचं पारणं केलं, आणि एकदम 'सूर्यनारायणा आतां तूंच माझी अब्रू राख' असं ह्मणून जी धांव झाली, ती शेवटची. त्याचवेळेस जर मला हें भविष्य कळतं, तर मी एक घटकासुद्धां वाया घालविली नसती, आणि हें काळं तोंड आज तुह्माला दिसलं नसतं. दिवस फिरेपर्यंत आमच्याच सरशीची बातमी, दिवस फिरला, त्याबरोबर काळ आमच्याकडं फिरला. माझा तान्हा विश्वास, कुण्या चंडाळाची गोळी लागून पडला! झालं!! 'आतां वहिनीला काय तोंड दाखवूं' ह्मणून निराशेनं तिकडून शेवटची गर्दी झाली ह्मणतात! झालं!! त्यावेळेस माझ्या खोट्या--फुटक्या--प्रालब्धानं वेळ साधली! हाय!

गो०—भाऊजी, अहो मी तुह्मांला कांहीं दोष दिला नसताहो! तुमच्यापुढं विश्वासाची मला कांहीं किंमत नव्हती! भाऊजी, त्या वेळेला तुमच्या मनांत तरी काय आलं? एका बत्ताशावर तुमचं पोट तरी कसं भरलं! लहानपणापासून तुमची भूक-अरेरे! देवा!! आतां कुणाकुणाबद्दल, काय काय ह्मणून आठवूं. भाऊजी, आमच्या सुखासाठीं सर्वतोपरी बुडालांत! लक्ष्मी नागवली इतकंच; पण तुमच्याबद्दल, पोटचा गोळा गेला, सारे जाते तरी मला जन्मभर दुःख होतंना. देवा! एखादं पोरबाळ तरी ठेवायचं होतंस, भाऊजी, आह्मी होऊन तुमचा निर्वंश—(इतक्यांत दादासाहेब शोक करीत येतात.)

दा०—छे! तुह्मी नव्हे, मी--तो साऱ्या गोताला काळ झालेला कुऱ्हाडीचा दांडा मी बरं वहिनी! माझी घाण मी निस्तरली असती, ह्मणजे पेशव्यांची जयलक्ष्मी आज कां रडती! लाखों अर्भकांचा पोरकेपणा, लाखो अबलांचं वैधव्य, लाखो वृद्ध मातापितरांचा पुत्रशोक, हजारों घराण्यांचा निर्वंश, जातिद्रोह, देशद्रोह--एवढ्या जबरदस्त पातकांचा बोजा माझ्या एकट्याच्या टाळक्यावर असून, परमेश्वरा, तूं मला अधोगतीला नेऊन, अजून पिशाचयोनींत कसा ढकलून देत नाहींस! यमपुरींतल्या कोट्यवधि यातना एकत्र होऊन, हिंस्रश्वापदांच्या--विषारी जनावरांच्या रूपानं--माझ्या प्रत्येक केंसागणिक अजून कशा डसत नाहींत! काळदूतानों! तुमचे सर्वांत तीक्ष्ण पाश, हालहाल करून मारण्याचे तुमचे काळदंड, एकदम माझ्या अंगावर टाका! मृत्युंजया, तुझ्या त्रितीय नेत्राच्या अग्नीचा--साऱ्या विश्वांतील प्रखर तेजाचा लोळ--माझ्यावर एकदम पाडून, अनंत अपराधानं भरलेल्या--या पापमूर्तींतला प्रत्येक दोषी कण जाळून टाक, आणि हे प्रळय वायो! ती राख, एखाद्या निर्जीव अरण्यांतल्या खोल दरींत उडवून ने. कारण, ज्या प्रदेशांत त्यांतली एक रति पडेल, तिथले लोक माझ्यासारखे–आपल्या हातांनीं आपलं वाटोळं करून सर्वस्वी परवश बनणारे निघतील!

पा०—भाऊजी, तुह्मीं आपल्याला विनाकारण काय ह्मणून बरं दोष लावून घेतां? ज्यांचीं प्राक्तनं फुटलीं, त्यांचा घात झाला. असं व्हावं ह्मणून कुणाचे नवस कां होते? त्यांत कुणी कोणाचा वैर दावा कां साधला? भाऊजी, काय पहातां या माझ्या भग्या कपाळाकडं, इतकं निरखून काय हो पहातां?

दादा०—वहिनी, भाऊसारख्या अभिमानी पुरुषाला, बेमर्याद भाषा वापरून, त्याला घरांतून काढून काळाच्या दाढेंत मी खेंचला, आणि आतां तुमच्याकडं न्याहाळून पहातों, असं कां तुमच्या मनांत आलं!

छे, छे, साध्वी–ही दादाची वाचा जरी बेसुमार असली, तरी त्याच्या अंतःकरणांत भाऊबंदीचा–द्वैतभावाचा–एक किल्मिषसुद्धां सांपडावयाचा नाहीं! वाटेल तर हें फाडून पहा! भाऊच्या वियोगानं करपून, पश्चात्तापानं जळून! या दुःखाच्या तडाक्यानं त्याला किती व्रण पडले आहेत, याची आपल्या मनाची खात्री करून घ्या. भाऊ, लहानपणापासून आपण एकत्र वाढलों, खेळलों, शेंकडोवेळां वर्दळीला आलों, तुला आजवर काय वाटेल तें बोललों, पण तूं मला दांडगा ठरवून चिडवीस, माझ्या हूडपणाचं उलट कौतुक करीस, आणि याच वेळेस माझं बोलणं तुला कसेंरे लागलं! देवा! मी भाऊचा अपमान केला होता, तर माझ्या एकट्यावर वाटेल ती आग पाखडावयाची होतीस, बाजीराव साहेबांना न शोभणाऱ्या या विचारशून्य पशूचा बळी घ्यायचा होतास; पण ही अशी थप्पड देऊन, माझा–माझ्या राष्ट्राचा–असा दुर्लौकिक करायचा नव्हतास! अरेरे! ही माझी वाचा!!

गो०––अहो भाऊजी, उगीच काय हें, तुमच्या वाचेनं काय बरं केलं?

दादासा०––वहिनी, अहो माझ्या वाचेनं काय केलं ह्मणतां? आर्यमातेच्या मांडीवर, सुखानं झोंप घेणाऱ्या पोरांचे गळे चिरून तिला छिनाल ठरविली. आर्यभगिनींच्या संसारांत माती कालवून, त्यांना गण-गोतांतून काढून, त्या रडत ओरडत असतां, गाईप्रमाणें त्यांच्या मानेला फांस लावून, त्यांना मुसलमानांच्या घरांत, दासी रहाण्याकरितां ढकलून दिल्या! भरतभूमीच्या बोलबाल्यावर रखरखलेले निखारे ठेवले! स्वातंत्र्याच्या डौलांत, झोंकांत चालणाऱ्या आर्यपुत्रांच्या डोक्यांत धोंडा घालून, त्यांना खालीं पहायाला लावलं! त्या महात्म्या शिवाजीनं रचलेल्या मजबूत पायाच्या–रावानीं, आप्पानीं, त्यावर चढवलेल्या भव्य इमारतींत बिळं पोंखरून, त्यांत घुशी, साप, यांना रहायला जागा करून दिली! आर्यधर्म

बाटवून, त्याची विटंबना करून, त्याला बाजारांत लिलावाला आणला! आर्यांचा दरारा पाळामुळासकट उपटून त्यांना मूर्ख बनवून, पारतंत्र्याच्या घाणेरड्या वाटेला, फिरून धक्के देऊन लावलं! साऱ्या हिंदुस्थानाला साडेसाती, साऱ्या हिंदुस्थानाला सुतक—दुर्दैवाचं कायमचं सुतक—आणलं! आणखी काय पाहिजे? साऱ्यांची आहुती देऊन, आर्य, हिंदु, हे शब्द, फक्त कांहीं काळ ऐकायला कां करून ठेवायला पाहिजे होते?

पा०—भाऊजी हें काय हें, तुह्मांला निरर्थक दोष माझ्याकडून कधींही यावयाचा नाहीं बरं! बोलाफुलाला गांठ पडते, कोणी कांहीं बुद्धिपुरःसर असल्या गोष्टी करित नाहींत. तुमच्या दुर्लौकिकाचं वेड आतां सोडून द्या, बस्स झालं, पुरुषांना इतकं दुःख! पुरुषांनीं आपलं दुःख मनांत ठेवावं, आणि मनगटांत जोर असेल, तर त्याचा सूड घ्यावा! सदां मुळमुळ रडणं बायकांचं काम.

दादासा०—'सदां मुळमुळ रडणं बायकांचं काम—मनगटांत जोर असेल तर गोष्ट मनांत ठेवून, पुरुषांनीं त्याबद्दल सूड घ्यावा.'! वहिनी थांबा, हे माझे कान चांगले वांकवून, त्यांत कडकडीत तेल ओतून ते साफ करा, तापलेल्या पहारांनीं डोक्याला चांगले डाग देऊन, त्यांतला घाण मेंदु आधीं दुरुस्त होऊंदे, मग तुमचा उपदेश, छे, अमृत मला पाजून—

पा०—आतां कसचं अमृत, काय करूं घात झालाहो—भाऊजी, सुडाचं काम, माझं मी—

दादासा०—काय? वहिनी, आह्मीं जिवंत असून, सुडाचं काम, तुह्मी—स्वतः! अरेरे, बायकांचींसुद्धां अंतःकरणं अशीं तळमळतात. या अपमानाची, या हानीची, त्यांनासुद्धां लाज वाटून, त्यांचं रक्तसुद्धां सूड घेण्याबद्दल उसाळ्या मारतं अं! वहिनी, तरवार धरून तुह्मी सूड घेणार, आणि मी पळीपंचपात्री घेऊन तर्पण करूं!


पा०—तर्पण कुणाचं करतां? भाऊजी, ज्या पक्षाला जय, त्याच पक्षाच्या, लढाईंत गारद झालेल्या वीरांच्या आत्म्याला शांति--आणि त्यांनाच गति—

दादा०—काय? आणि अपयश आलेली मंडळी पिशाच्च! अपयश--आणि आमची मंडळी पिशाच्च! पिशाचानों! सांगा, तुमच्या दुष्मानांच्या मुंड्याचे उतारे, आणि मांसाची मेजवानी, या दादानं तुह्माला दिली, तर तुह्माला गति मिळेल कीं नाहीं? सांगा–बोला, (तोफांची सरबत्ती होते.) आमच्या छावणींत तोफांचे आवाज! हं समजलों, सूड घेण्याच्या आगीनं, माझं रक्त अजून कसं कढूं लागलं नाहीं--स्वातंत्र्याला लागलेल्या वणव्यानं, माझ्या अंगाची अजून कशी तगमग होत नाहीं--देशबंधूचं रक्त पाहून, माझ्या प्रत्येक अवयवाला अजून कसा खून चढत नाहीं, ह्मणून या तोफा माझ्या अंगावर थुंकताहेत! (फिरून आवाज होतात.) हं, आणखी फिरून--होय तेंच–आर्यभगिनींच्या--गाईंच्या माना, गिलच्यांच्या जबड्यांत सांपडल्यामुळं, त्यांचे हंबरडे ऐकून--आर्यबंधूंना माझ्या डोळ्यांदेखत, गिलच्या कैद करून चालला असून, माझे डोळे तें पाहून, अजून कसे चढत नाहींत! आर्यावर्तांत शिरून, आर्यांच्या माना, हे मुसडे विश्वासघातानं मुरगाळून, त्यांचं रक्त शोषून, त्यांच्या छातीवर दणादण नाचत असून, अजून माझी गुंगी कशी उतरत नाहीं, ह्मणून या तोफा मला मोठ्यामोठ्यानं शिव्याश्राप देताहेत. (पुन्हा आवाज) अरे काय हें! (पडद्यांत भाऊराया, विश्वासा, अशी आरड होते) हाय! हाय!! भाऊ, विश्वास, यांचं कर्मांतर करण्यासाठीं या अस्थि आल्या असाव्यात, त्याबद्दल ही सलामी आहे. हाय! हाय!! भाऊराया अशा रीतीनं तूं मला भेट देतोस कायरे! (तोफा होतात.) हां, सावध आहे. या तोफा–मला–भाऊला अहंमदशाहाच्या ताज्या उन्हुनींत रक्ताची तिळांजली देण्याबद्दलच्या प्रतिज्ञेची आठवण करून देण्याकरितांच ओरडताहेत. झाली–पक्की आठवण झाली!

पा०—झालं, आतां माझ्या देहाचं सार्थक झालंच ह्मणायचं. अस्थि आल्या, आतां सहगमनाला किती उशीर. महाराज, आले–आलेच. (जातात व त्यांच्यामागून गोपिकाबाई 'अग अग' करून धांवतात.)

दादा०—हां! हां! थांबा–वहिनी थोड्या थांबा. भाऊला, अहंमदशहाच्या रक्तांत भिजलेल्या शेल्याचा आहेर मला पाठवायचा आहे, तेवढा घेऊन मग चला! सूड! सूड!! सूड!!! (जातात.)

अंक पहिला समाप्त.



अंक २ रा.

प्रवेश १ ला.

स्थळ:—ब-हाणपुरची छावणी.

पात्रें :—[बाळाजी जनार्दन ऊर्फ नानाफडनवीस प्रवेश करतात.]

नाना०—हाय! कोण भयंकर प्रसंग! हिंदुपद पादशाहीच्या धवल कीर्तीवर केवढा कलंक! मानीमर्दांचा किती दुःसह अपमान! हर! हर!! आज आर्यभूमीचे यशस्वी वीर नामर्द ठरले! आर्यांच्या प्रताप--सूर्याला गिलच्यांनीं ग्रासल्यामुळं तो निस्तेज झाला. आर्यांचा प्रताप-सूर्य आज निस्तेज झाला अँ! नशीब! लाखो नरसिंह अस्वलांच्या भक्ष्यस्थानीं पडावेत. महाशक्तीनं षंढाला शरण जावं! सहस्ररश्मीनं काजव्याला दिपाव! पण नको, विश्वासघात-निमकहारामपणा यांनीं ओतप्रोत भरलेल्या त्या मुकाबल्याची आठवणच नको. नको पण हानि केवढी! पारतन्त्र्याच्या असह्य श्रृंखलांत जखडलेल्या देशबंधूंना सोडविण्या-साठीं आजन्म शिणलेल्या महात्म्यांच्या तोंडाला केवढी काळोखी! [विचार करून] पण ही आतां जावी कशी! पूर्वजांनीं भोळेपणानं पाळ-लेलीं सर्पाचीं पिलं मोठीं होऊन अंगावर उड्या टाकूं लागलीं, आणि इकडं तर आमचे मंत्री, आपल्या विद्येची नुसती प्रौढी सांगून आपसांतच कलह माजवूं लागले. एकंदरींत कांहीं सुचिन्ह नव्हे. ज्यांच्या जिवावर या अफाट दर्यांत हें मराठेशाहीचं जहाज चाले, तेच नावाडी, त्याला भोंक पाडून एकेका तक्त्यांवर दूर तरंगत मजा पाहूं लागले, तर ते जहाज किती वेळ चालणार! पण मूर्खांनो, सर्वांना तरून नेणारं जहाज स्वतः फोडून, लहान लहान चिमुकल्या नावांतून जलक्रीडा करूं पाहतां, पण त्या तुमच्या नावा एखाद्या मगराच्या दाढेंत सांपडून, तुमचा केव्हां

फडशा उडेल याचा पत्ता सुद्धां लागणार नाहीं! पण बोलावं कुणाला, आभाळच फाटत चाललं तिथं ठिगळ द्यावं तरी कुठं? काय प्रालब्ध! स्वातंत्र्याचा वृक्ष कुठं नुकताच फुटतो आहे, इतक्यांत त्याच्या कुंपणालाच कीड लागून, तो फिरून उडाणटप्पु, पोळांच्या तावडींत यावा अँ! परमेश्वरा! मुकाबल्याच्या पूर्वी दुष्ट मनोविकारचं बीं पेरून, त्यावर आमच्या रक्ताचा पर्जन्य पाडण्यांत तुझा काय हेतु असेल तो असो!! ऐन तारुण्यांत जर आमच्या ऐक्याला क्षय लागला, तर स्वतंत्रता देवीची पिढी पुढं चालणार कशी? छे! केवढा अनर्थ! नाहीं—नुसत्या समशेरींत शहाणपण नाहीं—या तत्वाचा--छे, या देवतेचा अनादर झाला--आणि तिच्या क्षोभाचंच हें फळ, पण ते किती कडू--विष--नुसतं विष! देशभक्ति, स्वामिभक्ति, बंधुप्रीति, अभिमान या सांखळ्यांनीं शिव प्रभुनीं साऱ्यांचीं अंतःकरणं एकत्र आवळून, एकदिल—नुसता कोट बनवून टाकला; पण दैवगतीनं, फाटाफूट, मत्सर, दुही, यांचं रसायन तयार करवून या सामन्यांत, त्या सांखळ्यांची कडीन्कडी खडाखड तोडून टाकून, कोट भंगून सोडला! हाय! ही स्थिति पाहून मन सारखं तळमळतं, अनंत विचारांनीं डोकं भणाणून जाऊन कांहीं सुचेनासं होतं! भाऊसाहेबांनीं हा एवढा खटाटोप ज्या एका अंतस्थ बुद्धीनं केला, ते त्यांचे विचार--हिंदुंची सार्वभौमसत्ता स्थापित करण्याचा त्यांचा मनोदय डोळ्यापुढं उभा राहिला, आणि या आमच्या सध्यांच्या नाजूक स्थितीची आठवण झाली, ह्मणजे खूळ लागण्याची पाळी येते. हा गाडा, मराठेशाईचा मोडका गाडा यापुढं आतां चालणार कसा? आज कैक वर्षांची ही पेशव्याची फडनिशी आह्मीं केली, पण तिचा काय उपयोग! देवा! तुला अंत:साक्षी ह्मणतात, तेव्हां भाऊसाहेबांच्या संगतीनं माझे बनलेले विचार, या अनर्थानं, माझ्या मनांवर झालेले परिणाम, हिंदुपद पादशाहीच्या दैन्यावस्थेबद्दल मनाची होणारी तळमळ, तुला समजलीच पाहिजे! आणि त्याची जर तुला कांहीं किंमत असेल,

तर ही जखम भरून काढण्याचं यश तूं मला दे. तुझी कशीही इच्छा असो; मी तर या प्रसंगीं तुझ्या भरंवशावर पायाचा दगड ठेवणार. [विचार करून] या जखमेला तूर्त मलम तर पाहिजे रक्ताचंच. आणि तेंसुद्धां खुद्द पेशव्यांच्या घराण्यांतूनच देववलं पाहिजे. सारे कर्ते काय ते आह्मीं, या घमेंडीनं घेरलेल्या आमच्या सरदारांना, आणि अपयशानं स्वर्ग तीन बोटं उरून नाचूं लागणारे फिरंगी--निजाम--नबाब यांना चांगलीच थप्पड बसेल. दादा-दादा पाहिजेत या प्रसंगाला, ठीक आहे नंदीबैल--जरा जोरानं शेपूट पिळलं ह्मणजे लागेल चौफेर उधळायला. शहाला जय आला--आला कसचा आह्मीं होऊन दिला! तीन प्रहर जय आणि एका घटकेंत आमची धांदल अँ! ठीक आहे ह्मणावं, फडणिसाचं कलम आणि श्रीमंतांची तलवार मजबूत असल्यावर, अशा कित्येकांना आह्मीं अंगारे देऊं. हाय! पण भाऊसाहेबांसारखा मोहरा आतां फिरून होईल कां? नको, आतां ते विचारच नकोत! आधीं सुडाची व्यवस्था. जावंच लवकर, आधीं दादांची गांठ घेऊन त्यांना भारलं ह्मणजे आटपलं आपलं पहिलं काम. देवा! या मुकाबल्यामुळं हिंदुपदपादशाही बुडणार असं जगाला वाटत असेल, तर हा अपयशाचा कलंक नसून, हिंदूंच्या वैभवरत्नमालेंतला एक दृष्टमणि आहे, एवढं साऱ्यांच्या प्रत्ययाला आण. यावांचून या बाळाजीपंताची, या गादीच्या एका इमानी नोकराची, दुसरी कसलीही इच्छा नाहीं. [जातात.]

प्रवेश २ रा.

स्थळ—बऱ्हाणपूर.

पात्रें:—रघुनाथराव दादासाहेब व नाना फडणवीस. (रघुनाथराव एकटे विचार करीत पडले आहेत असा प्रवेश उघडतो.)

दादा०—हरामखोरानो! हिंदुस्थान ह्मणजे तुह्मांला बाजारचा मेवा वाटला कायरे! काय न्याय आहे, मुलुखगिरी करावीशी वाटली, चालले

हिंदुस्थानावर! लूट करावीशी वाटली, घुसले हिंदुस्थानांत! राज्य करावसं वाटलं, घेतली झोळी कीं धरली हिंदुस्थानची वाट! जशी कांहीं परसांतली भाजी, लागले खुडायला. हिंदूंची दौलत, यांच्या बापाचा माल. हिंदु—यांचे पिढीजाद गुलाम. हिंदु स्त्रिया—अरेरे काय करूं! लाही लाही होते अंगाची!! पाण्यांत बुडवून, जमिनींत गाडून, चुन्याच्या भट्टींत भाजून, कोल्ह्याकुत्र्यांकडून फाडवून, छे—पण हा सूड नव्हे! स्वत: चित्त्याप्रमाणें झडप घालून, त्यांच्या मानगुटीचं हाड दातांनीं कडाकड फोडलं पाहिजे, जोड्याच्या ठोकरीनं पालथे उलथे पाडून, सर्पासारखी त्यांचीं नरडीं कचाकच चेंचून, त्यांच्या रक्ताचे पाट वाहवले तरच तो सूड! नाहीं—आतां हा अपमान, हा छल, सहन करण्याची शिकस्त उडाली, कमाल झाली! हिंदुस्थानची संपत्ति यांच्या चैनीसाठीं, हिंदुस्थानचं पीक यांच्या खादीसाठीं, हिंदुस्थान यांच्या धिंगाण्यासाठीं, हिंदुमर्द यांच्या गुलामगिरीसाठीं, हिंदुस्त्रिया यांच्या करमणुकीसाठीं, खास—खास परमेश्वरानं निर्माण केल्या नाहींत. पवित्र धर्म, अस्सल तेज, शुद्ध उत्पत्ति जर जगांत कुठं असेल, तर तें हिंदुस्थान; नीति सत्य यांचा उगम, विद्या ज्ञान याचं भांडार, जर हुडकाल तर तें हिंदुस्थान; दया क्षमा यांचा बाजार पहाल, तर तो हिंदुस्थानांत; रत्नांच्या खाणी, सोन्याचा धूर, अमृताचा पर्जन्य जर कुठं पडत असेल, तर तो हिंदुस्थानांत. भुललात नाहींरे, नाहीं मिळालं पोटाला—चालेल भीक मागायला—कुठं—तर ह्मणे, हिंदुस्थानांत! जशी कांहीं या गिलच्यांच्या आजापणजांची मिरास! पण तुह्मांला खरं इंगीत कुठं कळलयं अजून, अब्रूची चाड बाळगणारे, अब्रूसाठीं झुरणारे, अब्रूसाठीं प्राण देणारे प्राणी जर कुठं जगांत श्वास टाकीत असतील तर तेहिपण हिंदुस्थानांत! पांचवीबरोबर समशेरीला पुजलेले, कट्यारीशीं लग्न लागलेले, जन्मभर रणमैदानाला वाहिलेले अद्वितीय योद्धे, तुमच्या कुठं ऐकण्यांत असतील—पुढं मागं पाहण्यांत येतील—तर तेहिपण हिंदुस्थानांतच! आणखी ही

गोष्ट कैकवेळां, तुमच्या कसाला पूर्णपणें उतरली असून, तुमचा भ्रम जाऊन, तुमची धुंदी अद्याप उतरत नाहीं. पण पक्की याद धरून असा कीं, तुमच्या या नीच कृतीचा चरका, साऱ्या आबालवृद्धांच्या अंतःकरणाला बसून, तें विष, प्रत्येक काळजाला झोंबलं, पुरं झोंबून गेलं. साऱ्यांच्या जिवाला एकदम हायहाय लागून, शौर्याची ज्वाळा, अंतस्थ आग एकदा भडकली, म्हणजे तुमच्यासारख्या हजारों टोळधाडी जरी एकदम पडल्या, तरी तुमचं एकेक हाडसुद्धां आमच्या वांटणीला येणार नाहीं. छे! पण आधीं सूड! आधीं सूड उगवला पाहिजे! कारण, सत्कृतीनं कृतार्थ झालेले माझे पूर्वज या माझ्या वायफळ बडबडीला कंटाळून, परमेश्वरा! असली ही विझवटी प्रजा, आमच्या पोटीं ठेवून आम्हाला सपुत्र करण्यापेक्षां, आमचे निर्वंश उडवून, हिंदुस्थान ओसाड पाडायचं होतंस! मग तें जरी एखाद्या झोटिंगानं बळकावलं असतं, तरी आम्हांला दुःख होतं ना! कारण, हिंदुस्थानांत जन्माला आलेला त्याचा कोणी त्राताच उरला नाहीं असं समजून, आम्ही बेफिकीर रहातों. कोट्यवधि प्रजा–पण उपयोग नाहीं एकाचा, सारे बेअक्कल, कमकुवत, असं समजून, ते दुःखानं–शरमेनं, डोळ्यावाटे टपाटप पाणी टाकीत असतील— (एक हुजऱ्या येतो.)

हुजऱ्या—श्रीमंत, धनीसाहेब—

दादा०—(न ऐकतां) तुझ्या पोटीं येऊन तुला छळीन अशी प्रतिज्ञा करून जन्माला आलेल्या, या आम्हां दावेदारांच्या नादान वर्तणुकीमुळं, ही आर्यमाता, देवा! माझ्या जन्माचा तमाशा करणारे सांग, माझ्या पोटीं घालण्यापेक्षां, मला एकदम महासागराच्या खोल खळग्यांत कां गाडून टाकीत नाहींस–असं म्हणून, सारखी गडबड गडबड लोळत असेल! हाय! मातापितरांचा केवढा तळतळाट? किती घोर! भयंकर पातक हें!

हुजऱ्या :--धनीसाहेब.

दा०—(त्यास पाहून) कोण ?

हु०—श्रीमंत मी.

दा०—काय ?

हु०—फडणीस आले आहेत आपल्या भेटीला.

दा०—फडणीस! कोणचे बुवा ?

हु०—बाळाजीपंत.

दा०—बाळाजीपंत! बाळाजीपंत फडणीस माझ्या भेटीला आले आहेत ? काय करूं, छे-भलतंच--जा, त्यांना पाठीव आंत. भाऊबरोबर पानपतांत गेलेल्या या शहाजोग हिऱ्याला, हें लपवलेलं--काळं--कोळशासारखं तोंड दाखवूं तरी कसं! भाऊ! तुझ्या मनाला लागलेली हळहळ!! तुझे हेतू!!!

(फडणीस येतात.)

ना०—आर्यमातेची कीर्ति दिगंतरीं गाजवून, आर्यबंधूंचं आर्यत्व कायम राखण्याशिवाय खऱ्या आर्यपुत्राचे दुसरे कसले हेतु असणार!

दा०—या, काय ह्मणतां फडणीस, भाऊ, माझा भाऊ खरा आर्यपुत्र नाहीं बरं!

ना०—यांत काय संशय. आर्यमातेचा खरा प्यारा! गळ्यांतला ताईत!! नुसता तन्मणी!!!

दा०—गळ्यांतला ताईत! माझा भाऊ गळ्यांतला तन्मणी!! ओहोरे भाऊ!!!

ना०—आर्यमातेच्या नथींतलं अस्सल पाणीदार मोती!

दा०—होय, पण आतां तें गळून पडलं. आर्यमाते, तुझ्या मनाला केवढी हायहाय लागली असेल!

नाना फ०— 'हाय हाय' केवढी ह्मणून पण! कल्पनाशक्तीला अगदीं अगम्य! मुक्ताला नर्कवासाची, ज्ञान्याला अज्ञानाची, वैराग्याला प्रपंचाची, प्रेमाला वियोगाची आणि स्वातंत्र्याला परवशतेची जर शिक्षा दिली, तर त्या त्या अंतःकरणाला होणाऱ्या वेदना एक त्याच्या त्यानंच जाणाव्या. जिच्या लौकिकासाठीं स्वर्गासारखीं सुखं झुगारून, हजारों संकटांचा बोजा आपल्या डोकीवर घेतला! जिच्या उत्कर्षासाठीं दांताला दांत लावून भाऊसाहेबांनीं कडकडीत उपास काढले! जिच्या कीर्तिसाठीं भाऊसाहेबांनीं या भडकलेल्या काळकुंडांत आपल्या तीन लाख भावंडांनिशीं उडी घेतली! अशा सत्पुत्राचा वियोग, अगदीं कायमची ताडातोड झाली, तर त्या प्रेमळ आर्यमातेच्या अंतःकरणाच्या दुःखमय स्थितीचं वर्णन प्रत्यक्ष व्यासांनं कंबर बांधून आपलं कलम उचललं, किंवा खुद्द बृहस्पतीनं बोलण्याचं अवसान घातलं, तरी त्या वर्णनाचं एक वाक्यसुद्धां त्यांना सरळ साधणार नाहीं. वाहवारे कुलदीप! आर्यदीप!!

दादासा०—(स्वगत) फडणीस कांहीं हिंदुस्थानांतून जादू तर घेऊन नाहींना आले. कारण त्यांचा प्रत्येक शब्द, विद्युत्पाताप्रमाणं, उल्हाट यंत्राच्या तांबड्या लाल जळजळीत गोळ्याप्रमाणं, माझं हें, इंद्रवज्रासारखं कठीण अंतःकरण भेदून, माझ्या या मठ्ठ डोक्यांतल्या फत्तरांचे सुरुंगाप्रमाणं तुकडे तुकडे उडवून देत आहे. खरा आर्यपुत्र! कुलदीप!! आर्यदीप!!! माझा भाऊ! आणखी मी! पण आधीं माझं कुळ! छे, कुळ तर एकच--यांत शंका कसली! बाळाजी विश्वनाथांचे मुलगे दोन. एक बाजीराव आणि एक आप्पासाहेब. त्यांत मी बाजीरावांचा, आणि भाऊ आप्पांचा. हाय--किती क्षुल्लक फेर--आप्पांचे वंशज कुलदीप, आणि रावांचे कुलकलंक! माझ्यामुळं पेशवाईतल्या पुण्यपुरुषांना कलंक अं! धिक्कार! धिक्कार! धिक्कार!!! यापेक्षां बैल---बैल जरी असतों-- तरी चाबकांचे हजारों तडाखे खाऊन जगाच्या कांहीं

तरी उपयोगीं पडतो! पण देवा माझ्यासारखीं निरुपयोगी निर्लज्ज माणसं जन्माला घालून या पुण्यभूमीला निरर्थक कमीपणा कां आणतोस!!

नानाफ॰—कसला एवढा विचार चालला आहे धन्यांचा?

दादासा॰—धनी–फडणीस माझ्यासारखा धनी शोभतो कांहो तुह्मांला? तुमच्या धन्याच्या कुळांत–ज्या कुळांत भाऊसारखे कुलदीप जन्माला येऊन हें कुळ शोभविलं–अशा कुळांत–मी नुस्ता जन्म घेतला ह्मणून तुमचा धनी?—नित्यशः अन्नपाण्यावांचून ज्याची प्रजा डोळे पांढरे करून प्राण सोडते, तरीसुद्धां त्याला दाद लागत नाहीं, आपली प्रजा, आपलीं पोटचीं पोरं, जितीं अगर मेलीं याचासुद्धां ज्याला पुरता पत्ता असत नाहीं, अशा नराधमाला, फडणीस, तुह्मीं कधींतरी यजमान, मालक, धनी, असं ह्मणाल कायहो! त्याच्याबद्दल तुमचं अंतःकरण कधींतरी शुद्ध राहील? एक वेळ तरी तुह्मीं त्याचं कल्याण चिंताल का? नाहीं! कालत्रयीं नाहीं!! आतां, स्वाभाविक सरळ वृत्ति, यजमान या शब्दाचीच किंमत, ह्मणून चुकून एखादेवेळीं रामराम, पण छे, रामराम कसचा तो, मानेवर धोंडा, निव्वळ जुलुमाचा रामराम!

नानाफ॰—झाला, हा आपला एक पक्ष झाला. माझं मतच जर ह्मणाल तर जिथं तिथं सेव्यसेवकभावाची ही अशीच दुर्दशा. बाकी प्रमाणच जर पाहिलं तर यजमान जास्त खराब यांत शंकाच नाहीं; पण नुसते त्यांच्याच नांवानं खडे फोडण्यांत मात्र पक्षपात दिसेल. वास्तविक पाहिलं, तर नोकरांच्या इमानावरच यजमानाचा उत्कर्ष! तानाजीसारखीं उत्कृष्ट स्वामिभक्त रत्नं शिवप्रभूजवळ होतीं, ह्मणूनच त्यांनीं आर्यमातेच्या मस्तकावर स्वातंत्र्याचा रत्नखचित मुकुट चढविला, दुर्दैवानं संभाजी महाराजांच्या कारकीर्दीत त्या रत्नाच्या ठिकाणीं कांचेचे खडे येऊन त्याची शोभा गेली, एकवार सांधलेलं कोंदण बिघडलं–पण धनाजी, संताजी, पंत, यांच्यासारखे उत्कृष्ट कुशल कारागीर त्या वेळेला

होते ह्मणूनच तें काम फिरून बेमालूम वठलं. थोरल्या श्रीमंतांनीं, अर्थात् आपल्या आजोबांनीं त्या मुकुटाला बादशाही मोत्यांचा एक झुबकेदार तुरा लटकावून दिला, बाजीराव साहेबांनीं साऱ्या हिंदुस्थानांतलं अस्सल जवाहीर गोळा करून एक बिनमोल शिरपेच त्याला चढवून दिला, आणि श्रीमंत नानासाहेब, भाऊसाहेब, त्या मुकुटावर साम्राज्याचं दिव्य छत्र धरणार, इतक्यांत आमच्याच मंडळीनीं समजून उमजून, निव्वळ कृतघ्न-पणानं तो मुकुट छिन्नविछिन्न करून या पानिपतच्या आगींत—

दादा०—बस्स, पुरे फडणीस—कोट्यवधि प्रजा जिवंत असून मूठभर भामट्यांनीं, भर दिवसा आर्यदेवीच्या अंगाला हात लावून, तिच्या मस्त-कावरचा स्वातंत्र्याचा मुकुट, या पानिपतच्या समरभूमींत पाडण्याचा प्रयत्न केला अं! हाय!! आपल्या सत्तेच्या जागेंत कैदी होऊन राह-ण्याची वेळ यावी!! स्वयंभू हक्काचा डोळ्यादेखत चुराडा उडावा! कुत्र्याप्रमाणं लांगूलचालन करण्याची पाळी यावी! आपण भोगलेल्या सिंहासनावर दुसऱ्याला बसवून, त्याच सिंहासनाखालीं सारवण्याचा अगर केर काढण्याचा प्रसंग! आराध्यदेवतेचे आपल्या डोळ्यांदेखत तुकडे! आपल्यासमक्ष आपल्या साध्वी स्त्रीचा छळ! यापेक्षां अशा रीतीनें आपल्या ज्ञातीला, आपल्या जन्मभूमीला लाजवण्यापेक्षां आपल्याच हातांनीं आपल्या माना मुरगाळून पटापट प्राण सोडलेले काय वाईट—धिक्कार! (विचार करून) फडणीस, आपण आतां काय बोललांत बरं, एकाएकीं माझ्या अंतर्दृष्टीला आमच्या या रमणीय चेहऱ्याचं प्रतिबिंब असं भेसूर कां बरं दिसतं! 'समजून उमजून--निव्वळ कृतघ्नपणानं' हे तुमचे संदिग्ध शब्द-- पिशाच्याप्रमाणें जिथं तिथं नाचताहेत, असं कां बरं मला वाटतं? घात!

नाना०—रावसाहेब सर्वस्वी घात! बेईमान, आपमतलब या समंधांनीं आह्मांला घेरलं!

दादा०—नाहीं हो, फडणीस या समंधांची सावलीसुद्धां माझ्यावर पडली नाहीं. याच अपमानांची मला शरम, हीच लाज, आणि यासाठींच हें तोंड एकदम काळं करून–

नाना०—छे पण हें काय? आपल्याला कोणी काय ह्मटलं. आपल्यापुढं आपली बेमुरवत करण्याची आमची कुदरत? आपल्याला जें काय वाटतं, आपल्या मनाला जी गोष्ट खाते ती प्रेम–शुद्ध प्रेमाचं खुळ आहे. सारासार विचार जगांतून अगदींच नाहींसा झाला नाहीं, बेईमान, कृतघ्नपणा हें जें मी कांहीं ह्मणतों याची वांटणी आपल्या मंडळींत–

दादा०—काय फडणीस, आमच्या मंडळींत याची वांटणी?

नाना०—अलबत, आपल्या मंडळींत, आपल्या प्रीतिपात्र विश्वसनीय सरदार मंडळींत.

दादा०—आमच्या सरदार मंडळींत?

नाना०—हो, हो, पेशव्यांच्या नाकांतले अगदीं बाल!

दादा०—काय फडणीस? पेशव्यांच्या नाकांतले बाल! आंब्याला कवंडाळ! गोमातेला विष!

नाना०—हें पहा, हें विष आहे कीं दूध आहे याची खात्रीच करून घ्या कशी, (एक पत्र देतात.)

दादा०—(पत्र वाचून) अरे थेरड्या, कोठंबा घेऊन भीक मागावयाचं तुझ्या नशिबाचं चुकवून ज्यांनीं तुला इतमामाला चढविलं त्यांच्याशीं हें इमान! अरे मात्रागमन्या!!

नाना०—आणि समजून उमजून बाळगलेली ही अस्तनींतली आग-तो नजीब्याच या प्रळयाला कारण!

दादा०—हे शिंदे-होळकर–हे धनगर पाटील–हे पेशव्यांच्या पायांतले पायपोस इतके शिरजोर अं! धन्याच्या उत्कर्षाचं नोकराला

वैषम्य, पेशव्यांचीं धोतरं बडवावीं लागतील हीं यांना भीति! जोडे उचलतांना, मशाली धरतांना जन्म गेला चोरांचा. अरेरेरे! सर्प, कृष्ण सर्परे हे! यांना, बाबांनीं दूध पाजून वाढवलं ह्मणून हे आमच्याच आंगावर उड्या टाकूं लागले अं! दांत पाडून पोतडींत घालणारा कोणी उरला नाहीं, असं वाटलं ह्मणून आमच्या अपरोक्ष हीं तुमचीं कारस्थानं! हाय! प्रालब्ध पक्कं फिरलं! चंद्रकिरणापासून आग व्हावी! रत्नमालांचे सर्प बनावेत! नाहीं, आमचं नशीब कांहीं धड नाहीं! स्वातंत्र्य भोगण्याची आमची लायकीच नाहीं! गुलामगिरी करावी--दुसऱ्यांच्या लाथा खाव्या--तिसऱ्यांनीं चघळलेले तुकडे खाऊन पोटं भरावीं हेंच आमचं नशीब! हे आमचेच जातभाई, कसाबाप्रमाणं आमच्या माना कापूं लागले--परक्याला घरांत घुसवून आपण होऊन आपल्या सर्वस्वाची किल्ली बेगुमानपणानं त्याच्या स्वाधीन करूं लागले तर आमचं ऐश्वर्य आह्मांला किती दिवस पुरणार! आमचं स्वातंत्र्य--आमच्या कृतीनं होणारं भाडोत्री स्वातंत्र्य आह्मांला किती दिवस टिकणार! वाटोळं--निखालस वाटोळं करणार हे मांग! जेवलेल्या ताटांत मलोत्सर्ग! जन्मस्थानीं पापवासना! किती घोर कर्म!!

नाना फ०—पण परिणाम पहा! कोणाच्याही बुद्धीनं दुसऱ्याशीं संबंध ठेवा, दुश्चिन्हाचा पहिला डोहाळाच तो--अपसांत मत्सर--दुही--जितकी माजेल, आपल्या शहाणपणाचा उपयोग अपसांत एकमेकांच्या उरावर बसण्याकडं जितका आह्मीं करूं, तितका परक्याच्या इष्ट हेतूच्या इमारतीचा पाया मजबूत! नवसावांचून फळ! यजमानावरची श्रद्धा उडून अंगांत कलीचं वारं शिरणं, एका हाडारक्ताचा संबंध विसरून जाणं, तुटपुंज्या ज्ञानाबद्दल घमेंड बाळगणं, स्वत्वाबद्दल अनास्था, आणखी स्वधर्म–स्वदेश यांच्याबद्दल जिथं तिरस्कार उत्पन्न झाला तिथं यादवी–आणि यादवीचा परिणाम सर्वक्षय हा ठरलेला.

दादासा०—भाऊ तूं कधींही अपेश घेतलं नसतसरे! या हस्तिदंति काऱ्यांत गुरफटून तुला पिळून घेतला या बेरडांनीं! गिलच्या ह्मणजे कोणी देव नव्हता! पहिल्या झडपेबरोबर त्याला गिळून टाकला असतास! पण काय करशील! या नीचांच्या नादानं आपली मान—आणि हिंदूंचा मान—

नाना०—छे, छे, छे, आपली मान दिली; पण हिंदूंचा मान त्यांनीं राखला! पृथ्वी दणाणून भर दिवसा त्यांनीं सूर्यनारायणाला तोंड खालीं करायला लावलं! एकच कल्होळ उडवून दशदिशा काळ्या ठिक्कर पाडल्या! धुळीच्या मार्गानं आपल्या मर्दुमकीची बातमी स्वर्गलोकापर्यंत पोंचविली! 'हरहर' शब्दानं आकाशपाताळ हालवून सोडलं! तरवारीच्या चमकेनं विजेला दिपवून, सिंहनादानं मेघगर्जना फिक्की पाडली! कबंध नाचवले!! दादासाहेब, असा संग्राम एक देवादैत्यांनीं अगर हिंदुमुसलमानांनींच खेळावा. छातीशीं छाती! मांडीशीं मांडी! छे, आठवण झाली ह्मणजे असं वाटतं, कांहीं नाहीं—त्यांनीं साऱ्यांची अक्कलच गुंग करून सोडिली. सामनापर सामना! हाय! पण आमच्या साथीदारांनीं ऐन रंगांत बेसूर करून सारा बेरंग उडवून दिला!

दादा०—भाऊ! या गळेकापूंचा घोंटाळा तुझ्या लक्षांत कसारे आला नाहीं?

नाना०—छे, घोंटाळा तर त्यांच्या लक्षांत आलाच. पण आपल्या पक्षाचं अवसान-ही आपली नाजूक स्थिति दुसऱ्याला कळून आपला बदलौकिक होऊं नये ह्मणून प्रत्येकवेळीं अगदीं शांतपणा धरून, साऱ्यांना थोपवून, आह्मी लाखोंजण एक जिवाचे आहोंत हें दाखविण्याकरितां, हिंदूंची सार्वभौम सत्ता गाजविण्याकरितां, त्यांचा हा सारा एवढा खटाटोप! एकधर्माचे--एक हाडाचे--एक रक्ताचे आपले लोक ऐनप्रसंगीं सुद्धां असा गळा कापतील हें त्यांना काय ठाऊक!

दादा०---कायमचं निर्जीव करण्याची वेळ आणिली गुलामानीं! कालचक्र फिरलं ह्मणूनच आमच्या मंडळींत या दुष्ट वासनेचा फैलाव!

नानाफ०—दादासाहेब, काय काय ह्मणून आठवावं! दिल्लीच्या तक्तावरचं छत भाऊसाहेबांनीं फोडलं, रुसले सुभेदार--फिरलं जाटाचं माथं—काय ह्मणे, तर दिल्लीचे बादशहा त्यांचे यजमान!

दादा०---आहारे यजमान! जस कांहीं तिकडून येतांना, आह्मीं तक्तावर बसणार, तेव्हां छत-सिंव्हासन करायला लागतील ह्मणून, हिऱ्यामाणकांचीं, चांदीसोन्याचीं गांठोडींच बांधून आणिलीं होतीं गुलामानीं! अरे तो छत--तें सिंव्हासन--तो ताजमहाल कुणाचा! सारं आमचं! आमचा छल करून जुलुमानं लुटलेली आमचीच ती दौलत! काय न्याय आहे पण! चोर ते चोर शिवाय शिरजोर! आणि आपल्या देशाच्या अब्रूची राखरांगोळी करणारी ही जाटांची स्वामिभक्ति! यंरे स्वामिभक्ति!! अरे हिंदुस्थानचा बादशहा कोण! एक छत्रपति! हिंदुस्थानचे खरे मालक फक्त एक हिंदु! दुसऱ्या गट्टीचोरांना आह्मीं जुमानीत नाहीं! जाणत नाहीं! भीक मागायला आलेलं भिकार, यापेक्षां ज्यास्त काय त्यांची किंमत!

नानाफ०—या साऱ्या गोष्टी अगदीं सरळ आहेत; पण दैवगति कशी विचित्र आहे पहा! सुभेदार साहेबांची नाडी मूळपासूनच बिघडलेली. आधी एवढा मोठा मोहोरा इरेला घातला कां इथूनच त्यांची सुरुवात! तुह्मीं कोणताही विषय काढा, पोक्तपणाचा आव घालून त्यांनीं हाणून पाडलाच. सुभेदारांचें हें मुलाम्याचं वर्तन आमच्या तापट बळवंतरावाला कुठलं खपायला. त्यांचीन त्यांची नेहमीं झक्कड उडायची! निर्भीड प्राणी पडला तो, बिलकुल मुरवत ठेवायचा नाहीं, लगे हात, एक घाव दोन तुकडे, कीं गेले काका फुगून. आर्जव करतां करतां ह्मणजे नाकीं नव यायचे. एक एवढ्या मंडळींत जनकोजी मात्र अगदीं शिरा माणूस! इब्राहीमखान गारदी--धडधडीत मुसलमान--पण बडा नेकजात!

अखेरपर्यंत नाहीं तर नाहींच शहाला बधला! तो पळपुटा महादजी शिंदा--महानीच माणूस--आमचे विंचूरकर लढवय्ये पण अवसानघातकी. गायकवाड इतर वेळीं कसे वागोत; पण प्रसंगाला हुकमी. काका तर खंडोबा करायला सूत्रधारच! आमची सल्ला घेतल्यावांचून आलांत कसे येथूनच त्यांची नांदी!!

दादा०—रास्त आहे. पेशवे हिंदुस्थानांत आल्यावर होळकरांना कोण धूप घालणार! मग त्यांच्या बडेजावीला पुसतो कोण! ठीक आहे, काकासाहेब, पेशव्यांचीं धोत्रें बडवावीं लागतील या भीतीनं खूप दिलात यळकोट उडवून! नजीबाला ' खळी ' राखून चांगली अजरामर कीर्ति केलीत!

नानाफ०—कीर्ति--केवढी ह्मणून पण—कोणी तोंडच्च वर काढूं नये! झाल्या--गोष्टी होऊन गेल्या. अपयशाची तप्त मुद्रा बसली ही कायमची! कारण कोणी उरलाच नाहीं!

दादा०—काय? फडणीस, कुणापुढं आहांत तुह्मीं? कुणी नाहींच उरलं अं आतां! मेल्या आईचं दूध प्यालेले--मणगटांत बांगड्या भरलेले--सारे क्षौरीच उरले अशी आपली समज आहे वाटतं! नीट विचार करून बोला, ज्यानं मृत्युलोक सोडला तोच या दादाच्या तडाख्यांतून सुटला! अरे गिलचे ह्मणजे बिशाद काय! मारे कणसांसारखे झोडपून पिटून काढीन! दादा जिवंत असतांना, आर्यांचं यश घेऊन अटकेपलीकडे पाऊल टाकण्याची कुणाची प्राज्ञा आहे! आतां यांना वाटेल तसे तुडवूं या घमेंडींत ते खुशींत गाजर खात असतील, पण त्यांच्या तोंडांत हाडकं-हाडकं कोंबीन समजलात! हताश झालेल्या आर्यपुत्रांच्या माना निर्दयपणानं यांनीं ज्या हातांनीं झपाझप उतरल्या--अनाथ आर्यभगिनींना यांनीं ज्या हातांनीं ओढलं--ते त्यांचे हात दिवट्यांप्रमाणं पेटवून सारी आग-आग करून सोडीन! खूप समजून असा कीं या दुसऱ्या

भारती युद्धांतल्या अश्वत्थाम्याचा छापा अजून पडायचा आहे! बादशहा--नबाब--सरदार--मानकरी या साऱ्यांची कत्तल करून, अटकेवर यांच्या हाडांचे बुरूज रचून त्यावर हिंदुपदपादशाहीचे झेंडे नाहीं फडकावले, तर श्रीमंत बाजीराव साहेबांची ही शुद्ध उत्पत्तीच नव्हे! (एक हुजऱ्या येतो.)

हुजऱ्या—थोरले यजमान बोलावतात आपल्याला--किंचित् सवड असेल तर---

दादासा०--ठीक आहे, मला भेट पाहिजेच आहे. हुकूम मिळाला तर ठीकच, नाहीं तर बेहत्तर आहे, हाच या छावणीला रामराम. फडणीस, भाऊच्या मागं, आर्यभूमींत कोणी खरा आर्यपुत्र उरला आहे कीं नाहीं हें आतां नीट डोळे उघडून पहा. सूड! (रागानं निघून जातात.)

नानाफ०--वाटलं होतं मला, पण कांहीं नाहीं. मूळचीच आग भडकलेली. जगन्नियंत्या! माझ्या भावी चरित्रनाटकाची पहिली प्रस्तावना तर खूब बहारीची होणार, पुढही पण सारा तूंच आहेस. (जातात.)

प्रवेश ३ रा

स्थळ--बऱ्हाणपूर.

पात्रें--श्रीमंत रावपंडित पंतप्रधान नानासाहेब, दादासाहेब, फडणीस, शिंदे, होळकर, विंचूरकर वगैरे सरदार मंडळी. (नानासाहेब अंथरुणावर पडले आहेत असा प्रवेश उघडतो.)

श्री० नाना०—फडणीस, माझ्या कारकीर्दीचा शेवट अशा तऱ्हेनं व्हावा, यापेक्षां, परमेश्वरानं बाबासारख्या दिव्य पुरुषाच्या पोटीं मला कशाला घातलं! हाय! आपल्या देशांत मुसलमानांनीं येऊन, आमच्या

तोंडाला मुसकीं घालून, सार्वभौम सत्ता भोगावी! आह्मांला बिनदिक्कत लाथेखालीं तुडवावं! आमच्या धर्माची नाचक्की करून आमच्या देवता फोडाव्यात! आमची संपत्ति लुटून आह्मांस एका दगडाला महाग करावं! कोट्यवधि लोकांना उलट धर्मार्थ पोसतां येईल इतकं धान्य आमची आर्यमाता आह्माला देत असून, आह्मांला पोटाला घड्या बांधण्याची पाळी यावी! अगणित संपत्तीनं भरलेला आमचा देश, पण आह्मांला काळा दोरासुद्धां गळ्यांत बांधायला मिळूं नये! अशी आमची स्थिति होऊं नये, ह्मणून शिवछत्रपतींनीं, अविश्रांत श्रम घेऊन स्वातंत्र्याचा वृक्ष लावला, रावांनीं त्याला पाणी घालून तो वाढवला, आणखी माझ्या कारकीर्दींत, तो पाळामुळांसुद्धां उलथून पडण्याची वेळ यावी काय! हायरे नशीबा!! छत्रपति महाराजांना दिल्लीच्या तक्तावर बसवून, हिंदुस्थानांत हिंदूंचं साम्राज्य करण्याचे माझे विचार! हाय!! पण ते विचार सिद्धीस नेण्याकरितां रात्रंदिवस धडपडणारा माझा भाऊ! भाऊ कुठं आहे!! अरे भाऊ!!!

दादा०—इतकं दिलगीर होण्याचं बिलकुल कारण नाहीं, नुसतं हूं ह्मणा, ह्मणजे सिंधूचं पाणी पिऊन, अटकेंत न्हालेले माझे घोडे चारी खंडांत नाचवून, प्रत्येक मिय्याला कोरड्याखालीं फोडीत-फोडीत इथं घेऊन येतों! आर्यांच्या प्रखर खड्गाचं पाणी साऱ्यांना पाजून, अस्सल क्षात्रतेजानं त्यांना आंधळे करून-आर्यमातेकडं वांकड्या नजरेनं पाहिलेले डोळे फोडून-तिच्या ऐश्वर्याच्या वासानं गुंगलेलीं नाकं उभीं चिरून-तिला शोषून धष्टपुष्ट झालेलीं शरीरं फाडून-चिंध्या नुसत्या चिंध्या उडवून देतों! भाऊ तर गेलाच; पण तो आपल्या बरोबर हिंदूंचं शौर्य-त्यांचा पीळ-अभिमान हा कांहीं बरोबर घेऊन गेला नाहींना? त्यांच्या हृदयांत भडकून राहणारी संतापाची ज्योत त्यानं कांहीं मालवली नाहीं! ती तर जास्तच चेतली! जाणूनबुजून काळसर्पाच्या अंगावर उड्या टाकल्यात, पण आपल्या जालीम विषानं जाळून—

पोळून-भस्म करून टाकतील! सूड! सूड उगवायचा मग त्याला उशीर कां? जोंपर्यंत गिलच्यांनीं आपल्या देशांत जयाच्या नौबदी सुरू केल्या नाहींत, या असंभवनीय पराजयाची बातमी जोपर्यंत कानाकोपऱ्यांत जाऊन थडकली नाहीं, पानपतांत पडलेल्या देशबंधूचं रक्त गोठून, त्यांच्या अस्थि जोंपर्यंत दुसऱ्यांनीं तुडविल्या नाहींत, तोंपर्यंत, जर त्या त्यांच्या दुष्मानाच्या रक्तानं शुद्ध केल्या तरच तो सूड! अपकीर्तीचा डंका एकवारं चोहोंकडं वाजून चुकल्यावर, मग जरी त्रैलोक्य जिंकलें तरी काय उपयोग! नुसता आशीर्वाद द्या, ह्मणजे प्रत्यक्ष काळ जरी पुढं जबडा पसरून उभा राहिला, तरी त्याचा जबडा फाडून-दांत पाडून-त्याला रडत ओरडत परत पिटवून लावीन! दादाची समशेर एकदां बाहेर पडल्यावर कोणीही सामन्याला उभा राहो, त्याचं रक्त प्यायल्याशिवाय ती कधींही मागं फिरणार नाहीं!

श्री० नाना०—रघुनाथ, तूं तसाच आहेस प्रतापी! अब्रू संभाळशील. हाय! अब्रू, पण आमची अब्रू गेली कशी! विजयादशमी जवळ आली, ह्मणजे हे भवानीचे भक्त, जगदंबेचा प्रसाद घेऊन, पविते ठोकीत, मिशांना पीळ भरीत--आतां दिग्विजयाला बाहेर पडतील, या भीतीनं आपली आयुष्यमर्यादा संपली, आपला काळ जवळ आला, अशी उरांत धडकी बसून या चोरांची अगदीं पाचांवर धारण बसावी! झोंपेंतसुद्धां, मराठ्यांचे बाण, बरच्या, भाले उरांत रुतून अगदीं प्राणांतिक वेदना होतात ह्मणून यांनीं आरडत ओरडत उठावं! महाकाली, फत्तेमारी यांचे गडगडाट सुरू होऊन स्त्रियांचे गर्भपात होतील, या भीतीनं ज्यानीं आपला जनानखाना दूर लांबवावा! मराठे अमक्या दिशेला निघाले, एवढं कळलं कीं पुरे, पुढं पन्नास पन्नास कोस प्रदेश उजाड पडावा! मराठे आतां तोडतील-जाळतील ह्मणून बड्याबड्या नबाबांनीं लपून--छपून बसावं! त्यांचीच आज कोण मिजास! आणि आह्मां मराठ्यांची, माझ्या डोळ्यांदेखत कोण दुर्दशा!!

विंचूर०—दुर्दशा-पुरी दुर्दशा! भगवन्, महाराष्ट्राची प्राक्तनरेषा इतक्या लवकर कशी बदलली! महाराजानीं आर्यपुत्रांच्या मानेवरच्या सुऱ्या काढून, त्याचं स्वातंत्र्य फिरून संपादन केलेल्याला, अद्याप पुरं एक शतकसुद्धां लोटलं नाहीं, तोंच त्यांच्यावर काय हा प्रसंग! हरहर! यापेक्षां थोरले महाराज, थोरले रावसाहेब, यांच्या अमदानींत एखाद्या हलकट जनावराचा जन्म जरी मिळता, तरी आमचं सार्थक झालं असतं! अपयशानं काळोखी आलेलीं तोंडं आज जगाला दिसलीं तरी नसतीं, आणि हा रक्तपात–

दादा० :—रक्तपात–रक्तपात घटकोघटकीं पुरवला! पण असल्या या निर्लज्ज प्रजेची उत्पत्तीच बंद होऊन लाखों घराणीं जरी ओस पडलीं तरी पतकरलीं! पण या घरबुडव्या मंडळीचं नांव, वारं–वारंसुद्धां नको! ज्या राष्ट्रांत, ऐक्याचा-निष्कलंक प्रेमाचा असा वरचेवर अभाव, त्याचा इतिहास अशाच अपमानकारक गोष्टींनीं भरलेला असला पाहिजे. निस्सीम देशभक्ति-स्वाभिमान हाडाशीं कितीही खिळलेला असो, त्याच्यावर महत्वाकांक्षा-मत्सर यांची नुसती छाया जरी पडली, तरी तो मनुष्य राष्ट्राचा विघातक झालाच पाहिजे—

श्री० नाना० :—देवा, कांहीं कर, कसलीही स्थिति आण; पण ही असली काळतोंडी प्रजा उत्पन्न करून आमचे शुद्ध वंश बाटवूं नको!

नाना फ० :—श्रीमंत, तेवढं नष्टचर्य मात्र आतां केव्हांही नाहींसं होणं नाहीं. या मुकाबल्याच्या कारस्थानांत कित्येक दुष्ट मनोविकारांची पेरणी होऊन, कित्येकांना हिंदुस्थानांत हवा तसा नंगा नाच करायला सवलत मिळाली! इतक्यांत जर एखादा पंचाक्षरी भेटेल, तर कांहीं घडगत आहे, नाहींतर ही अगदीं आकाशवाणी समजा कीं, पुढल्या शतकाच्या ह्याच सुमारास या पेरणीला येणारं विष आणि हीं खादाड पिशाच्चं साऱ्या आर्यावर्ताला पिळून–चिंबून अगदीं निःसत्व–निस्तेज करून टाकतील—

दादासा०—काय! हीं पिशाचं साऱ्या आर्यावर्ताला पिळून—निःसत्व—निस्तेज—करून टाकणार! केव्हां? आधीं दादाच्या झपाट्यांतून टिकतील तेव्हांना? खांबाशीं आवळून, वेतानं पाठीचीं सालडीं लोळवून, खोल भुयारांत गाडून—पुरून टाकीन!

मल्हार०—आह्मी हयात असतांना आधीं त्याना वर डोकीं काढूं देऊं तरना—

दादासा०—बस्स! काकासाहेब, माफ करा—अगदीं बिलकुल तकलीफ घेऊं नका.

मल्हार०—यजमान यांत तकलीफ कसली?

दादासा०—हो खरंच, तकलीफ तर नाहींच! कारण साधलेली कलाच ती!

मल्हार०—मला नाहीं समज पडत ह्या हुकुमाचा.

दादासा०—बस्स करा, लाज नाहीं वाटत बोलायला, इतकी जीभ सैल—छिनून सोडीन!

मल्हार०—आपल्याकडून उपमर्द झाला तर तो मायबापानींच केला, माझा अधिकारच—

दादासा०—अधिकार! मायबापांच्या मानेवर कट्यार चालविण्याचा तुमचा अधिकार!!

मल्हार०—श्रीमंत पण माझ्याकडून असं—

दादासा०—झालं काय? पेशव्यांचीं धोतरं बडवावीं लागतील ह्या भीतीनं, त्या नजीब्याला बगलेंत मारून, आमच्या साऱ्यांच्या उरावर त्याला नाचवून--आर्यांच्या शुभ्र कीर्तीवर काळे पट्टे ओढून स्वराज्याच्या स्वातंत्र्याच्या भव्य मंदिराला आग लावून--अपमानाचं जड जूं आमच्या मानेवर लादून--आर्यमातेला त्या नीच जातीकडून भ्रष्ट करवून—आर्यावर्ताचा बोलबाला त्रैलोक्यांत गाजवून, हिंदुपदपादशाहीचा विजयझेंडा

हिमालयाच्या माथ्यावर फडकवणाऱ्या मर्दांना, निव्वळ जाणूनबुजून काळाच्या दाढेंत ढकललेंत! आणखी फिरून काय केलं--काय झालं--ह्मणून दिमाखानं विचारतां, कांहीं काडीची तरी शरम! काकासाहेब, आपल्या हातानीं आपल्या देशबंधूंचे गळे कापून, पवित्र आर्यमातेच्या अंगावरचा पदर स्वतः दूर करून, तिची काया जगाला उघडी करून दाखविण्याकरतांच तुह्माला बाबानीं हिंदुस्थानची सुभेदारी सांगितली नाहीं बरं! आपल्या हातानीं आपला धुव्वा उसळून, पारतंत्र्याच्या चरकांत आपल्या देशबंधूंच्या माना कोंबण्याचाच मंत्र त्यांणीं तुमच्या कानांत फुंकला वाटतं! आपल्या भावंडाचे--पोरांचे--यजमानाचे खून करण्यासाठींच ही समशेर तुमच्या हातांत दिली असेल! [होळकरांची तलवार गळून पडते] छे, अहो उचला--उचला ती तलवार! कशाला पाहिजे ही तुह्मांला पेशव्यांची भगभग! भाऊ गेला--विश्वास गेला--माधव नारायण तर काय ढेकणासारखे आंथरुणांत चिरडाल, नानासाहेब तर शरपंजरीं पडलेच आहेत, येऊन जाऊन काय तो मीच, आटपा, उडवा भंडारा, मग घाला हैदोस हवा तेवढा! पाहिजे तर रामराजाला खालीं ओढून छत्रपतीचं तक्त तुमच्या इराणी दोस्ताला विका! आमच्या बायकांचीसुद्धां द्या खिरापत उडवून, आणि व्हा तुह्मींच हिंदुपदपादशाहा!

श्री० नाना० :—रघुनाथ, पेशव्यांच्या घराण्यातलं एक पोर जींवंत असेपर्यंत छत्रपतीच्या तक्ताचा असा तोंडानंसुद्धां अपमान करूं नको. छत्रपतीचं सिंहासन जाग्यावरून हालल्यावर मग हें पेशव्यांचं घराणं काय पेटवायचं! आधी पेशवे जातील, मग जें नशिबीं असेल तें होईल हीं हाडं एकत्र असल्यावर, बिशाद काय दुसऱ्याची नुसती त्यावर सावली टाकण्याची! बाबा, माझ्या कारकीर्दीची अखेर अशी विघातक होणार, ह्मणून साऱ्यांची बुद्धि गेली. मीच अभागी! दुसऱ्याला काय ह्मणून दोष! शुद्धबीजाचा प्रभाव अजून मरतां मरतां दाखवीन! माझे विचार! हाय, पण माझा साथीदार भाऊ! भाऊ!!

महा०—श्रीमंत हा महादजी, तुमचे दिल्लीच्या तखतावर--

दादा०—पुरे, कळलीय आपली शिफारस! गेले--ते शिंद्याचे पाणीदार-स्वामिभक्त पुरुष गेले आह्मांला सोडून! दत्ताजीबद्दलचा सूड तर भाऊनं पुरा उगवला, पण बाळा जनकोजी तूं मात्र वाट पहात असशील! शिंद्याच्या घराण्यांत जरी कुणी नसला, तरी तुझ्या साऱ्या धन्यांची अद्याप समाप्ति झाली नाहीं. तुझ्यासारख्या वीराला त्या नजिब्यामुळं आलेल्या लाजिरवाण्या मृत्यूबद्दलचा सूड--हा दादा--

महा०—काय यजमान? शिंद्याच्या घराण्यांत जनकोजीबद्दल सूड उगवायला–

दादा०—नाहीं, खास नाहीं समजलांत. इथं जातीचंच लागतं. असं ओढून ताणून आणलेलं अवसान फार वेळ टिकत नाहीं. इतके वीरश्रीचे असता, तर धन्याच्या कानावर ही अपमानाची, लाजेची वार्ता सांगायला भागूबाईप्रमाणं पळ काढून हें काळं तोंड दाखवायला कधींच आला नसतां! आपल्या सर्वस्वाचं गांठोडं पानपतांत गिळच्यांच्या हातावर ठेवून, त्यावर उदक सोडून, शेपूट घालून कुत्र्याप्रमाणं पळ काढायला शरम नाहीं वाटली! तुह्मीं असले कसले सरदार? नुसते पटके मंदिल लटकावण्यापुरते? नायकिणीच्या पाठीमागचे ××× सुद्धां असाच पोशाख करतात!

महादजी०—ठीक आहे, धनी तर आहांतच, पण आज गुरू झालांत. हीच आज या पायांपाशीं प्रतिज्ञा! त्या नजिब्याच्या हाडांचे खुळखुळे करून, हिंदुपदपादशाहीचा शह दिल्लीपतीला लावून, श्रीमंताचे जोडे दिल्लीच्या तख्तावर ज्या दिवशीं ठेवीन, त्याच दिवशीं, आपला सरदार या नात्यानं, आपल्याला मुजरा करायला पुण्यास येईन, तरच तोंड दाखवीन! शिंदे--नायकिणीपाठीमागचे ××× अँ! अरे नजिब्या! सूड! (जातात.)

श्री० नाना०—शाबास पोरा शाबास–

नानाफ०—(स्वगत) काय मात्रा झणझणली पण! ठीक आहे, फिरून उदय केलान् तर हाच पुरुष करील–

दादा०—अहो काका, जा जा, तें शिंद्याचं तापट पोर गेलं कांहीं तरी भकून, सांगा त्याला दोन तुमच्या पिकलेल्या युक्त्या. दुसऱ्याचीं खेटरं पुरवलीं, पण पेशव्यांचीं धोत्रं बडवायला नकोत. अहो उठा, इथं बसून नका आणखीं माझं माथं फिरवूं.

सुभेदारः—श्रीमंत, केलं एक, झालं एक, नकाहो ह्यातारपणीं–

दादा०ः—अस्सं--अस्सं. साऱ्यांचा फडशा उडवायचा होता तो बेत फसला, आह्मीं अजून जिवंत उरलों नाहीं बरं! अहो जा, शिकार साधली तेवढी पुरे, खुशाल हिंदुस्थानांत जाऊन ह्यातारपणीं हुक्का ओढीत पडा! या इमानाबद्दल पाहिजे तर आणखी सनदा घ्या--

श्री० नाना०—काका, तो आतां या दुःखानं खुळावला आहे. तुह्मीं नका कांहीं मनावर घेऊं. झाल्या, एकवार गोष्टी होऊन गेल्या, तुह्मी बाबांचे उजवे हात—

सुभेदार—(स्वगत) थेरड्या, इतके बाण रुतले तरी तुझी छाती कशीरे दगडासारखी! हाय! मल्हारी, थोरल्या रावसाहेबाबरोबर तुझी किंमत गेलीरे बाबा! आतां तूं असून नसून सारखाच. जाऊं कां मागोमाग अंमदशाहाच्या? आणि दाखवूं कां थोरल्या धन्यांनीं काय मंत्र फुंकला आहे तो? पण नको, संशयानं यांचीं मनं अगदीं फाटून गेलीं आहेत. सूड! सूड तर घेणारच! पण नकळत, माझ्या अंतःकरणाला कांहींच वेदना होत नसतील काय! पण बोलूं काय! नको, आतां आधीं पुढला मार्ग. श्रीमंतांच्या छावणीचा मुक्काम संभाळून, माझी फौज त्यांना ऐन प्रसंगीं उपयोगी पडेल, अशीच तरतूद आधीं ठेविली पाहिजे. पण अब्रू, माझी अब्रू गेली! माझा अपमान! असो;

ज्यांनीं पोटाशीं धरलं, तेच एखादे वेळीं कानही पण धरतील. (प्रकाश) बरं तर–

दादासा॰––ठीक आहे, चलावं. जास्तकम मनांत वागवूं नका–पण एवढं लक्षांत ठेवा, आतां तो भिडस्त भाऊ गेला; या पुढं दादाशीं गांठ आहे--

सुभेदार॰––कोणीही झालं तरी धनी, आह्मीं लेंकरं, पण नको--आतां आपल्याला उगीच कशाला त्रास (जातांना स्वगत) देवा! हा अपवाद--माझ्या नशिबाचा खेळ केव्हां संपणार हें तुलाच ठाऊक! (जातात.)

नाना फ॰––पश्चात्ताप झालेल्याचं चिन्ह कितीही लपवलं तरी तें कसचं झांकतं. पण उपयोग काय, ह्याच गोष्टी आधीं कळल्या तर–पण पाहिजेना इथं!

दादासा॰––हं, काय--बोला? असं अपमानांत मरावं ह्मणतां कां!

नानासा॰––काय रघुनाथ! अपमानांत मरायचं! वाजवा लढाईचा डंका!

दादासा॰––हं, शपत आहे, अहो मी असतांना आपण कशाला पाहिजे, एकटा साऱ्यांना पुरेन.

श्री॰ नाना॰––काय एकटा?

दादा॰––हो एकटा! अहो एकटा ह्मणजे काय, हजारों मेंढरांना एक चित्ता बस्स आहे! नका–नकाच विचार करूं.

श्री॰ नाना॰––अखेर अखेर माझ्या नशिबीं.

दादा॰––बस्स पुरे! कसलं आलं आहे नशीब! हं, आटपा.

विठ्ठल॰––पण आपण एकटे कां? अहो मी––

दादा॰—कोण तुह्मीं? विंचुरकर! खोगीरभरती करायची असेल तिथं! पडला आहे एकदा तुमचा प्रकाश! आतां बोलाल तर जास्त शोभा मात्र करून घ्याल.

विठ्ठल॰—विंचूरकराची 'खोगीरभरती'! तर मग आपल्यापुढं पाऊल—

दादा॰—अहो, तिथं कांहीं रमणा नाहीं–सहस्रभोजन नाहीं समजला! 'आधीं पुढं पाऊल' ह्मणे, कशाला? रडतच परत यायला कीं नाहीं.

विठ्ठल॰—रडायला, कीं रडवायला याचा अनुभव असून दुर्दैवानं ग्रासलों, ह्मणून असे डाग देतां काय! घ्या तर आतां अनुभव, रडायला जातो कीं रडवायला जातो तें! (जातात.)

नाना॰—बार तर खूप ठेंचून भरले, आतां या आगीपुढं गिलचे ह्मणजे नुसत्या गवताच्या गंजी!

दादा॰—नाहीं कां तुह्मीं आज्ञा देत! रावसाहेब, या गिलच्यांच्या माना चराचर कापून, या त्रासलेल्या आर्यमातेला त्यांच्या रक्तानं स्नान घालून, तिचा शीण दूर केल्याशिवाय, मला दुसरं कांहीं सुचायचं नाहीं! नाहींतर वेड–वेड लागणार.

श्री॰ नाना॰—ठीक आहे, जा-खुशाल जा. चांगला समाचार घेऊन, आपल्या राष्ट्राला आलेला काळीमा धुवून काढून अपकीर्तींच्या जाचांतून मला लौकर सोडीव! ही घे तलवार--(तरवार देतात.)

दादा॰—(नोकरास) जा, आधिं लवकर जाऊन लढाईचं शिंग वाजीव, इतक्या जोरानं वाजीव कीं स्वर्गलोकीं मान खालीं घालून आक्रोश करणाऱ्या भाऊला तें ऐकूं जाऊन, त्यानं मला शाबासकी देण्याकरितां तिथून उडी ठोकली पाहिजे! आणखी-त्या महाभाग्यशाली शाहू छत्रपतीनं दिलेली-त्या महा-

प्रतापी बाजीराव साहेबांनीं सतत वीस वर्षे हातांत धरून, लाखों मर्दांना कंठस्नान घातलेली ही विजयी तलवार हातांत धरून, गिलच्यांना चांगली तंबी देऊन पानपतांत गार झालेल्या नरवीरांना अहंमदशहाच्या ताज्या उन्हुनीत रक्ताची तिळांजुळी देण्याकरितां खुद्द रघुनाथराव दादा-साहेब आज छावणी सोडणार! कुणी रडण्याचं अगर खेद करण्याचं बिलकुल कारण नाहीं; अशी दवंडी पिटवून साऱ्यांना जाहीर कर! जा! झाली--आज्ञा झाली, आतां उशीर कां! येतों. तर (नमस्कार करतात.)

श्री० नाना०—जा, यशस्वी होऊन मला या यातनेंतून सोडीव.

दादा०—यातना! यमयातना लागल्या आहेत ही बातमी कळ-ल्यापासून! हे सुरासुरहो! तुमचा मला पूर्ण आशीर्वाद असूंद्या!! माझ्या जन्मभूमीच्या अब्रूकरितां, माझ्या धर्माच्या रक्षणाकरितां, माझ्या देशबंधूंच्या स्वातंत्र्याकरितां या क्षणभंगुर प्राणाची पर्वा मी अजीबाद सोडली! या चोरांनों--हजार या--लाख या--सारं ब्रह्मांड येऊंदे. हा साऱ्यांचा काळ जबडा वासून उभा राहिला पहा! सूड! सूड!! सूड!!! (जातात.)

नानाफ०—झालं गेला काळ खवळून! भस्म-एका घटकेंत साऱ्याचं भस्म करील.

श्री० नाना०—भाऊ तुझ्यावांचून हे प्राण मला जड झालेरे! काय! करूं! अपमान--क्षय--

नानाफ०—किंचित् विश्रांति घ्यावी. अपमान उद्यां हां हां ह्मणतां नाहींसा होईल.

श्री० नाना०—फडणीस, या अपजयाचा अपमान, हा डाग निघे-लहो. पण आमच्या मंडळींत ही अशी तऱ्हा, कांहीं धड चिन्ह नाहीं.

मला परिणाम चांगला दिसत नाहीं. हेंच दुःख! या खेदानं मला मृत्यु येणार! जयापजयाच्या घटकेंत तीन तऱ्हा होतील, पण आपल्या एकीची ही अशी दशा, आपसांत मत्सर, वैर, फार जाचणार हो! माते पर्वती, निदान माझ्या हयातींत तरी असं करायचं नव्हतंस! फडणीस, माझ्या कारकीर्दींत हिंदुपदपादशाहीला उतरती कळा लागली असा शेरा पुढचे इतिहासकार माझ्या नांवावर मारतील नाहो! हाय! नशीब! नशीब!! नशीब!!! भाऊराया, अरे भाऊ! भाऊ! भाऊ!(बेशुद्ध होतात.)

नानाफ०—हां हां रावसाहेब सावध व्हा. अरे--कोणी--पाणी—

अंक दुसरा समाप्त.



अंक ३ रा.

प्रवेश १ ला.

स्थळ—कुंजपुरा.

पात्रें:—नबाब नजीबउद्दवला. (नजीबखां आपल्याशीं बोलत येतो.)

नजीब०— (आपल्याशीं) इनशाअल्लावोताला-बजोरे शमषे रोया बमस्लेहतेअकली दुनयाके जितने ऐषोआरामहै, थोडेबहोत दिनोंमें मेरेही घरमे दिखाई देगें. इनबद्नसीब हिंदुवोंपर बादशहा बनकर हुक्मरानी करना, और दुनयाके तवारीखमे अपना नामनेक छोडजाना, खुदा चाहे तो मेराही हिस्सा है. अलबत्ता, इस तदबीर-के लिये कुच मालोखजाना दरकार है. हिंदुवोकीं ये जाती सिफत है, के ये कौम रुपयेके लालचसे अपनी धोंतीतक् खोल देती है. जेबमें हात डाल कर हिंदुवोंको जरा बढावा दिया, और काकासाहब, मामा-साहब कंहा के बस्स, ये फूले जामेमें नहीं समाते. माबाप, दिनो दुनिया सब कुच ये कौमके नजदीक रूपिया है. हिंदुवोको रूपिया देकर इनसे इनकी अक्लोकमालतकी थैली छीनलेना जरासी बात है. वाकई, ये ठीग बहोत दुरूस्त राय है. मगर इनमे ये सिफत न होती, तो हमे आपने मुल्खमे बेशक मुफ्तजान खोनी पडती. एसानेइलाही के इनकी ये जिबिल्ली आदत हमारे फायदोंका जरिया है. बेशक, ये मशा-य्यते येजदी है. काश, किसीकी अक्कल चालाख और मुनतजीमहो तो बेशुबा हिंदुवोंका जरोमाल उसीकाहै. अब हिंदोस्तानमे क्या बाकी रहा! इस मरेठोंमे कुच दम था, लेकिन ओभि इस जंगमे सब तमाम हो चूका! सिंधियाका तो एक अदमी रहा; मगर ओभी कमजात है बदन-सला! होलकरकेखानदानमे फकत वो मलारी बावा, इल्ला, बुड्ढा अदमी

वो क्या कर सकता! अब पेसवा महाराज पोती पचांग लेके, एकादसी, दवादसी करके दरबदर भीक मांगते फिरेंगे. उनके सब सरदारोननामी लडाईमे मारे जा चुके! अब उसके दो कमसीन छोकरे और वो अकेला रगनातराव, उनसे क्या कंदा होता है! छतरपती तो पेसवाका कैदी है; फिर अब वोही मेरे जेरे हिरासत है! इतना बाकीं है, के पेहेरा बदला जाय तो बस्स. देहेली तो अपनी है. देहेली जाकर मै बादशहाको गिरफतार करके तख्तपर बैठसकता हुं, मै बादशहा हो जावुंगा. वाहवा, वः नजीबसाहेब, आपबडे साहेबे यकबाल है. खैर, आब ये फिक्रोजिक्र रहेनेदो, जरा मर्जिनाके पास चलो. आहा! मर्जिना, उसके नामसे अजीब शिरींनी है! हर अंदाज उसका नाजसे खाली नही, और उसकी अँदाये निहायत दिलफरेब वो खुशनुमा है. चलो नजीब साहेब, तुमारे हातमे नेआमते खुदादाद मौजूद है. उस्के खानेमे देर! नही-ये मुनासीब नहीं! वाहवा! (जातो.)

प्रवेश २ रा.

स्थळ:—कुंजपुऱ्यांतील नजीबखानाचा महाल.

पात्रें:—नजीब, मर्जिना, लतीफ.

मर्जिना०—हाय नसीब! काश, मै लडाईमे मारी जाती, तो इस कैदसे--कही बेहेत्तरथा--के जिसमे आकर मै फसी हूं! मेरा खून--अगर समशेरबहाद्दरके खूनके साथ जंगमे बेहता, तो वल्ला, बहोत ही अच्छी बात होती. मगर अपसोस! वो न हुवा, मुझे तो इस कैदमे पडना था! हाय नसीब हाय! मुझे आपने जानी दोस्त समशेर बहाद्दरके कत्तल होनेके बाद ये ख्वायेश थी, के मै आपनी बाकी उम्र पेशवाके हुजूरमे गुजरानुं. लेकिन हाय! वो मुरादभी मेरे असमाननें पूरी न होदी! खुदा जाने फडनीस का क्या हाल होगा! मै पूना पोहचती, तो फिर

तोबा--तोबा--किसकी ताब वो ताकद थी, के, जो मेरी तरफ नजर उठा कर देखता! अगर मै वंहा होती--तो पेशवानें मुझे आपने बच्चोंकी तऱ्हे पाला होता. मगर वो तो मेरे बद नसीबमे पेशवाकी खिदमत लिखी नहीं! (आवाज होतो) ह्यं--ये कैसी आवाज है! कोही आता तो नही! लो--बी--ये तो मुवा नजीबही है. खुदाजाने किस इरादेसे आता--(नजीब येतो.) क्यं नजीबसाहेब, तुमने मुझे फिर इस कैदखानेमे क्यंकर डाला?

नजीब—मर्झीना--क्या कहती हो? भला--कैदखानेमे ऐसे तकल्लुफके गद्दीतकीये--पलंग मसेरी--और ये आराम वो आसायश मिलती है? ये मेरा बखतबरगष्ता के तु इसको जेलखाना समजती हो! (जरा विचार करून लबाडीनें) बहोत ठीग--कंहा है? वो सब मरदूद कंहा गये? सो दफे उन्हे समजाकर कंहा--के यंहा सब सामान तयार रखो! मगर कुचही नही! इनसान कीं जान निकली--तो यंहा पानिभी मुय्यसर नहीं. हँ--ये पलंगपोष या घर लीपनेका पोता है. असतग्फिरूल्ला! मार्झिना, देख--कैसे ये लोग नालायख वो बेवकूब है! रहेने दो--अब मै तुमारे खिदमतमे हाजीर हुवा; जो कुच फरमाव सब मौजूद है.

मर्झिना—हाय! मुझे तुह्मारे तकल्लुफात कब दरकार है! तुह्मारा मेहेलोपलंग तुह्मे सलामत हो.

नजीब—हां--बराबर--समजगया. मार्झिना ये पलंग तुह्मारे काबील नही मगर क्या करूं! अबतक्जंग वो जदालके फसादात मिटे नही--मै उनमे मशरूफ हूं. जरा मेहेरबानी कर--सब्र फरमाव.

मर्झिना—मै एकदफे कहीचुकी--के मुझे ये कुच नहि चाहिये. आब मुझेसिर्फ एक चीज मतलूब है--बस्स वो एकही बात—

नजीब—तुह्मे जो चीजें दरकार हो--वो सब यंहा मौजूद है. और उनके देनेके लिये मेरीजां, मै बहर तयार हूं. शायद तु ये चाहती है, के मै हमेषा तेरे पास रहूं--मगर क्यां करू--लाचार हुं--एकदफा मै अहं-

मेदशाहाकुं काबूल पोहचादुं तो बस्स, मुझे इतमिनान हो जाय, और मैं बखातीरजमा तेरे पास रहुं. मैही आहमक हुं--जवान हसीन औरतोंकु इष्कके सिवाय और क्या मतलूब है.

मर्झिना—नहीं--ऐसे कलमे तूं आपने जबानपर न लावो! मुझे इष्क! इष्क कौन--मै कोन! खाबमेभी इष्कका खियाल नहीं गुजरता.

नजीब—हां हां मर्झिना, तू सच कहती हो. जो चीज सामने मौजूद है, उस्के लिये खाब की क्या जरूरत?

मर्झिना—नजीबसाहेब--अगर इष्कका खियाल जागते न होगा तो खाबमे क्यंकर आये. मुवाफ फर्मायिये. मै तुमारे बेहनके बजायेहुं. मेरी रूबरूब इष्क वो मोहबत का नाम न लो.

नजीब—अपसोस–अजब तेरी दिल की हालत! हाय! अगर नौ जवान हसीन औरत इष्कको हिकारत की--आखेंासे देखने लगी--तो ये बिचारा इष्क जाय कंहा! और खुदावंदेतआला आपनी रहेमतको रोकदे पानी न बर्साय, और बादशाह रयीयत परवरी झोड दे; मा आपने बच्चेकों अपनी गोदसे फेक दे; तो आखर उसका अंजाम क्या होगा! मरजीना--इष्कके इनकार करके गुन्हेगार मतबन.

मर्झिना—अगर अल्लाहिने इसबातसे छुडाया तो फिर गुन्हा कैसा?

नजीब०—तोबा--तोबा! अगर खुदावंदतआलानें दुनयासे मोहबत को एकलक्त उठालेया तो रखा है क्या? मर्झिना ये तेरी गलतफहमी है. इष्कतो तेरे पियारे दिलमे कूट कूट करके भरा है, लेकिन आजतक् तुझे ऐसा कोही मिला नहीं, के उसको तुझसे खरी दे. खैर---इनशा अल्ला! अब मै तेरे दिलके अरमान पुरे करूं गा, दिलगीर न हो जाय.

मर्झिना०—पेशतरहीसे मै कहचुकीं, के बस्स अब मेरी एक ही मुराद बाकी है.

नजीब—हां--मै तेरे उस मुराद को समज गया. और उसके पूरा करनेके लिये मै तयार हुं.

मर्झिना—फिर देर क्यंकर ?

नजीब—अहा ! वाहरी किसमत ! (आलिंगन देण्यास पुढें जातो, ती आपली मान खालीं करून वांकते.) आं-ये क्या ?

मर्झिना—उडा दो गर्दन ! येही मेरी बाकी मुराद.

नजीब—क्या ! अब मै तेरी गर्दन उडा दुं ? मगर वल्लाह--मै नही चाहता के तुज जैसे माशूखका खून मै आपने सरपर लुं. अपसोस ! मरझिना, तु आपना खातेमा इस बुरी तऱ्हेसे करती है ? खुदावंदपाकनें क्या तुझे कैदकी मुसीबते उठानें और कत्ल होनेके लिये पैदा किया? नही--नही ! उसने तो तुझे ऐषोआरामके लिये पैदा किया है, केतु मस्सनदेवाजपर तकिया जन हो, और हजारो लौंडिया तेरे पेशे खिद-मत रहे. अब एकबार आपनी नाजूक गर्दन मेरे गर्दन पर रख-देख--हर तऱ्हाका ऐषोआराम तेरे लिये हाजीर है. बशर्ते के मुझे-एक दफे अपना आशके जान बनाले.

मार्झिना०—नजीबसाहेब, कहचुकीहुं मै, के तुम मेरे बजायवाल देन हो.

नजीब०—हँ--नही. सबका मालीकोमाबाप एक खुदाही है.

मार्झिना०—पसजब खुदाही माबाप है, तो तुं हम् आपसमे भाईबहेन ठैयरे.

नजीब०—(स्वगत) गुफ्तगुमे तो बडी उस्ताद है. बडे बडे पंडत् मौलवी---इसके मुकाबिलेमे हार जायेंगे. तो अब क्या तदबीर की जाय ? खैर, मुझे अपदा इरादा इस्से जाहीर करनेमे क्या हरज ! जुरूर---[प्रकाश] आय मेरे प्यारी मरजीना—

मर्झिना०----नालायख! दूर! तेरी प्यारी--और कोई--मैनही. ऐसा बेकायदा गुफ्तगु मुझसे न कर. मरजिना आज तेरे कैदमे है, लेकिन ऐसा न समजना के मेरा कोई वालीवारस नही.

नजीब०----अय साहब, कौन कहताहै के तुह्मारा वालीवारस नही. एक मै तो दस्तबस्ता सामने खडाहुं.

मर्झिना०---क्या कहता है? बेहया! आपने मुंहमे लगामदे. बे-शरमा नाबाते मेरे रूबरूब न कर. तुझ जैसे नोकर----

नजीब०---हां हां बेशक मै तेराही नोकर. जो मिजाजमे आय--सो हुक्म फरमाव. मर्जिना, तू क्यं आपनेकूं सताती? किस लिये रंज उठाती? प्यारी---मेरा दिल तेरे लिये माहिबेआबकी तऱ्हे बैताब है! एक एक साअत मुझपर एक एक बर्सकी मानिंद गुजरती है! आठों पहेर तेरे खिदमतमे रहुं और मजे उडावूं, इस्के बगैर और कोई दिली अरमान भी है? ले--प्यारी तु क्या चाहती? कह्य--ऐषो आराम कीं क्या हकीगत! मै आपने जाने आजीजतक् तेरे उपर सदके करनेको तयार हूं. मगर जानी, एकबार प्यारसे आ, गले लगजा.

मर्झिना०—हँ--क्या? मै तेरे गलेसे लगु? ठैर---इतना बेकरार न हो. मुझे चुपकेसे मेरे आकाके पास भिजवादे, नहिं तो याद रख--मेरे आकाँकी तेगें आबदार तेरी गर्दन पर फिरेगी.

नजीब०—हँ-ऐसा कौन तेरा हिमायती है?

मर्झिना०—नालायख! मेरे हिमायतीको पूछता है. मेरा हिमायती वोही है, के जिसने चालीस बरससे तुम सबको हिला डाला. क्या? पेशवा सरकारके हिम्मते बहादूर को भूल गया? बस्स, वोही मेरा मालीकवोहिमायती.

नजीब०—पेशवावोंको अब कौन पूंछता है. वो वखतगया--वो जमाना गया. दो दिनमे आकर वो नजीबके पैरों पडेंगे. ये तेरा माळीको हिमायती ? अल्लाह !

मर्झिना०--क्या? वो तुज जैसे कुत्तेके पैरों पडनेको आयेंगे ! मगर हां–वो तेरे गलेमें जंजीर डालनेको जरूर आयेंगे. या इलाई ! मुझसे आपने आकाँकी बदगोई कैसी सुनी जायगी. खुदाया तु मुझे बेहेरी कर दे. अपसोस ! ये मेरी हालत, श्रीमंत नानासाब, दादासाबको क्यंकर मालूम होगी ! कौन उनसे जाकर कहेंगा ! या अल्ला ! मुझ मरझीना कमबख्तका खातेमाबिलखैर यं होता है. (रडूं लागते.)

नजीब०--(विचार करून लबाडीनें) मरजीना, तुझे पेशवाकेपास चलना है? तो ले–चल. मैभी तेरे साथ चलताहूं. मुझेभी पेशव सरकारमे कोई नोकरी मिलजायगी. मगर तु पहले मेरे साथ शादी कर ले.

मर्झिना०—अयबतजात–तेरेसाथ शादी ! और वंहा चलु ! इस्से बेहेत्तर मै आपना गला घोटकर यहां मर जाऊं.

नजीब०—समशेर बहादुर जैसे कमजात---

मर्झिना०—हां आपनी जबाँ थांब. कोन कमजात? शरीफको शरीफोंसे इलाका होता है. मुझको नमकहरामी करवाता तो तूही कमजात है.

नजीब०--मर्झिना, कमजात कह, बेवकूब कह, जो तेरा जी चाहे सो कह. मगर मुझे एकदफे–(पुढें जातो.)

मर्झिना०--बेशर्म ! दूर--अलग हो.

नजीब०---अब हरगीज नही मानतां, और तेरी बातभी नही सुनता (पुढें जाऊन धरणार इतक्यांत)

मर्झिना०—हां-हां. कोई दौडो! हाय नसीब! यंहा मेरा कौन है! (मूर्च्छा येऊन पडते.)

नजीब०---बात तो बिघड गई, अब मुझे यंहा ठैरना मौका नहीं. लतीफ--अये लतीफ--

लतीफ०---हां, हाजीर---

नजीब०---तु इसके उठानेकी फिक्र कर. (जातो.)

प्रवेश ३ रा.

स्थळ—जयपूरला वेढा घातलेली श्रीमंत दादासाहेबांची छावणी.

पात्रें:—दादासाहेब, विंचूरकर, वकील राजेबहादर-शिपाई वगैरे.

(दोन शिपाई बोलत येतात.)

प० शि०—(आपल्या तरवारीकडे पाहात.] लई लई महिनं झालं, माझी आई उपास काढीत व्हती. तरी म्हटलं, इच्चभन औंदाचा दसराबी सुनका जातुया जनु. पन आतां काय--दादासाब घालत्यात ससरभोजन, मार होवा तेवडा हात; अगदीं प्वाट फुट पातूरझोडीप.

दु० शि०—बाबा, माजी तर अक्शी खातरीच व्हवून गेली. ह्यो दादा काई मानुस न्हव. मटी + + + + जात. आन तुला खरं सांगूं; जर कां ह्यो समंद सोनपत पानपतांत असता, तर ह्येन पर दुरान्याच्या रक्ताच्या नद्याच समिंद्राला भिडावल्या असत्या.

प० शि०—अर बाबा--दुनयेचं नशीबच वंगाळ म्हनून ह्यो राकीस आला न्हाई. एकदा येऊन जाता, तर तवाच काय व्हत तें व्हत. पर आतां सार बरमांड बुडवाया बसला न्हव. आज पातुर काई न्हाही तरी पांचपन्नास हजार मानुस, अन् शेंपन्नास गांव जाळून बसला न्हव ? अजून लढाई अन् सूड त्यो ह्योरच.

दु० शि०—म्या बामनाच्या मुकातनं ऐकलं व्हतं, कीं ह्यादेव कोपूनश्यान त्येन एकदां असाच प्ररलय मांडला व्हता, पन जवा सार सरान गेल, तवा त्यो वाईच थंडा पडला. पन हित त्ये कायबी न्हाई!

प० शि०—अर कोंबडीच्या असतय काय? ह्यो ह्यादेवाचा आजा! ह्यादेव राकिस मानसास्नी मारनार, तर ह्यो तेच्याबी उरावर बसनार. मानसास्नी असं व्हवून गेलया कीं त्ये पानपत पुरावल पन ही दादाची सवारी नग. पानपतान पांच लाख मानुस खाल्लं तर ह्यो गडी न्ह्यारीलाच तेवडं चट करणार! जेवान वायलं--अन मुकमुद्दी न्यारीच हां.

दु० शि०—पन ह्ये बग, माझ्या ध्येनाला ह्यो तेचा करताव आला. ह्येन जरा वाइच ढिलाई केली तर ह्यराठ्यास्नी हकड तुटक्या व्हानलाबी कोनी इचारनार न्हाई. अन् ह्मनूनच, ह्यो कान धरीत--थप्पड मारीत--मराठ्याच्या तरवारीच इख पहिल्यापरीस लईच भडाकलेलं हाय, येवढ जाहीर करीत चाललाया; आन् ह्मनूनच मांगापरिस मांग बनलाया. (दूर पाहून) अर पळ मर्दा पळ. छावनी पाह्यला हकडंच येतुया. मार धूम; न्हाई तर बांधील तोफला. (जातात.) (दादासाहेब सरदारानिशीं येतात].

दादा०—नाहीं! मी बिलकुल कालत्रयी तुमचं बोलणं ऐकणार नाहीं. दया--क्षमा--या साऱ्यांची आहुती देऊनच दादानं बऱ्हाणपूरची छावणी सोडली. हिंदुस्थान--सार जग--झाडून सार ब्रह्मांड उध्वस्त केल्याच महत्पातक, कैक जन्म माझ्या बोकांडी बसलं, अनंत कोटी वर्षे जरी जगन्नियंता मला नर्ककुंडांत ढकलून देणार असला, आजपर्यंत कोण्याही महत् पाप्याला न मिळालेली भयंकर शिक्षा मला मिळणार असली तरी मला ती मंजूर आहे. एक--अवघा एक प्राणि जीवंत राहिला तरी बेहेत्तर! पण तो पेशव्यांची हुकमत मानणाराच पाहिजे. तुडवीत--जाळीत--कापीत--साऱ्याना त्राही भगवान करीतच मी जाणार. ज्यांना आपली प्रतिष्ठा,

त्यांच्यावर प्रसंगविशेषीं क्षमा! जिथं उणेपणाबद्दल आनंद, तिथं कसली दया! अशा द्वेष्ट्यांना कंठस्थान घालून दुनयेच्या बाहेर हुसकून लावणं यालाच मी दया समजतों. सरदारहो-- याउपर दया--क्षमा--याचं नांव माझ्यापुढं काढूं नका! या जगांत ज्याला आपली प्रतिज्ञा सिद्धीस नेणं असेल, त्यानं, दया-क्षमा--नीति--चटसारीं गुंडाळून समुद्रांत फेंकून दिलीं पाहिजेत. नाहीं तर खुशाल एखाद्या गुहेंत बसून जगाच्या व्यापारापासून अलिप्त रहावं.

राजेबहादर—श्रीमंताच्या आज्ञेबाहेर एक पाऊल टाकण्याची आमची प्राज्ञा नाहीं, पण आह्मांला असं वाटतं कीं, फक्त आपल्या ज्ञातीवर हत्यार न चालावं. आधिं गिळच्यांचा पाठपुरावा करून, त्याची खोड मोडावी; मग खुशाल घरची घाण स्वस्थपणें काढतां येईल?

दादा॰—छे छे छे! मी ह्मणतों कीं, ही अगदीं निखालस तुमची चुकीची समज आहे. आपली ज्ञाती--अहो हे आपलेच लोक तर आपलं वाटोळ करण्याला कारण! माझा तर हा असा सिद्धांत आहे! आपल्याला जिथं तिथं नडणारे-- आपण होऊन दिवटीनं वाघ घरांत घेणारे आपलेच लोक, पहिल्या धडकीबरोबर आपल्या वासनेला बळी घेतले पाहिजेत. आपल्या घरचे समंद गाडून, आपल्या घरांतल्या बिळांतून रहाणारे कृष्ण-सर्प आधिं तुडवून, आपल्या घरची आग आधि विझवून, खुद्द आपली व्यवस्था झाली, ह्मणजे चोरट्यांना--दारांतल्या आगांतुकांना धक्के मारायला किती उशीर! खऱ्या अंतःकरणानं, मी साऱ्या राष्ट्राच्या शत्रूचा द्वेष करावा किंवा त्याचा सूड घेण्यासाठीं मी आपली तरवार म्यानाबाहेर उपसावी, आणि इकडं, माझ्या भावंडानीं--देशबंधूनीं, कृतघ्नपणानं--नीच-पणानं, माझ्या वैऱ्याची आणि वास्तविक त्यांचाही तो वैरी--हाडवैरी--पण निर्लज्जपणानं, एका क्षणिक भ्रमाच्या लालसेनं, माझ्या उलट त्यांनीं त्याची साथ करावी! मग माझा द्वेष--वैर--सूड--याची काय किंमत!

तुमचा शत्रु, तुमचं वाटोळं करून, तुमचं घरदार घेण्याकरितां, तुमची वाहवा करील, तुह्मांला बृहस्पति ह्मणेल, कदाचित् तुमच्या तोंडाला मधाचं बोटसुद्धां लावील, पण तुमचं सर्वस्व गिळंकृत केल्यावर, तुमच्या तोंडावरून हात फिरवतां फिरवतां केव्हां बजरंग बनवील याचा तुह्मांला पत्ता सुद्धां लागणार नाहीं. यासाठीं माझं मत--नुसतं मत नव्हे--तर ब्रह्मलेख--आधीं मी करतों हीच गोष्ट अमलांत आली पाहिजे. एक वाक्यता--एकदिल--एवढी तयारी असल्यावर कुणाची माय व्यायली आहे तुमच्याबद्दल मनांत नुसती वाईट कल्पना आणण्याची?

राजेब०—कबूल आहे; पण अहमशहा कदाचित् निघून जाईल. आणखी आपलं नांव ऐकल्यावर तो घटकाभर हिंदुस्थानांत दम खाणार नाहीं; ह्मणून ह्मणत होतो कीं—

दादासा०—काय? अहंमदशाहा पळून जाईल! कुठं जाईल! काबूल-रूमशाम-स्वर्ग-पाताळ-कुठं जाईल! जिथं जाईल तिथं ही ब्रह्महत्या त्याच्या पाठीमागं आहेच! सरदारहो—आमची अब्रू घेऊन--देशबंधूंची--पाठच्या-पोटच्या लेकरांची कत्तल करून, आर्यभगिनी-आर्यमाता, याना गांजून--छळून--अहंमदशहा हिंदुस्थान सोडील—आणखी हा दादा, ह्या डोळ्यांनीं तें पाहील! अलबत, मग तो साक्षात् जगच्चालक परमेश्वरच असला पाहिजे!

राजेब०—तसं नव्हे!

दादा०—तसं नव्हे, असं नव्हे तर मग कसं? माझ्यापुढं या असल्या नेभळ्या गोष्टी! ह्मणे तो पळून जाईल, तुह्मीं व्हा चालते आधीं दक्षिणेंत. तुह्मीं तलवार धरून, बायकाप्रमाणं तुमच्या हाताला हात लावून मला सूड ध्यायचा नाहीं! ही एकटी महाशक्ति माझ्या हातांत असली ह्मणजे लाखों इमानी नोकर माझा हुकूम झेलीत माझ्या भोंवतीं नाचताहेत असं मी समजतों. चला--निघा! मला असल्या बेअक्कल--बेहिंमती लोकांची जरूर नाहीं!

राजेब०---श्रीमंत, आपलंच मीठ आमच्या हाडारक्तांत मुरलं आहे. इतके आह्माला बेवकूब समजूं नका! हुकूम---हुकूम बोला आधिं!

दादासा०---हुकूम-हुकूम कसला विचारतां! तीन तास झाले वेढा देऊन! जयपूरवाला अजून स्वामित्व कबूल करून खंडणी पाठवीत नाहीं, आह्माला एवढाच उद्योग नाहीं--आणखी याउपर जास्त वाट पहाण्याची गरज नाहीं--सवड नाहीं! द्या तोफांना, सरबत्ती! एक घटकेच्या आंत जयपूर जमीनदोस्त झालं पाहिजे! (लगबगीनें एक जासूद येतो.) काय? काय बातमी आहे रे?

जासूद०---श्रीमंत, एक जात केशरी पोषाख केलेल्या जवळजवळ साठ हजार स्वारांनिशीं जयपूरवाला सामन्याला येतो--

दादा०---मग काय? उपाध्यावांचून नडलं? हा आलों चल. (पट्याला हात घालतात.)

जासूद---छे छे!

दादा०---छे छे काय? लवकर बोल काय तें?

जासूद०---इतक्यांत विंचूरकर स्वत: पथकानिशीं एकदम धांवले ते जाऊन किल्लयाला भिडणार, तोंच आपल्या तोफखान्यानं, किल्लयाचा पूर्वेचा बुरूज कोसळून दिला! मग काय! वाट पडताक्षणींच विंचूरकर एकदम आंत घुसले. जवळजवळ दोन घटका मोठा मातबर सामना दिला, विंचूरकरानीं स्वतः मोठी शर्थ केली! जवळजवळ राजाच्या तीन हजार स्वारांची कत्तल उडविली. त्याबरोबर राजा घाबरून त्यानं तहाचं निशाण उभारलं. पायाची पुण्याई--नुसत्या समशेरीनं काम झालं.

दादा०---नुसतं तहाचं निशाण उभं केलं! आणखी?

जासूद---आणखी तह करण्याकरतां आपला वकीलही ताबडतोब दिला.

दादा०---कुठं आहे वकील?

जासूद--विंचूरकर स्वतः त्यांना घेऊन येताहेत.

दादा०—ठीक आहे. तर मग आज विंचूरकरानीं बरीच मौज उडवली. (इतक्यांत मंडळी येतात) ही आलीच मंडळी. शाबास विठ्ठलराव! मोठे शूर आहांत! यापुढं मी तुह्माला माझ्या जिवाचे कलिजे समजतों.

विंचूरकर—मी काय केलं? ह्या पायाची पुण्याई?

दादा०—ठीक, वकील बैस. उभा का? काय तुझ्या राजाचं ह्मणणं आहे?

वकील—ह्मणणं काय असायचं आहे, परमेश्वरानंच त्यांच्याकडून आपलं स्वामित्व कबूल केलं आहे.

दादा०—काय? याचा अर्थ? मी नाहीं समजलों.

वकील--राजे शुद्ध क्षत्रिय वंशी, आपण प्रत्यक्ष ब्रह्मदेव--ब्राह्मण अर्थात् गुरु आहांत. आपले ते दासानुदास आहेत.

दादा०--वः! पहिल्या प्रथम तुझ्या राजाला हा शास्त्रार्थ माहित नव्हता वाटतं? हत्यार धरण्यापूर्वीं मी कोण आहे हें कळलं नाहीं?

वकील—क्रियापूर्वक हें त्याना कळलं नाहीं. कोणी मुसलमान असतील या समजानं त्यांनीं चाल केली.

दादा०—अस्स! 'मुसलमान असतील' ह्मणून चाल केली! वः! आणखी या माझ्या पठ्यानं तीन हजार स्वारांची कत्तल उडवली, तेव्हां मी ब्राह्मण--त्याचा गुरु असं त्याला कळलं. ठीक! यंरे युक्ति! मान राखून जीव बचाविण्याची खाशी--नामी युक्ति सुचली तुझ्या राजाला. बरं पण पुढं काय?

वकील—आपण जें ह्मणाला तें कबुल. खंडणीचा ऐवज, जरी बादली, सोन्याचे कळसाचे तंबू, आपला शिक्काकट्यार बरोबर देऊन मला आपल्या पायांकडं पाठविलं आहे. आपल्या चरणावर त्यांनीं

सर्वस्व अर्पण केलं आहे. शिवाय हुकूम असेल तर दहा हजार स्वारांनिशीं स्वत: राजे आपल्या सेवेला येण्यास तयार आहेत.

दादा०---मला मदतीचं तूर्त कारण नाहीं. पण याशिवाय आजच्या लढाईचा खर्च; आणखी या चकमकींत विनाकारण कामास आलेल्या माझ्या मर्दांची परदेशी चालवण्याकरतां तीन लाखांचा मुलूख या घडीला तोडून दिला पाहिजे. नाहीं तर---

वकील—छे, ह्मणाल ते कबूल. ह्या इथल्या इथं सनदा. तीन लाखांचा मुलूखसा काय तें सर्वस्वी आपले बंदे गुलाम आहेत.

दादा०—बहोत ठीक. विंचूरकर, कूच होण्याबद्दल आतांच्या आतां तोफा डागा. उद्याला पंचवीस कोस मुक्काम हाललाच पाहिजे.

वकील---उदईक मेजवानी घेऊन प्रसाद द्यावा अशी राजांची सविनय प्रार्थना आहे. ह्मणून--

दादा०----मी ह्मणतों तुझा राजा अगदीं वेडा आहे. त्याला ह्मणावं, दादानीं घारी गिधाडांना लक्ष भोजन देण्याचा नवस केला आहे, तो फेडून ते मुलखीं परतले ह्मणजे एक दिवस इथं मुक्काम करतील, मग तुला काय करायचं असेल तें कर.

वकील—शिरसावंद्य आहे.

दादा०—जा. (विंचूरकरास) पोतनीसाकडून याच्याबरोबर राजाला पोषाख द्या. आणखी ए वकील, राजाला ह्मणावं, तूं लौकर शुद्धीवर आलास ह्मणून दादा तुझ्यावर मेहेरबान आहेत. जा.

वकील—जशी आज्ञा. (जातो.)

दादा०—चला, दिल्लीकडं ढाल फिरवा. आजची तिथलीच बातमी आहे. एक क्षण उशीर झाला तर माझ्या कामास पडणार नाहीं. (जाऊं लागतात.)

भालदार—' आस्ते कदम '

दादा०—तूं कोण माणूस आहेस, कीं लांबकान्या आहेस! पन्नास वेळां बजावलं तरी फिरून 'आस्ते कदम'! लग्नाचं वऱ्हाड चाललं असेल पायघड्या घेत! निर्लज्ज! बेशरम! अरे हा सूड आहे सूड! (जातात.)

प्र० ४ था.

स्थळ–दिल्ली येथील राजवाडा.

पात्रें:—अहंमदशहा अबदाली; नबाब सुजाउद्दवला; नबाब नजीबउद्दवला; काजी; जासूद. (नाच गाणें आटोपल्यावर.)

अहंमदशहा—उस खुदावंदेतआलाका, शुक्रोसिपास अदा करतांहु; के जो खालीख है जमीनो अस्माका. जिसके हुक्मके वगैरे दुनिया नही चल सकती, यंदा तकके पत्ताभी उसके फरमान वगैरे नहीं हलता, उसकी कुदरते कामेलामे हरगीज किसीको चूंवोचरका दखल नहीं, जो वो चाहता है वो करता है. मै उसके मुकदस दीनके फैलाने और जोरे इस्लामके वढानेकीं रातदिन कोशीश कर रहाहूं, और उमीद है, के खुदा आपने फजलसे मुझे उसमे कामयाब फरमायेगा. ये सब खातीरखाकारवाँईया उसीकी मेहेरबानीसे जूहूरमे आरहिहै. और इन अनमोल एहेसानातके बदले मुझ नाचीजकी मजाल नहीं के मै उसका शुक्र अदा कर सकुं. ऐ सरदारो, खुदावंदे पाकके इरादेसे हं इस मुल्कपर फतहयाब हुये--और उसीकी रहेमतोअलताफसे हं इस कौमपर मेहेरबानीं करते हूं. मगर इनके बरताब ठीक नहीं, ये लोग बडे मगरूर वो खुदनुमा है. इनके धरम वो महजब सब झूटे है. जिस कौंमको हुब्बुल वतनीका दावा है वो कब गैर कोमोको अपने मुल्कमे दखल होनेको पसंद करेंगे. मगर उनमे मुतलक हिम्मतो--ताकतका जौरही नही. उनकी शेखई सब नुमायशी है. चंद्रोज उस पेशवानें बडी धामधूम मचाईथी, मगर अब खूब दांत तोड दिये.

बेशक हमे अपने बहादूर सरदारोंका शुक्रगुजार होना चाहिये. नजीब और सुजाउद्दवले जैसे महशूर नामवर जवाहिरेमादने हिम्मतेलियाकतकी मददसे बेशुबा मुझे हिंदुस्तानमे फत्ता हुई है. इन्हिके तरवारोके ये जव्हर और इनकी इनायतका ये सब समरा है. मगरा ऐ मेरे शेरदिल सरदारो, अबतक् तुमारा काम पूरा नहीं हुवा. खैर, कुच देर आराम लो और फिर अपने हिम्मतकी कमरोको चुस्त बांधो, और यकीन करलो, के हं अपने मुल्कमे पायतख्तके दरवाजेपर तमाम हिंदु सरदारोंकी गर्दनें काटकर लटका देंगे; और उनके आला सरदार पेशवाका सर भालेपर खोंचके, तमाम मुल्कमे डंके बजाते फिरेंगे.

नजीब०—हां, हां, दुरुस्त. मगर इतनीसे बातके लिये आइंदाका क्या इंतिजार है? क्या पेशवाकोई ऐसा शेर है? हरगोशका बच्चा! मेरा कुत्ता उसको शिकार कर लायेगा. हरामजादेने बडा शोर मचायाथा! चलेत चलते पचास दफे तो धोतीकी लांग खुल जाती है. आचमनीं पंपात्री लेकर सराद कराते फिरनेवाला शस्क क्या तलवारका कबजा पकड सकता है? नऊजबिल्ला! मैदाने जंगमे मर्दानगी वो बहादुरी जोहर बतलाना अहिले इस्लामहीका काम है!

सुजाउ०--वः! वः! वहवा! तूं बहोत बडे जबरदस्त बहादूर है. लेकिन काश, कुचदिनो आपको हिंदुस्तानमे रहेना है, तो याद रखिये, के खुदा किसपर किसवख्त मेहेरबान हो जाता है इसका कुच भरोसा नही. अवरंगजेब जैसे फातेह, मुस्तकिल, और मुनतजिम बादशहाके जमानेमें एक अदना शस्क सिवाजीनें अपनी खुद मुखतार सलतनतका रंग जमालिया, अपना हुक्म वो सिक्का सब जगेपर चला दिया. आपको याद है या नही, के बाजीरावनें बीस बरसके अरसेमे तमाम हिंदको तहोबाला करडाला. उसकी ओलाद अभी कायम है, वो बेशक आग है, खुदाजाने किसवख्त उसका शोला भडक उठे!

अहंमद०—खैर, आब जो चाहिये, फर्माइये, मगर मुझे हरगीज उनकी पर्वा नहीं. हां, ये तरवार बहादुर थे, और हमे उन्होंने बहोत सताया, लेकिन एहसाने इलाहीसे अब वो सतानेवाले सब फिन्नार हो गये! मुझेभी पहिले ये अंदेशाथा, के इन लोगोंसे क्यंकर बर आयेंगे. हकीकत ये है, के मै इन मुल्कमे, अपनी जान हतेलीपर रखकर आयाहूं. और मेरा मनशा ये था, के धमका डराकर हिकमते अमलीसे आपने ठानजाद उनसे वापस लेलुं. जिसवख्त नजीबसाहेबके वसिलोसे इन लोगोंकी अंदुरनी बातोंका मुझे ठीक ठीक पता लगगया, उसवख्त मुझे अपने रोबवोदाबका आसर फैलानेका मौका खुब हात आया. अखीर वख्ततक् मुझे बडा धोकाथा, मगर खुदाके फज्लसे जब पेशवाका मशूरोनामवर बेटा मैदाने जंगमे गिरतेही उनके लष्करमे भागड पडी, और हमे फतानुमाया हसीन हुयी. हां मगर इस लडाईसे मेरा जाती फायदा कोई नहीं निकला. बस्स, मुझे उनके ताकतेजंगीका बखुबी अंदाजा मिला, और ये ठीक मालुम हुवा के दुसरी कौमको इन बुजदिल लोगोंपर सरदारी करना, और इनको अपना गुलाम बनालेना बहोत आसान है.

सुजा०—वाकई, इनकी बद किरदारी, और इनकी पुरानी बदआदते इनको खुदबखुद खराब वो बरबाद करदेंगी. हिंदु–और खुसूसन दखनी हिंदु बढके है. हजरत शहासाहेब, इसमे कोईशुबा नही के आपबहोत बडे साहेबेयकबाल है; और इसी सबबसे आपको खुदायापाकने फत्ता बक्षी. मगर गौर कीं जाय, के आप आकेले उनको शिकस्त नहीं दे सकतेथे.

नजीबउ०—नबाब साहेब, आप कीस घमंडमे है? अगर आप मदद न देते तो क्या हं चूडिया पेहेनकर घरमे बैठ रहेते? आपसिर्फ दखनीवोंकी तर्फदारी करते है? बस्स-बस्स! मालुमहुवा. आप आपना तक्लुफ रहेने दिजीये.

सुजा०–नजीबसाहेब, आप जादा जबाद राजी न किजीयें. आपकी कारवाँईया जमानेमें मशूर है.

नजीब–बस्स--बस्स! चूप--चूप रहिये.

काजी०–हजरत, ये आपसमे फसाद खूब नही! खुदाने हमे आज कैसी खुशी बक्षी है. उसको याद फर्माइये. आपना नामनेक और बहादुरीका शोहरा दूर दूर तक् पोंहचा, और दीने इस्लामका नक्कारा मुल्कभरमे बुलंद गुंजरहा. हं परदेसीवोंको हमेशा बाहम यकदिली, और इत्तेफाकसे रहेना चाहिये. ये इत्तेफाकही सारे हिंदोस्तापर हमारा कबजा कर देगा.

अहमद०–ऐ सरदारानेजी विकार, आपका दीवानोका मुवाफीक आपस्मे तकरार करना ठीग नही. आप दानावोअकील है. आपको हरगीज ये झगडा जेब नही देता. हिंदुवोंके वो हरकात वो सकनात, के जिनपर हंम हसते है, अगर वोही हंम करने लगे तो हमारा क्या हाल होगा. अब आप इतामिनान वो इसतकलाल रखें, और जरा असिल बातकु सोंच समजकर इस बहासको खतम करे. अलहंदुलिल्ला! के हमारे सरोंसे बलाटल गई, खुदाने जमानेमें हमारी अब्रु रखली, आपके जोरे बाजूसे हिंदुवोंकी शेखई खांकेम मिलगई, और देहलीके तख्तकी इज्जत रहीगई. मगर जाहेर रहे के दिंदुवोंने दिवानेखासकीं छतको तो तोडही डाला है, मुबादा अगर आब साहेबान ऐसा मुनाकशा करेंगे, तो जरूर वो तख्तभी तोड डालेंगे. खैर, मुझे इस फताके शुक्रानेमे आपने बहादूर सरदारोंको इनामवोइकराम तकसीन करने है. इनशाअल्लाहुल अजीज! आपने दारूसलतनतमे पोंहचकर बाटुंगा.

सुजा०—अलहंदुलिल्ला! हमारी फताहहुई, जमानेमे नेकनामी हासील हुई, बस्स यही बडा इनामवोबक्षीस है. रूपिया तो आता जाता है. और इस्का करष्माचंदरोजा है! मगर हां नेकनामी बहोत बडी निमायती है,

के जो मुद्दतों दुनयामे यादगार रहिती है. नजीबसाहेब, इतना गैजमे न आइये. ये दरबार है, यंहा आपके हरबातकी कद्रोकिंमत होती है.

नजीब—(स्वगत) क्या! इसे मर्जिनाके मामिलातकी इतिल्ला तो नहीं पोंचगही! वरना क्यं इतनी बेमुर्वतीसे मेरे साथ पेशआया. खैर, हरचे बाद आबाद. मगर मसलेहत ये है, के मर्जिनाके लीये मुझे इसवख्त खामोश रहेना चाहिये. हाय! उसका हुस्नका जादु मुझपर जरूर चलगया. प्यारी मर्जीना, तूं इसवख्त क्या करती होगी. तेरे खातीरसे, तेरे आशक नजीबकी दरबारमे फजीहती हुयी. खैर, कुच पर्वा नहीं. मुझे तख्त चाहिये न सलतनत. लेकिन तूं मेरे दीलमे बसी हुयी है, और मेरी जानोइज्जत तुज जैसी परीपर कुर्बान है.

सुजा०—नजीब साहेब, आपने आबतक् मेरे बातका जबाब नही दिया. किस सोंचमे हो? शायत दिल ठिकाने नहीं.

नजीब०—नही, कुच नही. मुवाफ किजीये.

अहंमद०—शाबास–शाबास! मै आब दोनो साहेबोकीं मोहबताना गुफ्तगुं सुनकर खुष हुवा. ऐ बहादूर सरदारो, जिस कामके लिये तुमने मुझे मेरे मुल्कसे यंहा आनेकी तकलीफ दियी, अलहंदुलिल्ला! केवो सब मामिलात दुरुस्त हो गया, देहेलीका बंदोबस्त भी हो चुका. अब लाजीम है, के जो मेरे साथ शर्त है वो पूरी की जाय.

नजीब०—(स्वगत.) लो, आपतो अपने सरपर पूरी बला आई. बेशक मुष्कीलका सामना है. इसवख्त रूपीया सरेदस्त कंहासे दिया जायेगा. अगर नहीकर टालताहुं, तो ये अहंमदशाहा कब सूनता है.

सुजा०—नजीबसाहेब, अब आप क्या सोंचते हों. जल्द खजानेकी थैलीवोंका मूह खोली ये.

नजीब०—व: हजरत, मै या आप. (स्वगत) या इलाई! अब मै करूं क्या? इदर शहा मेरे सरपर सवार है, उधर होलकर महाराज मेरे

मोचनेकुं तय्यार है. बस्स, इसवख्त खामोशी सब तदबीरोंसे बेहेत्तर है.

सुजा०—नवाबसाहेब, इसबातका हरगीज मै जबाब दे नही.

अहंमद०—आप जबाब दे नही, वो जिम्मवर नही, तो फिर तीसरा है कोन?

नजीब०—हजरत जाने दिजीये. इतने घुस्सेमे न आईये. आपने ठानेवापस मिलगये, बस्स, अब और क्या चाहिये.

अहंमद०—सुभानअल्ला! आपकी फेहमायश तो खूब हे. फर्माइये सुजासाहेब आप क्या कहते है.

सुजा०—हजरत असल तो ये हैं, के ये मामिलात मुस्से मुतलक इलाका नही रखता.

अहमद०—व:, व:, व:! आप लोग तो बडे इमानदार नजर आते है. अगर ऐसा ही था, तो मुझे इधर क्यं बुलाया? तुह्मारे जबानके यत्ते-बारपर मेरे लाखो सिपाई कत्तल हुये, तुह्मारेही जबानकी बदौलत मेरे अजीज बेटे मारे गये, और तुह्मारेही कहेनेसे मै इन लोगोंका दुष्मन बना! आब आप मुझे ऐसा साफ साफ जबाब देते है? ये आपको जेबा नही! अपने मुल्कको आब मै कीस मुंसे जांवु! अपसोस! मै आप लोगोंकी दगाबाजीकु नही जानताथा (इतक्यांत एक नोकर दगा-दगा-करीत येतो.) हँ—कैसा दगा! क्या दगा! क्या कहता है—

जासूद—जनाबेआली, जिनलोगोंको अभी आपने शिकस्त दिथी, उन्ही लोगोंने फिर सर उठाया है. और जमीयतेकसीर हमरालेके चले आते है.

अहंमद०—हँ, क्या? मऱ्हेठे फिर हंपर हमलाआवर हुये?

नजीब०—जरा ठैरिये, अव्वल ये तो पूछीये के उनका सरदार कौन है.

जासूद०—हुजूर, पेशवाका छोटाभाई रगनाथरावदादा जिसने हमारे ठाने ले लियेथे वोही आता है.

नजीब०—ओ हो! रघनाथराव दादा! या इलाही! खैर किजीये.

अहंमद०—रघनातराव दादा! जिन्से हमारे ठाने ले लियेथे वोहीं रात्रू भरारी! क्यं सूजा साहेब, अब क्या कीया जाय.

सूजा०—हजरत, नजीब साहेबहीसे पूछीये. इनके कुत्ते पेशवाको पकड ला सकतें थे. बंदा हरगीज अब ऐसे मामेलातमे नही पडेगा.

नजीब०—खैर, आने तो दो, वो क्या करलेगा! (स्वगत.) मुशकिल तो सख्त दरपेश है! छोकरोंका मुकाबिला नही, ये तो खुद शैतान है! मै क्या कर कसताहूं! मेरी तमाम ताकतोकुवत मर्जीना की नजर हो चुकी है. अब तलवार क्यंकर पकडी जायगी. बेहर– हाल मसलेहत ये है, के फौज जमा करनेके बहाने यंहासे चल दिजी ये. और कुंजपुरे जा पोंहचीये. मगर पहिले मर्जीनाकु भागलेजाना मुकद्दम है. मुझे फकत इसस वख्त मर्जीनाका शोक है, और कुच दरकार नहीं. (जासुदास) बतातो रघनातरावदादा किस रंहासे आता है? और अब मुकाम कंहा है.

जासूद—हजरत, रहांमे सब राजावोंसे खिराजवोनालबंदी लेताहुवा चला आता है. देहलीके तरफ रूख है–जैपूरके राजासे कल खिराज लिया.

नजीब०—खैर, अच्छा आनेदो. इनशाअल्ला! दहिली दरवाजेपर उस बदखाका सर काटकर लटका दुंगा! जनाबशहासाहेब, बंदा अब रुखसत होता है, और फिर लडाईकी तय्यारी करके हाजीर होता है. [स्वगत] दादासे अब क्यंकर मुकाबिला हो सकतां है, पहिले तो मरजीना जानके मुकाबिला दरपेश है. (जातो.)

अहंमद०—नवाबसाहेब, इनके कहेनेमे कितना सच है?

सुजा०-हजरत, मै आपसे रास्त रास्त कहंताहु, के ये शख्स किसी औरतेके इष्कमे मुबतिला है. और इस्से अब कुच हो सकता नही. मसलेहत ये है, के बकिया फौज लेकर आप यंहासे तशरीफ ले जाइये.

अहंमद०-मै तो जावुंगा, मगर रास्तेमे कुच दगा हुवा तो उस्का इनतजाम क्यंकर हो.

सुजा०—इज्जतोअब्रुसे चले जानेकी ये बात है, के आपआपना सीका और कटार वकीलके साथ रवाना करके सुलाह कर लिजीये.

अहंमद०—सिवाय इस तदबीरसे, अगर मुकाबीला किया जाय तो क्या होगा? जो नसीबमे है, खैर वोही होगा!

सुजा०-अब जहेरकी लज्जत न चाखिये. वो लोग, इनत्येकाम लेनेके जोषमे दौडते हुये आते है. उनका सरदार दादासाहेब बडा लढाका है! उसवख्त उसके सामने आपने पैर जमने बेशक मुष्कील है!

अहंमद०-खैर, जैसी आपकी सुलाह. इलाई! मुझ जैसे बहादुरोदिलावर शख्सको, ये कैसा बूरा वख्त पेश आया! येभी अपनी बदकिसमतीका करष्मा है!

अंक ३ रा समाप्त.

अंक ४ था.

प्रवेश १ ला.

स्थळ :—पानपतची समरभूमि.

पात्रें :—श्रीमंत रघुनाथराव दादासाहेब, विंचूरकर.

दादा०—पांडवाचं निमित्त करून साक्षात् भगवान् श्रीकृष्णांनीं ज्या ठिकाणीं कौरवांसारखे मानवीराक्षस वैवस्वत क्षेत्राला पाठवून भूभार दूर केला, भीष्मासारखे इच्छामरणी, द्रोणकर्णासारखे प्रत्यक्ष अथर्वणवेदाचे अवतार; विराट सात्यकीसारखे सहस्रावधि वरदपिंड, अठरा अक्षौहिणी योद्धे, तितकेही पण--काळानं आपल्या दाढेंत रगडले; जिथून रक्तगंगेचे पूर महासागराला मिळाले; यश, मान, धन यांची आहुती घेण्याकरितां, आपला अक्राळविक्राळ जबडा पसरून, आणखी शिवाय माती, पाणी, दगड याऐवजीं रक्त, मांस, हाडं यांनीं आपलं भयंकर स्वरूप दाखवून, ही वसुंधरा, ज्या ठिकाणीं साऱ्या जगाला घाबरावून सोडते, रुद्रदेवता रक्ताभिषेकानं संतुष्ट होऊन, त्रिभुवन जाळण्याकरितां प्रळयाग्नीच्या ज्वाळा ज्या काळकुंडांतून सारख्या भडाडलेल्या असतात, आर्यवीरांना स्वर्गलोक चढून जाण्याकरितां, भगवान कार्तिकेयानं जिथं जिना बांधून ठेविला आहे, आणि ज्या जिन्यावरून परवां नुकता, माझा भाऊ पांच लाख लोकांना बरोबर घेऊन स्वर्गाची पायरी चढला, तेंच हें पवित्र कुरुक्षेत्र आणि तीच ही पापी पानिपतची समरभूमि! भाऊराया, भारथीयुद्धांत तूं कोण होतासरे! खरोखर भीष्म किंवा द्रोण असशील. पांडवांच्या प्रीतीमुळं तूं आपली लढण्याची इच्छा दाबलीस, आणि ह्मणूनच ती हौस पुरी करून घेण्याकरितां फिरून या दुर्दैवी आर्यावर्तांत तूं अवतार घेतलास! सरदारहो, माझा भाऊ अखेर कुठं उभा होता

हें मला दाखिवतां कां? ह्मणजे जरी या माझ्या पापी नेत्रांना तो स्वर्गीचा जिना दिसला नाहीं, तरी निदान स्वर्गाकडं तोंड करून मोठमोठ्यांनीं मी माझ्या भाऊला हांका मारीन. अरे भाऊ! भाऊराया!

विंचूर०—श्रीमंत, काय बरं हें. घसा फुटेपर्यंत जरी आपण ओरडला, तरी तो पुण्यात्मा या मृत्युलोकाकडं फिरून ढुंकून तरी पाहील कां? रावसाहेब, आपली कल्पना अगदीं बरोबर असली पाहिजे. भाऊ-साहेब खरोखर कुणी तरी अवतारीच असले पाहिजेत. साधारण माणसा-माणसांची लढाई ह्मणजे तास दोन तास; दहावीस हजारांची कत्तल ह्मणजे शिकस्त. हा प्रकार अगदीं वेगळा. एक नव्हे दोन नव्हे, पांच लाखांची आहुती एका चार घंट्यांत भाऊसाहेबांनीं इत्थ दिली, असा त्यांचा लोकोत्तर प्रभाव! अर्थात् ते कुणी आशा राहून गेलेले भारती योद्धेच असले पाहिजेत. पण आतां काय त्याचं! आर्यमातेचं प्रारब्ध खोटं! आह्मीं हे असे अभागी!!

दादा०—आर्यमातेचं प्रारब्ध खोटं! आणखी आह्मीं असे अभागी अँ!

विंचूरकर—हें तर उघड उघड दिसतं आहे. आर्यमातेला असेच कांहीं चमत्कारिक ग्रह पडले आहेत कीं, तिच्या पोटीं तिचा उदय करणारी संतति झाली, कीं तिच्या ऐश्वर्याच्या स्थानावर शनीची दृष्टि गेलीच! एखादा चांगला ग्रह आला, ह्मणजे संततिस्थानांत शून्य! बरं क्वचितत्काळीं दोन्ही गोष्टी घडल्या, ह्मणजे मृत्युयोग हटकून ठेवलेला!

दादा०—मिळून हिंदुस्थान यापुढं सदोदित असंच ग्रहदशेच्या फेऱ्यांत रहायचं ह्मणा तर! काय चमत्कार आहे! हिंदुस्थानच्या कल्याणाकरितां हिंदुमर्दांचं खंडोगणती रक्त खुद्द हिंदुस्थानांत पडावं, आणखी अखेर ह्मणे तेच अभागी! परमेश्वरा!! हिंदुस्थानच्या घडामोडी-पासून साऱ्या जगानं सावध होऊन आपली सुधारणा करावी, यासाठींच कारे तूं हिंदुस्थान निर्माण केलंस!

विंचूरकर—ही गोष्ट तर निर्विवाद दिसते आहे. नाहीं तर आमची कां अशी स्थिति व्हावी? आमच्या पूर्वजांनीं, आमच्या धर्मकारांनीं, आमच्या तत्ववेत्त्यांनीं, कोणच्या गोष्टीची आह्मांला वाण ठेविली आहे! जें जगांत नाहीं तें हिंदुस्थानांत आहे! पण छे, होतं--पूर्वीं होतं असंच तूर्त ह्मणणं भाग आहे. रावसाहेब तो विषय कशाला पाहिजे. आपल्या दैवाला अशी वांटणी आहे, ठीक आहे, जें कपाळीं आलं तें भोगलं पाहिजे.

दादा०--अस्सं! कपाळीं आलं तें भोगलं पाहिजे. तर मग मी ह्मणतों आपण हातांत बांगड्यासुद्धां भरल्या पाहिजेत! आणखी यल्लमाचे भक्त बनून 'अक्कल दे जोगवा' करीतही पण हिंडलं पाहिजे.

विंचूर०--तशी स्थिति केवळ आजच--

दादा०—कां बरं नाहीं? तुह्मांला भ्रम आहे. मी ह्मणतों त्याच्या-पेक्षांही भयंकर स्थिति आज आपल्याला आहे! ज्या ठिकाणीं पांडवांनीं अठरा अक्षौहिणी सैन्य गार केलं, आणि जिथं भाऊनं पांच लाखांचा फन्ना उडवला, तीच ही समरभूमि! दोघेही सत्यासाठीं भांडले. मग पांडव विजयी कां, आणि तुह्मीं अभागी कां?

विंचूर०—याचं कारण एक दुर्दैव! शिवाय तें द्वापार आणि हा कलि.

दादा०—मला नाहीं हें तुमचं वेड कबूल. ह्मणे तें द्वापार आणि हा कलि. शिवछत्रपतींनीं, तुळजापूरवासिनीचा छळ करणाऱ्या अफजुलखानाची गठडी भर दिवसां वळली! बड्या बड्या मिय्यांचीं नाकं राज-रोस रीतीनं उभीं चिरलीं! कित्येक भुरट्यांना होते कीं नव्हते असे जमी-नदोस्त केले! स्वातंत्र्यासाठीं देह विकून, आजन्म सुखशांति विसरून, आर्यांच्या शौर्याची-कीर्तीची-यशाची-ही टोलेजंग इमारत उभारली, त्यावेळीं काय द्वापार होता? कां त्या गोष्टीला शेपन्नास शतकें लोटलीं!

कां ती हिंदुपदपादशाही आजच ठार झाली! कांहीं नाहीं, तीच पादशाही–तिचेच आह्मीं नोकर आणि तिचीच ही धूळधाण! आणि फिरून युग तेंच! आर्यमातेचं प्रारब्ध फुटकं नाहीं, किंवा सूर्यमालेंतले ग्रहही पण तिला पीडा करीत नाहींत! तिचे दुसरे ग्रह कोण? अहो तुह्मीं आह्मींच तिचे ग्रह! मी शनि, तुह्मीं राहु, ते केतु. पण भाऊ, विश्वास–हे कोण बरं असावेत! बुधशुक्राचाच योग तो! हाय! भाऊ, ही माझी बडबड तुला ऐकूं येत असेल कां रे! पण मला ती जागा दाखवाच हो. तिथं मी त्याचं स्तोत्र करीन, निदान त्या जागेवर मी लोटांगण घेईन!

विंचूर०—रावसाहेब, खरोखर तीच जागा कोणालाही नेमकी ठाऊक असण्याचा संभव नाहीं. मात्र या इथून भाऊसाहेब दोन्ही हातांत पट्टे चढवून, जे सिंहासारखे चवताळून सुटले, ते जवळ जवळ पाव घटका दिसत होते. झालं, प्रेतावर प्रेतं पडूं लागलीं, एकच घाई उडाली, आकाशांतून भर दिवसां उल्कापात होऊं लागले, प्रहर दिवस असतांच सूर्यनारायण मावळला, मावळला कशाचा– आमच्या अपेशामुळं तो लाजून निस्तेज झाला, धुळीनं आपला कोण परका कोण हें कांहींच समजेना! तो दिव्य पुरुष जिथं गर्दींत मिसळून अंतर्धान पावला, तेंच हें ठिकाण.

दादा०—हाय! नको, तुह्मीं मला सांगायलाच नको!! हे हाडांचे ढीगच पुरावा देतात. भाऊ, तुझा शेवट इथंच आसपास झाला ना रे! सरदारहो, हीं हाडं किती पवित्र आहेत! छे, त्यांना हाडं ह्मणण्यापेक्षां, या रक्तगंगेंत येऊन पडलेला दक्षिणचा श्वेतूच ह्मणणं योग्य! हे हत्ती–घोडे–अंबारी, या तोफा–तलवारी, कशा कृतकृत्य होऊन पडल्या आहेत. हीं प्रेतं–हे आर्यवीर–आर्यमातेच्या पोटीं आल्याचं सार्थक करून, आतां पहा कसे शांत घोरत पडले आहेत. बाबांनो,

अखेरची समाधानाची झोंप घेत तुह्मीं पडले अहांत, पण या तुमच्या पडण्यानं आह्मांला केवढा घोर लागून राहिला आहे! (जनावरांची ओरड होते.) ही कसली ओरड बरं!

विंचूर०—ही श्वापदांची मारामारी आहे प्रेतं खाण्याबद्दल.

दादा०—अस्सं! अरे बाबांनों, अशी मारामारी कां! तुमचं पोट इथं भरत कां नाहीं! अशीं तुह्मीं काय पांच पन्नास हजार आहांत! तरीही हरकत नाहीं, माझ्याबरोबर चला, तुह्माला अशी कांहीं फक्कड मेजवानी देतों, कीं जन्मभर फिरून भूकच ह्मणून लागूं नये. (फिरून ओरड.) नाहीं, तुह्मी ऐकत नाहीं. चला मंडळी, आपण त्यांची मारामारी सोडवूंया (जातात.)

विंचूर०—काय मस्तक भ्रमलं आहे! गेला-पोहोंचला जाऊन. आपण जावंच. बोलून चालून जनावरं, एक करतां भलतंच होऊन बसायचं. (मागील पडदा वर होतो.)

दादा०—गेलीं, पळालीं. अरे थांबा, तुह्माला मारून कांहीं सूड घ्यायचा नाहीं! हर, हर! काय गुलामांनीं प्रेतं छिन्नविच्छिन्न करून टाकिलीं आहेत. विठ्ठलराव, आज आपण बोलतों चालतों आहोंत, पण एखादे दिवशीं आपली अशीच अवस्था व्हायची नाहीं बरं? हाय! किती काळजीनं या देहाचं यानीं संगोपन केलं असेल! पण आतां कांहीं तरी वाटतय का यांना? खुशाल कोल्हीं कुत्रीं फाडून टाकताहेत. परमेश्वरा! माया ह्मणून जी कांहीं तुझी एक मोहनी आहे, ती हीच तर नसेल ना! काय एकाएकीं अंतःकरणाची स्थिति इथं बदलते!

विंचूर०—हें क्षेत्र असंच कांहीं भारलेलं आहे, कीं इथं साऱ्या स्थितीचा लय होऊन त्याचं रूपांतरच व्हायचं. विषयी माणसाला वैराग्य हवं असेल तर त्यानं इथं यावं. एखाद्या महामट्ठाला, महा मुत्सद्दी बनायचं असेल तर त्यानं कांहीं काळ या पानपतच्या मैदानांत

रहावं. आणखी रावसाहेब तुह्माला खरं सांगूं, या युद्धांतल्या एकंदर लहान मोठ्या तत्वांशीं ज्यांची चांगली ओळख पटेल, तीं जर त्याच्या मनांत चांगलीं बाणून जातील, तर तो पुरुष निःसंशय साऱ्या जगाला आपल्या नखाबोटावर नाचवील.

दादा०—नाचवील नाहीं बरं! या लढाईपासून एवढा फायदा तरी होईल का?

विंचूर०—तें कुणी सांगावं. शेंकडों इथून परतले. त्यांत तसा भाग्यशाली कुणी नसेल ह्मणून कशावरून. आणखी खरंच, एवढी जर देवानं दया केली असेल, तर मराठी राज्याचा खरा भाग्योदय यापुढंच आहे असं खास समजा.

दादा०—मराठी राज्याचा आतां भाग्योदय! नशीब आमचं! पण नको! ते विचार सुरू झाले, ह्मणजे चटके–चटके बसतात अंत:करणाला! काय करूं! हं! विंचूरकर ही स्वारी पाहिलीत कां कशीं चैनींत पडली आहे! याच्या अंतःकरणाला आतां कांहीं तरी वेदना होताहेत कां! (निरखून.) बाबा, या मृत्युलोकाला रामराम करतांना तुला काय काय यातना झाल्या असतील! बायकामुलं, ह्मातारे आईबाप, यांची आठवण होऊन, तुला दु:खाचा हुंदका आला असेल! छे, पण हा गडी त्यांतला दिसत नाहीं. राव पाहिलांत कां, कोल्ह्या कुत्र्यानीं हात फाडले आहेत, पण बहादूर अजून तलवार सोडीत नाहीं! सोड–सोड राया, आतां कां शिणतोस! हें तोंड, गुंजेसारखे लाल डोळे, पाहिलंत कां, याची रागीट मुद्राच सांगते आहे, सूड–याच्या मनांत सूड घ्यायचा होता! पण तितक्यांत देवदूतांनीं त्याला खेंचला! ही स्वारी पहा. ही मात्र रडवं तोंड करून पडली आहे. तुमच्या लक्षांत आलं, चेहरा नीट न्याहाळून पहा, किती उदास दिसतो आहे. पण हें पोराबाळांचं दु:ख नव्हे बरं! आतां यापुढें आर्यमातेची काय स्थिति होईल, देशबंधूवर

आणखी कोणचीं संकटं गुदरतील! हे विचार मनांत येऊन यानं शेवटचा श्वास टाकला असावा! मर्दांनों, तुमच्या इच्छा पुऱ्या करण्यासाठीं, तुमच्याबद्दल सूड घेण्यासाठींचना मी जातों! मग हें काय बरं. हा राग, हें दु:ख द्या टाकून आतां.

विंचूर०—(स्वगत.) ही स्वारी जर अशीच कांहींवेळ इथं उभी राहिली तर खास भ्रमिष्ट बनेल. महारुद्र खरा, पण अति ममताळु.

दादा०—हाँ. आं! विठ्ठलराव, ते दूर पर्वतासारखे ढीग कसले दिसताहेत हो?

विंचूर०—(स्वगत) आतां इथं काय सांगूं! इथं मात्र बाजू त्रिनतोड आली! तेच ढीग असतील. जर सांगेन, तर इथंच हा सारं ब्रह्मांड बुडवायला बसेल. बरं सांगू नये, तर एकदा मनांत गोष्ट आली आहे, तिथं जाऊन पाहील.

दादा०—कांहो, विचार कसला करतां बोवा? बोला लवकर, उशीर नाहीं कां होत? गिलच्यांची घटका भरत नाहीं कां आली अजून?

विंचूर०—रावसाहेब, काय सांगूं! हेच ते ढीग! लढाईनंतर निराश्रित, नि:शस्त्र झालेल्या शिपायांच्या माना कापून, गिलच्यांनीं हे प्रेतांचे ढीग रचून ठेविले आहेत.

दादा०—काय! मला दाखविण्याकरितां माझ्या देशबंधूंच्या प्रेतांचे हे ढीग रचून ठेवले आहेत. अरे अहंमदशहा! यांचा कोणी त्राताच उरला नाहीं, असं तुला वाटलं कायरे! काय करूं!! इथून उडी मारून गरुडाप्रमाण त्या सर्पावर एकदम झडप घातली असती! पण मला पंख नाहींत हो! अरेरेरे! आग--आग—आग झाली अंगाची! सूड!! (जाऊं लागतात तों विंचूरकर त्यांचे कमरेला 'हां--हां' करीत विळखा मारून उभे करतात, दादांची शुद्धि जाते.) रे कोण--कोण तुह्मी? अहो हा पाहिलांत कां चमत्कार!

अबबब! लाखो, लाखो माणसं! माझ्यापुढं उभीं राहून आपली छाती पिटून मोठमोठ्यानं हंबरडा फोडून रडतांहेत! अरे कोण? बोला—आँ—स्वर्ग सोडून सूर्यनारायण खालीं कसा उतरला! कोण तूं? हाय! हाय! भाऊराया! तूंच कां रे हा! अरे भाऊ, असा रडतोस कां? बोल—काय ह्मणतोस, 'हिंदूंचं प्रारब्ध फुटलं'—'आर्यांची अब्रू गेली'—अरे कां—गेली कां? काय ह्मणतोस 'हिंदूंचा खरा अभिमानी आतां कोणी उरला नाहीं!' भाऊ काय कल्पना ही! हिंदु असेच नेहमीं अपमानांत राहतील! नाहीं—अरे प्रत्येकजणाच्या अंगांत सूड संचारून जो तो प्रसंगाची वाट पाहतो आहे! आणखी तो काल अगदीं जवळ आहे! तूं रडूं नकोस, जा—या योनींत राहणं तुला शोभत नाहीं. काय ह्मणतोस—'सूड घेतल्याशिवाय तुझ्या आत्म्याला शांति नाहीं!'— तर मग ही गिलच्यावर उडी घातली पहा! सूड! (जमिनीवर पडतात.)

विंचूर०—अरेरेरे! काय झालं हें! रावसाहेब, सावध व्हा. काय ह्या भलत्या कल्पना! भाऊसाहेब कशाला या पिशाच योनींत रहातील! धारातीर्थांत पतन पावलेल्या लोकांना स्वर्गवास मिळतोना? हें काय हें! सावध व्हा.

दादा०—(शुद्धीवर येऊन) राव, मला मांडीवर कां हो घेतलं आहेत? आणखी ती मंडळी कुठं गेली? 'अब्रू—अब्रू' ह्मणून गडबडा लोळत होती हो! तूं खऱ्या हिंदुबीजाचा असशील तर सूड घे! दुर्दैवानं घेरलेल्या आर्यमातेला या चोरांच्या गराड्यांतून सोडवून तिला सुख दे! स्वदेश आणखी स्वधर्म यांच्या सेवेसाठींच परमेश्वर जन्म देतो! असा उपदेश करणारा, तो तेजाचा पुतळा कुठं दिसत नाहीं! पण मी शुद्धीवर आहेना! होय, चांगला आहें. हे तुह्मीं, हें पानिपत, देशकार्यासाठीं अखेरपर्यंत वाहिलेले हे माझे देशबंधु.

विंचूर०—भर दोनप्रहर आहे. कसली आलीय मंडळी! पित्ताची वेळ आहे ही, कांहीं तरी डोळ्यापुढं दिसलं झालं! चला--

दादा०—नव्हे हो नव्हे, हें पित्त नव्हे बरं! आमच्या पिशाच्च झालेल्या मंडळींनीं, माझी थट्टा--थट्टा केली! पिशाचानो, मला चांगली आठवण आहे, अगदीं इथं बिंबून गेली आहे. आणखी विंचूरकर, त्यांचं दुसरं तिसरं कांहीं ह्मणणं नाहीं. सूड! फक्त सूड घे ह्मणतात! चलाच, नका आतां उशीर करूं. बस्स झाला इथला मुक्काम. जा पहाजा मंडळींनीं डाळ रोटी घेतली कीं नाहीं, असेल तर एकदम कूच होण्याबद्दल डंका द्या.

विंचूर०—आपण चला आधीं, मी एकट्याला, नाहीं इथं बसूं देणार.

दादा०--जाहो, काय खुळे आहांत तुह्मीं! मला भीति कुणाची! माझी प्रतिज्ञाच माझ्या भोंवतीं सुदर्शनाप्रमाणं फिरते आहे. इंद्राचं वज्र, शंकराचा त्रिशूळ, प्रत्यक्ष काळ, यांच्यापासूनसुद्धां ही प्रतिज्ञा पुरी होईपर्यंत मला भीति नाहीं.

विंचूर०-तें कांहीं असो, माझ्याबरोबर आलं पाहिजे. एकट्याला मी इथं साफ बसूं देत नाहीं.

दादा०—हाय! देशबांधवानों, माझा नाइलाज आहे! तुमच्या अस्थींवर गिलच्यांचं रक्त आणून शिंपडण्यासाठीं मला आतां तुमचा निरोप घेणं भाग आहे! आणखी ही माझी भीष्मप्रतिज्ञा तुह्मीं चांगली लक्षांत ठेवा, कीं जरी दुर्दैवानं, या जन्मीं माझ्या हातून तुमचे हेतू पुरले नाहींत, तरी परमेश्वराजवळ फिरून मी इथंच--हिंदुस्थानांत--माणसाचा जन्म मागेन, तो त्यानं दिला नाहीं, तरी निदान हिंस्त्र श्वापद बनून अहंमदशहाची नरडी फोडीन! अखेर तेंही कपाळीं नसलं, तरी ब्रह्मसमंद बनून भर दिवसां त्याची मुंडी मुरगाळून, तुमच्याबद्दल पुरा सूड उगवीन! सूड! (पडदा पडतो.)

प्रवेश २ रा.

स्थळ:—कुंजपुऱ्याचे नजीक शिंदे यांची छावणी.

पात्रें—महादजी, सरदार वगैरे. (महादजी एकटा येतो.)

महादजी—श्रीमंताच्या त्या शब्दांची आठवण झाली, ह्मणजे करवतीनं माझं काळीज कोणी चराचर कापून, माझी आंतडी तोडून, घणाच्या घावांनीं माझं प्रत्येक हाडन हाड फोडून माझा प्राण घेत आहेसं वाटतं! शिंदे-नायकिणीच्या पाठीमागचे × × × अँ! हाय! ठीक आहे. दादासाहेब, महादजी तर × × × बनलाच! पण आतां तो आपल्या तबल्यावर थाप देऊन, कसे वेगवेगळे सूर काढतो तें ऐका, आणि त्या तालावर हिंदुस्थानभर त्यांची समशेर कसा नाच करते तो पहा! पाटिलबुवा, बस्स, ' आगे हात, और पीछे बात. ' तुमचे सारे पूर्वज, भाईबंद, निःसीम स्वामिभक्त ठरून, स्वामिसेवेसाठीं आपली मान तरवारीच्या तीक्ष्ण पात्यावर ठेवून, स्वर्गलोकीं धन्याचा जयघोष करण्यासाठीं निघून गेले, आणि तुह्मी त्याच रक्ताचे असून पळपुटे—लंगडे बहादर बनलात ह्मणूनच श्रीमंताकडून ही तुह्माला बक्षिसी मिळाली! तुमचा यथायोग्य मान झाला! आणि यापुढंसुद्धां जर अशाच गप्पा झोकीत भटकला, तर याहीपेक्षां तुह्मांला फक्कड इनाम मिळून, तुमच्या उत्पत्तीबद्दलसुद्धां तुमची चांगली टर उडेल! याची जर कांहीं शरम—चीड—तुमच्या मनाला वाटत असेल, तर श्रीमंताचे शब्द कित्त्याप्रमाणें वळवून, हिंदुस्थानची गेलेली इज्जत संभाळून, तुह्मी शिंदेच आहांत एवढं साऱ्या जगाला जाहीर करा! परमेश्वरानं एकवार खैर करून तुह्माला जगवलं, अर्थात् त्याचा उद्देश कांहीं वेगळाच असला पाहिजे. त्याची तुमच्यावर मोठी प्रीति असली पाहिजे. असं असून, जर तुह्मीं या लोकीचं तुमचं कर्तव्य करणार नाहीं, तर याहीपेक्षां लज्जास्पद स्थिति आणि शेवटीं नर्कवास तुमच्या कपाळीं ठेवलाच आहे! (एक सरदार येतो.)

सरदार—अहो किती–किती ह्मणून पुढं झटकायचं? छावणीपासून मैल अर्धा मैल ह्मणजे शिकस्त! अंधाऱ्या रात्रीची वेळ, बरं निदान एखादा हुजऱ्या तरी बरोबर!

महाद०—कशाचा अंधार! माझ्या भोंवतीं केवढा काळोख पडला आहे तो तुह्माला दिसत नाहीं! हाय! माझी तर आतां अशी उमेद आहे, कीं यावेळीं माझ्या एकाही शिपायाला आपलं हत्यार बाहेर काढण्याचा प्रसंग येऊं नये! एकदम कुंजपुऱ्यांत घुसून, त्या दगलबाज निमकहराम नजीब्याला कुत्र्याप्रमाणं फरफर ओढीत आणून, त्याच्या-- वेशींत त्याचं शीर लटकावून, हातपाय पसरून स्वस्थ तुमची वाट पहात बसावं!

सरदार—मग आमचा उपयोग?

महाद०—तुमचा उपयोग! एकदम येऊन झेंडे फडकवून घ्यावेत! आणखी काय?

सरदार—सरकार असा अविचार करूं नका! आतां आपल्या तावडींतून नजीब सुटणं महामुष्कील आहे! माझी ह्मणजे कोण त्रेधा! मनांत काय एक एक विचार!

महाद०—धांव पळ केलीत हीच ना तुमची त्रेधा! माझ्या अंतःकरणाची उडालेली धांदल–माझी तारांबळ–तुह्मांला काय सांगूं! ज्या विचारांनीं माझं मस्तक पोखरून माझा मेंदू नाहींसा केला आहे, जे शब्द माझ्या अंतःकरणाला भेदून माझ्या काळजाचे तुकडे तुकडे उडून गेले आहेत, ज्या भाषेनं माझी प्रत्येक शीर, रक्ताचा प्रत्येक थेंब, आगीप्रमाणं भडकून माझा सारा देह होरपळून निघतो आहे! ते शब्द, ते विचार, जर मी तुह्माला सांगितले, तर या माझ्या उतावळेपणाचं तुह्माला आश्चर्य न वाटून, उलट तुह्मींच मला, आळशी, सुस्त, निर्लज्ज

असं ह्मणाल! अभिमानी पुरुषांच्या अब्रूला धक्का बसला, ह्मणजे त्याच्या मनाची होणारी तळमळ, एक त्याची त्यालाच माहित!

सरदार—आपलं ह्मणणं ठीक आहे. मानी पुरुषाला अपमान हाच मृत्यू! ही गोष्ट आपल्यालाच लाजिरवाणी आहे असं नाहीं. शिंद्याचं अन्न खाल्लेल्या प्रत्येक मनुष्याला याची शरम आहे. (घोड्यांचे टापांचे आवाज) हा आवाज कसला! बरोबर ही आपल्याच स्वारांची दौड! (एक रिसालदार येतो.)

महादजी---शाबास! वीरहो शाबास! याच तडफेच्या तावांत एक अर्ध्या घंट्यांत तुह्मीं कुंजपुरा गांठाल!

रिसालदार---वः, वः! ठीक धनीसाहेब.

महादजी---नाहीं, ही बोलण्याची वेळ नाहीं.

रिसालदार---मलातरी कुठं सवड आहे. बोला, एकदा हूं ह्मणा. कुंजपुरा लांब नाहीं; एवढा माळ ओलांडला कीं किल्ला.

महादजी---ठीक आहे. वेळ ही पण रात्रीची चांगली अनकूल आहे. इथूनच तुह्मी एखादी माऱ्याची जागा रोखून, किल्ल्यावर एकदम तोफखाना झाडा. दुसऱ्या बाजूस मी घोरपड चालवून घुसतों एकदम आंत नी देतों हरहर उडवून! चला--ध्या देवाचं नांव. एक यश अगर मृत्यु येवढं घेऊनच प्रत्येकानं हें मैदान सोडलं पाहिजे. अपेश घेऊन जर कुणी पळ काढील तर यापुढं माझ्यासारिखा कुणी माथेफिरू नाहीं! कोणच्या तऱ्हेनं त्याचा शेवट लावीन हें मला आज सांगतां येत नाहीं. योगायोग असेल तर या लोकीं फिरून भेटूं! नाहींतर हेच रामराम! उठा, यापुढं एक ब्र बोलण्याची सवड नाहीं. (सरदार जातात.) ज्या एका प्रेरणेनं मी हां हां ह्मणतां दौड करून कुंजपुरा गांठला, तो प्रसंग तर भिडला. नजीब्याचा सूड घेऊन, श्रीमंताचे जोडे दिल्लीच्या तख्तावर ठेवीन, ही माझी भीष्मप्रतिज्ञा

माझ्या कानांत घुमून, माझ्या भावांना ह्या नीचांनीं हालहाल करून मारलेली घोर कल्पना, माझ्या डोळ्यापुढं उभी राहिली! त्यांच्या निराशेच्या शेवटच्या किंकाळ्या माझ्या प्रत्येक अवयवांत शिरून, सूड---सूड घे ह्मणून मला आठवण करूं लागल्या! महादजी, तुला कीर्ति हवी असेल तर सारा हिंदुस्थान तुझा आहे, असा तुला त्या अंतरिक्षांतील देवता आशीर्वाद देताहेत तो ऐक! अशी धांव घे, कीं डोळ्यांचं पातं लवतं न लवतं इतक्यांत, त्या नीच नजीब्याच्या उरावर चढून--त्याच्या तोंडांत माती कोंबून--त्याच्या नरडीचा घोट घेऊन या अपमानाबद्दल पुरा सूड उगवून घे! (जातो.)

प्रवेश ३ रा.

स्थळ:--कुंजपुऱ्यांतील नबाब नजीबउद्दवला याचा महाल.

पात्रें:—नजीबउद्दवला, मर्जिना व जासूद.

नजीब०—मर्झीना, अब कितनी देरतक् खडी रहेगी? क्या तेरे नाज़ुक पैर दर्द नही करते? नाहक क्यँ जानको तकलीफ देती है?

मर्जिना०—मेरी जानकी आपको क्यं फिक्र? और अब इस जानको आराम देकर फायदा भी!

नजीब०—बडा ताज्जुब है! तेरी जानको अब आरामसे फायदा नहीं? दुनयामे तूही है; के जिसको आरामकी कुच जुरूरत नहीं. जानवर-चरिन--परिन--और तमाम हेवानात, आरामवो राहत के लिये शंबोरोज कोशिश करते है! घडीभरके आसायशकेवास्ते अदमी अपनी जान हजार तखलीफमे डालतां है! जिसका मुह न देखना चाहिये, उसके पैरोंके पास जाना पडता है! प्यारी, तेरी तरफ तो आराम चलकर आता

है, और तुझे उसकी जुरूरत नही? अपसोस! किसमत तेरी! कोई दूसरा क्या करे!

मर्जिना०—नजीबसाहेब, जब दिलके अंदर इतमिनान न हो तो उपरके आरामोआसायश कब तसल्लीबक्ष हो सकते है. क्या जखमपर नरम नरम पटिआँ बांधनेसे अंदुरूनी दर्द कम होता है?

नजीब०—भला, ये तो बता के तेरा जख्म कौनसा है! और अगर कोई गहेरा जख्म हो, तो क्या उसके लिये इलाज नही. है--बहोत है. दीवानी, जखमपर मरहम् लगानेकी फिक्र न करके ऐसे नाजूक बदनको हिलाख करना खूब नहीं. तेरे जखमके लिये मै निहायत उमदा महरम् सोंचाताहुं. बिमारकी खूषी है तो दवाका असरभी जल्द होगा.

मर्जिना०—नजीबसाहेब, बस्स अब मौतही एक मरहम् मेरे लिये बाकी है! अगर आप चाहतेहो के मै आराम मे रहूं—और मेरी जिंदगी अच्छी बसर हो, तो मुझे झोड दिजीये. गदाई करकेभी खूष रहुंगे. नाहक क्यँ मेरा अजाब लेते हो! वरना मै घूट घूट कर मरूंगी!

नजीब०—क्या? तु मरेंगी! मगर मरनेके पेशतर मेरी क्या तजवीज करते हो! मर्जीना, बस अब इतना कर, के मै तेरे जानोपर सर रखताहुं, और मुझे कतल कर! तो खुदको मै बडा खुषनसीब समझुगा. मर्जीना, इतकी संगदील न हो. तेरे बगैर मुझे दुनिया हेच है. जानी एक तो खुशीका लब्ज बोल. मेरे तमाम जिस्ममे समाकर मुझे मत सता! क्या, मुझ जैसे खुबसुरत नौजवानकी जिंदगी बरबाद करनेके लिये खुदाने तुझे पैदा किया? अपसोस! अबतक् तुझे मेरी हालतपर तर्स नहीं आतां! मर्जीना, याद रख, तेरा नाम तादमेमर्ग मेरी जबांपर रहेगा.

मर्जिना—अजी आपकी बिवी कैसी खूब सूरतवो हुशियार है. मुझे उसकी खादेमा होनाभी जेब नही देता. अगर बजाये मेरे उसपर मोहबत किये तो क्या खूब होगा! वरना उस नेकबिवीकीं बद दुवा तुंपर पडेगी!

नजीब०—बददुवा और गालिओंकी तो मुझे बिलकुल पर्वा नहीं. सब दुनयामे, और मेरी जिंदगी भरमे, अब मुझे, हिर्स-तमा--गर्ज--पर्वा--जो कुच है, तु है. हां, मर्जिना, शायत तुझे खौप है, के मुझे जीयादा औरते है, और मै तुझपर मोहबत न करूंगा. तेरे सरकी कसम, अब आयिंदा वो सब मेरे माबहेने है! और इसपरभी तेरा यकीन न हो, तो तूं उन सभोंको आपने हातसे कतल कर!

मर्जिना०—हाय! नजीबसाहेब, मैने क्या गुन्हाह कियेथें, जिसके ऐवज मुझे ऐसी तकलिफे उठानी पडती है! मेरे लिये आप आपने कुन्बेको कतल करते हो! हाय! इस खूनका बदला मुझसे क्यँकर दिया जायगा. नजीबसाहेब, मेरे लिये आप आपने ऐषोआरामको तर्क न किजीये. जबतक् अस्मानपर आफ्ताबवोमहताब ताबाहै, तबदक् भी मै जिंदा रहुं, तांहम तुह्मारे वादे मुस्से पूरे न होंगे. मेरी जिंदगी तो खुदाकी इबादत और पेशवा सरकारकी इतातमे सर्फ होगी.

नजीब०—मर्जिना, पेशवा पेशवा क्यँ करती है! दुसरी कौमकी इताअत आपने मजहबमे कब दुरूस्त है! समषेरबहाद्दर कोई असल खानदानी शस्क न था, जिसकी तू इतनी तारीफ करती है, और रोती है. क्या उसीकेवास्ते जिंदगीभर जोगन बनकर आपने पाक दीनकी बेइज्जती करेगी?

मर्जिना०—नजीबसाहेब, दुसरोंकी बदगोई करना फ्जूल है? एकबार दिल किसीके हवाले किया, फिर दुसरेकु देना आप मुनासीब समजते हो! जो बात मैने की, वो बेशक दिनसे इलाका रखती है. क्या,

किसी दुसरेकी औरतपर, जो तुमसे राजी न हो, जब्र करना, तुह्मारा दीन शिखलाता है? मजहबी बातोंसें शायत आप बेबहिरा है!

नजीब०—(स्वगत) ये इसकी जबाँहै, या मॅकराज है! मेरे हर सुखनको काटकर, मुझे आहमक बनाती है! क्या तदबीर कीजाय! हाय इष्क! तू बडा जालीम है! इस्की भोली भोली सुरत और दिलफरेबअदॉये, इनसानके दिलको लूट लेती है. खुदाया, इसका दिलभी अगर भोला होता तो क्या खूब होता. (प्रकाश) मर्जीना, आब मानजा, तेरे लिये वो आराम तय्यार किये जाइंगे, जो दुनियामे किसी औरतको नसीब न हुये. एक घडीभरमे, तूं तमाम दुनियाकी शेहजादी बनेगी. तेरा जी चाहे तो देहेलीके तख्कत्तपर बिठलादुं, या काबूल की बेगम बनजा. येभी न पसंदहो— तो पेशवाके गद्दीपर बैठ, उनको तेरा गुलाम बनाताहुं.

मर्जिना०—खबरदार! पेशवाके तख्तके बेज्जती न कर! मेरी मजाल नहीं, के उस तख्तकुं पैर लगावुं. इस्से बेहेत्तर यंही जलकर खाँक हो जावुं! नजीबसाहेब, मैने आपतक् तुमारी इज्जतकी, मगर आयिंदा एकभी बुरा लब्ज, पेशवाकी शानमे तुमने कंहा, तो मै जबाँ खीचकर मरूंगी!

नजीब०—कैसी जिद्दी औरत है! दीवानी, हिंदु तो हमारे दुष्मन् है! उनपर मोहबत करना खिलाफ दीन है!

मर्जिना०—इसमे बेदीनी क्या है? दियानत और पाकदामनीसे रहेना इसिको मै दीन समजती हुं.

नजीब०—तो फेर तुझे मुसलमानोसें हिंदु जियादा पसंद है?

मर्जिना०—मेरे नजदीका हिंदु हो या मुसलमाँ हो, दोनो एकसां है. जिसके बारेमे अपना दिल साफ है, जो मुझको खुद्के बच्चेसे जियादा समजता है, और जिस्ने मुझपर अपतक् मेहेरबानीयेँ कीं है, वो कोही हो, मुझे बहोत पसंदीदा है.

नजीब०–क्या? पेशवाकी इज्जत, तेरी नजरोंमे इतनी बढकर है?

मर्जिना०—हां, बेशक.

नजीब०—तो फिर तूं मुसलमाँ नही?

मर्जिना०—आपका जी चाहे, तो मुझे हिंदु कहो हिंदुमुसलमानोंकी तो आपसमे बोलचालतक् नही होती, तो तुह्मारे दिलकी खराब नियते कब बर आ सकती है.

नजीब०—क्या, तु हुनूद है?

मर्जिना०—एक दफे नही, बलके पचास दफे कहिती हुं, के मै हिंदु हुं! तुह्मारे इस बदचलनी को अगर तूं दीन कहेते होंगे, तो ऐसा दीन मुझे मुतलक पसंद नही! हलकत खुदाकी है, और दीन भी खुदाका! आपसमे एकने दूसरेकी मझहबी आहनत करना, हरगीज दीनी शेवा नही! बस्स--तिस्सपर भी आप न सुनो, तो जी चाहे की जो!

नजीब०—एक लब्ज जियादा करेगी तो शिकल बिगाड डालुंगा!

मर्जिना०----चले जाव! जो मौतकु नही डरती, तो तुमारे धमाकानेकु कब डरेगी!

नजीब०----हां--तुझे मौत एक बारगी न मिलेगी! हजार रंजोआजियतमे गिरफतार होगी! तुझे तकलीफ दे दे कर मारूंगा!

मर्जिना०----नजीबसाहेब, खुदाके वास्ते ऐसा न किजीये. बेहेत्तर इन तकलिफोंसे, एकही बार मेरा सर तनसे जुदा किजीये! या फौरन आगमे जला दीजीये! मगर जियादा रोज मुझे जिंदा न रखिये. (रडूं लागते.)

नजीब०—(ममतेनें) नही-नही-येतो हरगीज नही हो सकता? अय प्यारी, क्या- मै तुजको इन हाँतोसे कत्तल करूं? जो अबतक्

तेरे गले लगनेके मुषताक है. तुजको मारनेसे तमाम दुनिया: मेरी आँखोंमे सियाह् योगी! (पुढें जातो).

मर्जिना--हाँ, दूर- हट जा!

नजीब०--कुचही हो, मगर ये इरादा दूर नही कर सकतां! रोयगी-चिल्लायगी-और क्या करेगी? प्यारी, देख-सुनजा, होशमे आजा. अब तो जुरूर जो दिलमे है, वो ही करूंगा.

मर्जिना--मारोगे-इज्जादोगे-जानलोगे, और क्या करोगे?

नजीब०--तुज जैसी हूरको मारनेसें मेरी तलवार ऐबदार होगी! मै जरूर अब जब्र करूंगा! देख तेरा कोन छुडाने आताहै. (जबरदस्ती करण्यास जाऊन मर्जिनाचे अंगास बिलगतो, ती ओरडून बेशुद्ध पडते, इतक्यांत तोफांचे आवाज होतात) हँ-ये आवाज कैसी! अरे, ये तो बेहोशगिर पडी. (तोफा होतात.) हँ-इतनी रातको तोँफे हो रहि है! हाय! जुरूर कुच दगा है! (जासूद दरवाजावर थाप मारतो.) कौन?

जासूद--हुजूर मै जासूद हुं.

नजीब०--क्या चाहताहै?

जासूद—कोई गनीम किलेकी एक तरफसें तोँफे चढा रहा है, और दूसरे तरफसे हजारो सवार दौडते आ रहे है!

नजीब०--देखीये! ये क्या बदनसीब है! हरवख्त किसीना किसी तऱ्हेका खलल सरजद होता है! (जासुदास) चले जाव! दीवानो! कहेने क्यं आये हो! बेवकूब! (जातो).

मर्जिना—(सावध होऊन.) गया! दुष्मन् गया! इस मूजीनें बडा सताया! खुदाया, और कितने दिनोतक मुझे कसोटीपर कसेगा! अबतक् मेरी अस्मतका, तुझे यकीन नही आतां! खैर-बद किसमत मैही हूं! (जाते).

प्रवेश ४ था.

स्थळ—दिल्ली.

पात्रें—दादासाहेब, विंचूरकर, राजेबहाद्दर, दिल्लीचा बादशहा वगैरे. (दादासाहेब नागव्या तरवारीनिशीं अफगाणांच्या मागें लागले आहेत असा पडदा उघडतो). (अफगाण शिपाई पळत येतात).

दादा॰—दादाच्या तडाक्यांतून जिवंत! (एक शिपाई लोळवतात). अँ-पळतोस! अरे चोरा! (दुसऱ्याच्यामागें धांवत जातात). (राजेबहाद्दर येतात).

राजेबहाद्दर—आमचंच कृत्य, पण आह्माला पहावत नाहीं! अहंमदशहाचे अफगाण लोक कितीतरी! पण सारे अल्लाचे दोस्त! अरे बाप, पुन्हा हा काळ इकडं आला. (दादा येतात).

दादासा॰—प्रत्येक वाडा, प्रत्येक घर, झोंपड-झोंपड शोधून काढलं पाहिजे! अफगाण शिपायांचं एक डोकं उरल्याचा संशय असेल तर सारी दिल्ली पेटवून द्या! चला!

राजेबहा॰—श्रीमंत अफगाणांचं एक टाळकं आतां आपल्याला दिल्लींत ह्मणून सांपडायचं नाहीं! फडशा उडाला साऱ्यांचा!

दादा॰—पहा बरं! नाहीं तर तुह्माला तोफेच्या तोंडीं देईन!

राजे॰—पण ते कुणीं व्याही जावई कां आहेत! गिलच्याचा एक माणूस जर दिल्लींत मिळाला तर बेशक गर्दन उतरा.

दादा॰—शाबास! तर करा आतां उत्तरार्धाला सुरवात. आतां मोंगल!

राजे॰—पण त्या बिचाऱ्या मोंगलांनीं काय केलं आहे आपलं?

दादा॰—काय? मोंगलांनीं काय केलं आहे? अहो, अफगाण काय, मोंगल काय, इराणी काय, सारेच चोर! यांना कोणी बोलावणीं

पाठवलीं होतीं हिंदुस्थानचे बादशहा व्हायला या ह्मणून! हिंदुस्थान हिंदूंसाठीं आहे! या भामट्यांच्यासाठीं नाहीं! बस, ज्याच्या जो हातांत सांपडेल, त्यानं तो लोळवलाच पाहिजे! ह्मणजे हां हां ह्मणतां यांचं हें दिल्लीतलं प्रस्थ मोडेलं. (हर हर करीत जाऊं लागतात.)

राजे०—हां–हां श्रीमंत, आपण बादशहाच्या तख्तावर पडून थोडी विश्रांति घ्यावी. मी एकटा जोडतों पुढची पुरवणी!

दादा०—मूर्ख–मूर्ख अहांत अगदीं! गळ्याला फांस पडून प्राण जायची वेळ आली, तरी तुह्माला विश्रांति–चैन–आनंद, हे शब्द तरी कसे आठवतात! दादा विश्रांति घेत पडला ह्मणजे बायका उद्यां माझी धिंड काढतील.

राजे०—माझा तर हा पट्यावर हात आहेच. पण आपल्यासाठीं ह्मणत होतों. मर्दहो चला! नुसते चेंडू–चेंडू उडाले पाहिजेत! (जातात.)

दादा०—चोहोंकडून वणव्यांत सांपडले आहेत, तरी आमच्या मंडळींना अजून विश्रांति घ्यावीशी वाटते! काय हिंदुस्थानच्या प्रालब्धाची मजा आहे पण! यॅरे मंडळी!! आणखी ह्मणूनच हें असं! अफगाण ह्मणतो हिंदुस्थान घ्यावा, इराण कावळ्यासारखा बघतोच आहे, तिकडं रूमशामचा बादशहा एक तुकडा तरी मिळावा ह्मणून बोक्यासारखाचं टपलाच आहे! कारण आमची मंडळीच पडली तशी गुलहौशी! इकडं घर पेटलं–सारं लुटलं–तरी पलंगावर गुलगुल गोष्टी करीत पडलीच आहेत! मग काय--आमच्या बायका आह्मीं सुप्रसन्न ठेवल्या, तर त्यासुद्धां हिंदुस्थान संभाळतील, अशा तारेंत आहेत कीं काय कोण जाणे! तारच--नशीबाचीच तार ती! पण खऱ्या देशभक्ताला, हें हिंदुस्थानातलं अगांतुकांचं बंड मोडून, सुविचाराच्या चुन्यांत स्वातंत्र्याचा पाया चांगला मजबूत झाल्याशिवाय, विश्रांति-सुख--खरं समाधान कधींही होणार नाहीं! ही हल्लींची स्वतंत्रता, ह्मणजे निव्वळ बिनपायाचं मातीचं

' भिंताड '! एक पाऊस झाला कीं राम! (पडद्यांत ' हाय हाय ' असे शब्द होतात ते ऐकून) शाबासरे-गब्रू! ही अशी तळमळ सारखी लागून राहिली पाहिजे, ह्मणजेच एखादे दिवशीं खरी स्वतंत्रता मिळेल! [पडद्यांत पुन्हा ' हाय हाय ' होतें] कशी उडून गेली आहे हाय हाय जिकडं तिकडं. हिंदूंना बुडवायला ह्मणून जेव्हां आपले देश सोडता, त्याचवेळीं ही हाय हाय तुमच्या कपाळीं लिहिली जाते, पण सद्दीच्या आणि ऐश्वर्याच्या धुंदींत तुह्मांला ती दिसत नाहीं. पण एखादे वेळीं हा असा पापाचा घडा भरतो. आपली कृति स्वतःला निदान आपल्या पोराबाळांना बाधते ह्मणतात ती अशी. आधीं यांचे वाडवडील हिंदुस्थानांत आले कां? बरं आले, तर गोडीगुलाबीनं ते हिंदूशीं कां वागले नाहींत? आमच्या उरावर ह्यांना बादशाह्या, जहागिऱ्या कोणी स्थापन करायला सांगितल्या होत्या! बरं केल्या--ह्मणून आणखी तिसरे आमच्या उरावर नाचवायचे! हे एक रक्ताचे लोक कधींतरी एक होतील, केव्हां तरी शुद्धीवर येऊन सूड घेतील, एवढं त्यांच्या लक्षांत येऊं नये! मऊ लागलं ह्मणून काय कोंपरांनीं खणायचं! आह्मी माण-संचना! आतां ही पोराबाळांची आह्मी कत्तल केली, तर त्यांत अन्याय कसला! हें असं व्हायचंच! गुरूचं प्रायःश्चित्त निदान शिष्याला तरी मिळायचंच! काळचक्राची गतीच अशी आहे! (इतक्यांत शिपा-यांची ओरड होते ती पाहून) यँरे पठ्ठे! हे आले दिल्लीचे बादशहा! बादशहा झाले आहेत चोर बादशहा!

(विंचूरकर दिल्लीचे बादशहास मुसक्या बांधून आणतात.)

बादशाहा--(जमिनीस गुडघे टेंकून) सरकार, आप मेरे इनायत फर्मा हो. मुझपर रहम किजीये. ये सब सलतनत आपकी है. मै खुद् आपको तख्तपर बिठला सकतांहुं. मगर मेरी जान बक्ष दीजीये!

दादा०--हं-हं. ' जान बक्ष दीजीये! ' दादापासून प्राण वांच-ण्याची इच्छा! आणखी तूं मला तख्तावर बसवणार! तख्त तुझ्या

बापानं आणलं असेल तिकडून! आजोबानीं नुसत्या चौथाईवर दिल्लीची गादी ठेवून तुमच्यावर उपकार केले, त्याची ही फेड! अहंमदशहाला दिल्लींत जागा दिलीत! ठीक आहे! तुमचीं साऱ्यांचीं थडगीं आतां एकदाच बांधतों!

बादशाहा—हुजूर, पहिलेहीसे इनबातोंमे मेरा कुच इलाका नही, और अहमदशहाकू मैंने कभी मदत न कीं. देहलीके फिलहालके बादशहावोंकी हालत आपको मालूम है. उनसे क्या हो सकता है. भाऊसाहेबनें यंहा आनकर बहोत कुच किया, और आपको जाहेर होगा, के हंम्मसे किसीने उनकी मुखालेफत न कीं. दुनयामे महशूर है; के हंम अब फक्त नामी बादशहा रहे गये. अहमदशाहा हो-श्रीमंत सरकार हो- और कोई तिसरा हो, हंमपर बेशक गालीब हो सकतां है. आप मुझको अहमदशहासे ज्यादा है, बेशक वो मेरा दुष्मन् है! मगर क्या किया जाय, कुच मेरे इखतियारमे नहीं. मेरी कुच हुकमत होती, तो देहेली क्या, हिंदुस्थानमेभी अहमदशहाकु आने न देतां!

विंचूर०—यजमान गोष्ट खरी आहे. हुकूमच होता, ह्मणून बादशहाला मी धरून आणला. बाकी, हे हल्लीचे बादशाहा ह्मणजे नुसत्या बाहुल्या आहेत.

दादा०—असंच वाटतं हो, पण मग त्या बाहुल्याच भूत होऊन उरावर बसतात! ह्मणून ह्मणतों साऱ्याच मिय्यांना एकदम माती द्यावी एका खड्ड्यांत!

विंचूर०—आपण ठेवले तर रहातील, पण शरण आलेल्यावर हत्यार धरणं जरा आपल्या नांवाला—

दादा०—नांव नांव करून सारंच बुडायची पाळी यायची! बरं सोडा त्याच्या मुसक्या [शिपाई मुसक्या सोडतात].

बादशहा---श्रीमंत आप देर न किजीये. पहिले आपके लोगोंको तलवारे रोकनेका हुकूम दिजीये. बेगुन्हाह औरतें और माशूस बच्चोंकी शोरोगुलकी अवाज मुझसे सूनी नहीं जाती. [मुसलमानांच्या बायका येतात.]

मु० बा०---सरकार रहम किजीये, हमारे न्हन्ने न्हन्ने बच्चोंकी मोहबत दिलमे लिजीये. इस गहजबको थामिये.

विंचूर०—बायका रडत आल्या, हत्यारबंद ठेवण्याचा हुकूम व्हावा असा आमचाही पायाजवळ अर्ज आहे. साऱ्या दिल्लींत रक्ताचे सडे पडले! शिक्षेची कमाल झाली!

दादा०—जा, शिपायांना हत्यार बंद ठेवून शहराबाहेर छावणी करण्याचा हुकूम द्या. जा बायांनो. तुह्मीं भिऊं नका.

मु० बा०—खुदा आपको इस नेकीका बदला जुरूर देगा. [जातात]

दादा०—राजे, जा तुह्मी. याला याच्या मसनदीवर फिरून नेऊन बसवा. बादशहा, जर इकडं तिकडं कांहीं कानावर आलं तर याद ठेव! तुमच्या दाढ्यामिशा पेटवून तुमची चांदी आटवीन! चौथाई बिवथाई साऱ्या बाबती, बिन तक्रार सालोसाल हुजूर दाखल झाल्या पाहिजेत. जा. पुढच्यापुढं मला वाटेल तसं करीन! वाडवडिलांच्या इच्छेविरुद्ध अगदींच गेलों, तर स्वर्गीं त्यांना दुःख होईल ह्मणून एकवार रेहम आहे. जा.

बादशाहा—आपने गुजीशता मामेलातकी हमियत और पासदारी करके, इस तख्तकु संभाला, इसलिये तमाम दुनिया आपकी शुक्रगुजार होगी--

दादा०—जारे बोवा–कळलं–मला वाटलं तें मी केलं. तुह्मां लोकांना मी जाणतों. प्रसंग पडला तर आज पायां पडाल, उद्यां जोडे उचलाल! जितके ह्मणून भामटे, त्यांचा धंदाच हा! जा. (मंडळी जातात.) अन्य जन्माची पुण्याई फेडायला जागाच नाहीं दुसरी हिंदुस्थानाशिवाय! ह्मणून हे सारे बेटे येतात इकडं धडपड करीत! नाहींतर अफगाणांत

काय धोंडे आहेत! पण बस्स, हा विचार नको. प्रतिज्ञा करून फार दिवस झाल्यानं, माझी मंडळी फिरून दिलगीर होऊन, त्यांच्या डोळ्यांतलं कढत कढत पाणी पृथ्वीवर पडल्यानं तिची फिरून तगमग होऊं लागली असेल! अहंमदशहाच्या रक्तानं भिजलेला रुमाल, डोळे पुसायला मी नेणार, अवधि फार झाला, ह्मणून रावपंडित तिकडं तळमळत असतील! हीं माझीं नखं--हे दात--अहंमदशहाचं नरडं फाडायला--फोडायला अजून किती उशीर ह्मणून माझ्या मनाला दूषण देताहेत! थांबा बाबानों, यापुढं आतां तेंच काम आहे! इतके अधिर होऊं नका! (विंचूरकर व सुजाउद्दवले यांचा वकील असे दोघे येतात.) हे कोण! कोणरे बोवा तूं ?

वकील—नबाब सुजाउद्दवले यांच्याकडून तह करण्यासाठीं---

दादा०—काय? तूं सुजाउद्दवल्याचा वकील! आवळा--बांधा चोराला---

विंचूर०--हां-हां रावसाहेब ही राजनीति नव्हे.

दादा०—अहो कसली आली आहे नीति! आमच्या विरुद्ध अहंमदशहाला मदत करताना यांची नीति कुठं गेली होती! नीति, नीति घेऊन बसले आहेत इथं!

विं०—रावसाहेब, यावेळेस मात्र माझं ह्मणणं आपण ऐकलं पाहिजे.

व०—होऊं नये, पण गोष्ट झाली, त्यांनीं आपल्या तोंडांत मारून घेतली, पश्चात्तापानं ते मरून चूर आहेत, आणि ह्मणूनच आपल्याला शरण आहेत. एकवार कृपावंत होऊन माफी द्या, ह्मणून पायावर लोटांगण घेऊन मागणं आहे.

विं०—झालं, मिशावर ताव देऊन मी मी करणारा शरण आला, सरलं, मेल्यांतच जमा त्याची! आणखी जनकोजी शिंद्याचा जीव वाचवण्यासाठीं त्यांनीं फार मेहनत केली.

दादा०--केली असेल, पण उपयोग? कांहीं नाहीं--हें तुमचं गुळपापडीचं बोलणं मला पसंत नाहीं! जारे जा! तुझ्या नबाब्याला सांग, कीं ह्मणावं दादाची तलवारच आतां तुझ्याशीं सल्ला करील!

विं०--थोरले श्रीमंत माझ्या सांगण्याचा कधींही अव्हेर करीत नाहींत, हें लक्षांत आणा. निदान माझ्या वयाकडं तरी पहा.

दादा०—(स्वगत) पहा, आतां या यांच्या पांढऱ्या मिशाकडं, या तोंडाच्या बोळक्याकडं पहा! ह्यातारा कांहींतरी घाण करून ठेवील झालं! काटाकाटीशिवाय दुसरी बात नाहीं या वेळेस!

विं०—मग काय? करायचाना सल्ला? ऐका, पुष्कळ फायदे आहेत यांत.

दादा०—विठ्ठलराव, करा, काय पाहिजे तें करा! मी हा आपल इकडं स्वस्थ बसतों कसा. तुह्मीं कराल तें कबूल. हवं तें करा. (दूर बसून विंचूरकारास वेडावतात.)

विं०--या हो बसा-मग कसं काय? खंडणी-नजराणा.

व०—ह्मणाल तेवढं सारं तयार आहे. आपलं अभय द्या ह्मणजे झालं, कीं ते आपले स्वार, जे तुमच्या विरुद्ध लढले तेच, अहंमदशहा-वर पाठवायला तयार.

विं०--तुमच्या स्वारांची कांहीं जरूरी नाहीं ह्मणा. पण काय हो, तुमचे नबाब इतके अचरट असतील असं आह्मांला वाटलं नव्हतं! त्यांना हें समजायला पाहिजे होतं कीं दिल्लीचे मोंगल काय--अयोध्येचे नबाब काय, किंवा मुंबईचे टोपीवाले काय, आज कैक वर्षं जर आपण एका देशांत नांदतों, अन्न खातों, तर हिंदुस्थानांत तिसरा चोर येऊं लागला ह्मणजे त्याला मदत करायची कीं आपण सर्वांनीं मिळून त्याला हाकलून द्यायचा? ईश्वरइच्छेनें तुह्मीं सारे इथं आलांत--सुख भोगतां--राज्य करतां-तेव्हां तुमचंही हें कर्तव्यच आहे. एका जाग्यांत राहतों तर

आपण सारीं सख्खीं भावंडं आहोंत. घरगुती भांडणं या अशा वेळेला कां काढायचीं! यांत नुकसान एकट्या हिंदूंचं नाहीं! साऱ्यांचंच त्यांत नुकसान आहे. बरं तें असूंदे. आणखी, हें कसं काय झालं बोवा सांगा पाहूं आधीं, नबाब तर अहंमदशहाचे अगदीं गुलदोस्त होते.

व०—अहो कसले दोस्त! त्या नजिब्यानं चोहोंकडं बिब्बा घालून सारं चिडवून टाकलं. कुणाचा पायपोस कुणाच्या पायांत नाहीं. आमचे नबाब साहेब हें पूर्वींच ओळखून होते, पण वचनाला गुंतल्यानं त्यांचा इलाज चालेना. नाहींतर ते किती धूर्त. त्यांच्याकडून कां अशी गोष्ट व्हायची. आतां अहंमदशहासुद्धां या मंडळीबद्दल मनांत सारखा जळफळतो आहे, फक्त एकदां पळ काढीपर्यंत नबाबाशीं बोलून चालून गोड आहे इतकंच. वरवर प्रेम, एकी अशी त्या मंडळींत आतां बिलकुल नाहीं.

विं०—तरीपण अजून पत्रव्यवहार असेलच?

व०—अहो हो. अहमदशाहाकडून आह्माला रोजची डाक आहे.

विं०—होयका? तरमग—

व०—नको, तुह्मीं सांगायलाच नको. जशीच्यातशी रोजच्यारोज तुमच्याकडं रवाना. आमच्याच धोरणावर तर तो छावणी उठवतो. ही कालची डाक पहा, अजून पांच दिवस त्याचा लाहोरला मुकाम आहे. (पत्र देतो.)

विं०—असूंदे, पाहायलाच कांहीं नको, ठीक आहे. पण नबाबांनीं आणखी चौथाई बिनतक्रार दिली पाहिजे, मग पाहूं, करूं कशीतरी श्रीमंताची समजूत.

व०—एकदा सांगितलंच आहे, सर्व कांहीं कबूल आहे. लोकांना असं होऊन गेलं आहे, कीं ही स्वारी एकदा हिंदुस्थानांतून परत दक्षिणेंत जाते कशी! साऱ्यांच्या तोंडचं पण अगदीं पाणी पळून गेलं आहे.

विं०—तें होईल हो कायतें. जाईल--नाहींतर इकडंच राहील.

व०—पण आमच्यावर दया आहेना? नाहींतर नबाबसाहेब आत्महत्या करतील! इथवर पाळी बेतली आहे. आपण क्षमा केली तर ठीक, नाहीं तर ते तसं व्हायचंच.

विं०—असंच करायचं कांहीं कारण नाहीं ह्मणा.

दादा०—(स्वगत) कशा थेरड्यांच्या माना हलताहेत, काय येवढं मेतकुट चाललं आहे कोण जाणे!

वकील—आतां मग आह्मीं अगदीं बेफिकीर रहावें तर?

विंचूर०—कांहीं हरकत नाहीं, पण करार मात्र अगदीं—

वकील—छे--छे--दहा सालचा भरणा हवा तर एकदम! त्याची शंकाच नको.

विंचूर०—ठीक आहे, यावं तर--

वकील—श्रीमंत, निरोप व्हावा आतां.

दादा०—अगदीं कायमचा! चलावं!

वकील—(जातांना स्वगत) सैतान ह्मणतात ते खरं बोवा! काम तर झालं! नशीबच ह्मणायचं! नाहीं तर आली होती पुण्यतिथीची वेळ! (जातो.)

दादा०—विठ्ठलराव, काय चाललं होतं येवढं? पण अगदीं सुनका सुटला हें नाहीं बोवा बरोबर झालं!

विंचूर०—(हंसत हंसत जवळ जातांना) तर मग काय सारी दुनयाच पालथी करावी ह्मणतां? अहो कुठं तसं, कुठं असं, चाललंच आहे. कां आपले सारेच 'सकट घोडे बारा टके'! जें पाहिजे तें रीतीप्रमाणं झालं.

दादा०—पण एवढं जें रहस्य गळत होतं, त्यांत कांहीं विशेष निष्पन्न?

विंचूर०—अहो हो–

दादा०—काय? काय बोवा?

विंचूर०—तुमची प्रिय वस्तु तुह्मांला लवकर मिळणार! दुसरं काय!

दादा०—माझी प्रियवस्तु? ती कोणची?

विंचूर०—अहंमदशहा हवाना तुह्मांला.

दादा०—अहंमदशहा! कुठं आहे अहंमदशहा! (पट्टयाला हात)

विंचूर०—अगदीं नक्की लाहोरांत. अजून पांच दिवस तिथं त्याचा मुक्काम आहे. बस्स, जावं कीं भवानीला हात! त्याची आतां अगदीं नाजूक स्थिति झाली आहे!

दादा०—स्थिति–ती कशीही असो. दुर्योधनाप्रमाणं तर सामना देईल! तुह्मीं मंडळी फक्त मजा पहात उभे रहा. मी गर्दी करून सूड नाहीं घेणार! स्वतः–स्वतः नरडं फोडीन समजलांत विंचूरकर! लाहोरांत बसला आहे काय! बरं आहे ह्मणावं, आलोंच—

विंचूर—हालवायचाच तर आतां मुक्काम! इकडल्या बहुतेक मिय्यांची शांति आटपली, एवढी अहंमदशहाची झाली कीं उरकलंच—

दादा०—ठीक आहे–मंत्र ह्मणायला सुरवात होऊंद्या! ही आपली तयारीच आहे! (जातात.)

प्रवेश ५ वा.

स्थळ—कुंजपुरा.

पात्रेः—नजीबउद्दवला, मर्झीना, महादजी शिंदे, नोकर वगैरे.

(नजीबउद्दवला मोठ्या धांदलीनें हातांत खंजीर घेऊन प्रवेश करतो.)

नजीब०—हाय! इलाही, क्या मेरे श्यामते आमालकीं सजा अबतक् पूरी नहीं हुई! सिंधेने तो मेरी तमाम फौजको कत्तल

करके कुंजपुरातक् लेलिया! अब मुस्से क्या हो सकता है! वाय नसीब! कैसी सख्त बलाह मुझपर नाजील हुयी! वाकई, सिंधा मुझे जिंदा नहीं छोडतां! किधरजावूं, छुपनेकीं जायभीं कहीं नहीं! (विचार) मौततो जरूर ठैरी! मगर देखें अबभी मर्झीना राजी होती है. मरते मरते अगर दिली अर्जुये बर आयी तो बडे नसीब! इसका एकदफे राजी होजाना, मेरे लिये बस्स है. वरना इस्सी खंज-रसे फौरन उसका काम तमाम करूंगा! पहिले उसे मारूं, फिर मै मरूं, तबतक् सिंधेके तावे हरगीज न हुवुं! (ओरड होते.) ह्यँ, ये कैसी आवाज! गनीम तो नही आन पोंहचा! हाय! इसमे कुच शक नहीं! बस्स चलो, अब मरझीनाकी मिन्नत करनी कुच जुरूरत नहीं. उसको मारकर चल निकलिये. (जातो.) (मागील पडदा वर होतो, मर्झिना झोंपेंत बडबडते, नजीब येतो.)

मर्झिना०—(झोपेंत.) खुदाया, मेरी रूहको अब जल्द खींचले! वरना मुझे इस कैदसे झुडाकर पेशवाके खिदमतमे ले चल.

न०—क्या हैरातका मुकाम है! खाबमेभी ये पेशवा पेशवा करती है! मुझसे इसका राजी होजाना दुषवार है. हां, ऐ दिल–अगर तुझको मर्झिनाकी जुरूरत है, तो पहिले उसको कत्तल कर! अब रहेम कीजा मुतलग नही! मगर अपसोस! ऐसी हसीन नाजनीकको कत्तल! इसे न मिले तो बेहेत्तर! मगर येभी नही हो सकता. उसे जिंदा रखु, तो मुझ जैसे शेंकडो नौजवान बहादुरोंको--ये आपने तेगेंआब्रुसे घायल करेगी! करूं क्या! मेरा हातभी उपर नहीं होता! नजीब, तु बहोत बडा बहादुरोशजी है, मगर इस कमबख्तने तुझे कमजोर कर दिया! तेरी जिंदगी बरबाद कर डाली! और तिसपर रहेमदिली! नही---चल.---क्या देखते--उडाव---(खंजर मारण्यास जातो, तो मर्झिना जागी होते.)

म०—अहा! मेरी ख्यायेशकी चीज तो आपने तय्यार कीं है! ये बडी आपकी इनायत है! खुदा आपकी उम्र हजारसाला करे. अब देर न किजीये.

न०—खैर--प्यारी मर्झीना, मेराहात तेरे कतलपर तयार नहीं. अबतक ये मुरादमंद है, के एकवख्त तेरे गलेसे लिपटजाय! अबतोभी मुझपर मेहरबानी कर! मर्झिना, तेरेलिये मुझको बेमौत मरना है! क्या,-तेरे वास्ते मै दोजखी बनुं! मर्झीना, खुदाकेवास्ते एकवख्त मोमदिल होजा, और खुशीसे खूब मिल. (तो पुढें जातो---त्या नादांत त्याचा खंजर पडतो.)

म०—हां--खबरदार. एक कदम आगे न बढ! इसमे तेरी या मेरी जान जायगी!

न०—इस बातका फैसला तो हो चुका है. यंहा मौतकु कौन डरतां है! मर्झिना, मगर नहीं--मुझको ऐसी बेचैनीकी मौत न चाहिये! (पुढें जाणार,तों एक नोकर दरवाजा फोडून येतो.)

नौ०—व:! ये क्या है? गनीम महेलमे घुसकर तमाम लोगोंको कतल कर चुका, और तुमको धूंड रहाहै. अब काहेकी मर्झिना! आपनी जान बचायिये.

न०—क्या? गनीम उपर आन पोहचा! हाय! मर्झिना, अब-तोभी एकदफे—

नो०—तुं बडे आहमक हो! दिवाने तो नही हुये! मैनें आपका नमक खाया, इसलिये मेरा काम मैनें किया. आपका जी चाहे आव, या न आव मै चला.

न०—मगर कंहा चलुं? कही जाय भी है? और मर्झिनाकु कहां रखुं?

नो॰—मरनेदो इस मझिनाको! जान बची, तो ऐसी हजारो मझिनें मिलेंगी! चलो, मुझको एक पोशिदा जगे मालुम है, वो गनीमको हरगीज न मिल सकेगीं.

न॰—ऐसाही है तो चल, और मझिनाकोभी साथ लेले.

नो॰—तुह्मारी अक्कलपर फत्तर पडे! चलिये, नहीतो बंदा चला.

न॰—नही, नही भई मुझे लेचल.

नो॰—चलिये जल्द! आये, ये आये गनीमके लोग! दौडौ!

न॰—हाय! हाय! मेरी प्यारी मझींना!

नो॰—ये तुह्मारी जिंदगी!—(असे ह्मणत नजीबास ओढीत नेतो.)

म॰—या इलाई! ये गनीम कौन है! कोई हो. मेरी किसमतका फैसला हो चुका! जिंदगी तो अब खाकमे मिलगई! और एकरोज, मेरा खातेमाभी इसतऱ्हे होगा (खंजर घेते.) बेहेत्तर है, ये खंजर मारकर मरजावुं. खुदाया, मेरे समशेरबहादुरसे अब जल्द मिलादे. ये आइ मै! (खंजर मारून पडते. (महादजी शिंदे हातात नागवी तरवार घेवून येतो.)

महादजी—कुठ आहे तो बदमाश! अरे, ही अवदशा कोण! हिन तर उरांत खंजीर मारून घेतला आहे. (मझिनेस) कह्य हरामजादी! तु कौन आहे! और तेरा यार कंहा गया!

म॰—मेरा यार! हाय! वोतो मुकाबिलेमे कतल हो चुका! उसीके न होनसे ये मेरी हालत हुयी!

महा॰—क्या-तेरा यार मुकाबलेमें कतल हो चुका! क्या उसका नाम?

म॰—समशेरबहादुर, और मै बदकिसमत मझिना हुं! जनाबेआली आप कौन हो? फर्मायिये

महा०—मै पटेल महादजी सिंदा हुं. मर्झिना, तेरा यंहा क्यंकर आना हुवा.

म०—सिंधेसाहेब, हाय! मुकाबलेके बाद मै वापीस जातीथी, रहोमे इस नजिबने मुझे कैद किया! मुझे आपना माशूख बनाना चाहताहै! इसने बडी तकलीफदी! और इस वख्तक् मुझको सताता था! इसका नौकर इसे भगालेगया, और इसी महेलमे कही खुपिया जगे है, ऐसा वो कहेताथा! मुझे मालुम नही के आपकी सवारी आती है. मैने जाना, कोइ दुसरा जालीम है. हाय! इसी लिये खंजर मारलिया! क्याकरू! मै बडी बदकिसमत हूं! हाय! मुस्से अब जियादा बोला नही जाता! मौतके आसार अब नजदीक है! सिंधेसाहेब, आजतक् इमान और पाकदामनीसे रहेकर, ये मर्झिना दुनियासे वीदा होती है! मेहेरबानी रखिये! और, श्रीमंत नानासाहेब--दादासाहेबको मेरी कदंबोसी अर्ज किजीये. इलाही! पेशवावोंको ताकयामत् अमनमे रख! (प्राण सोडते).

महा०—हाय! गेली! गरीब मर्झीना तूं खरी इमानी! पोरवय, धडधडीत पर जात, पण श्रीमंताच्या पायावर तुझी केवढी निष्ठा! परमेश्वर स्वर्गीं तुझ्या आत्म्याला खातीनं सुखशांति देईल! शूर मर्दहो, ही आपल्याला शिरसावंद्य आहे. मोठ्या इतमामानं इच्या देहाची अखेर लावा. पण हां--ही आतांच ह्मणाली नाहीं बर, कीं तो बेरड नजिब्या इथंच कुठं वाड्यांत लपला आहे ह्मणून. चोर जातो कुठं! तोफेनं वाडा उडवून, सुरंगान जमीन फोडून काढीन! हां---आटपा, उचला हिला आधीं सूड! अरे लांड्या! लपलास काय! लप--लप--हा पहा तुझा काळ तुला कसा हुडकून काढतो तो! सूड! (जातात.)

अंक ४ था समाप्त.

अंक ५ वा.

प्रवेश १ ला.

स्थळ:—अटक नदीवरील श्रीमंत रघुनाथराव दादासाहेब यांची छावणी.

पात्रें:—दादासाहेब, विंचूरकर, राजेबहादूर, वकील वगैरे (विंचूरकर हातांत एक पत्र घेऊन येतात.)

विंचूरकर—मला आज कैक दिवस हा संशय आहे; पण मी तिकडं दुर्लक्षच करीत गेलों. गंमत पहा, जिथं जिथं ह्मणून आमची छावणी पडली, तिथं तिथं आसपास ही मंडळी आपली आहेतच! ही कुणाची बरं फौज असावी! कांहीं कल्पनाच चालत नाहीं, पण सारखं आमच्या पाठीवर रहाण्यांत यांचा काय उद्देश असावा! लढाईला तोंड लागल्यावर कांहीं दगा द्यायचा तर यांचा बेत नसेल! कारण आज तर त्यांनीं अगदीं एक मैलावर तळ दिला आहे! कांहीं तर्कच चालत नाहीं! यासाठीं माझा विश्वासू गुप्त हेर आज मुद्दाम बातमी काढण्याकरितां पाठविला, त्याला वेळही पण बराच झाला. (दूर पाहून) अरे व: हा आलाच! स्वारी तर दिसते मोठी खुषींत. मग काय बातमी आहे कोण जाणे. (जासूद येतो.) कसं काय? लागली कां कांहीं बातमी?

जासूद:—व: धनी, मंग हेर कसल आह्मीं कांहीं बातमी नाहीं तर. पगारूच जर यासाठीं खाताव तर कांहीं बातमी ठोकून दिवस खरा केला पाहिजे नव्ह.

विं०—व:, तरमग तूंसुद्धां दिवस भरण्यासाठीं कांहींतरी थापच मारणार आहेस एकून.

जा०—छे, छे. पन सरकार त्येतला मला नगा समजूं अँ.

विं०—तर मग सांग पाहूं आपली बातमी एकदा? कोणरे कोण?

जा०—लोक तर धनीसाब आपल हैती.

विं०—काय? आपले लोक हे!

जा०—अन व्हय नव्हका. होळकरांच सवार कीं हे!

विं०—काय? सुभेदारसाहेबांचे हे स्वार! बरं पण आमच्या पाठीवर रहाण्याचं कारण?

जा०—कारन! आमचंच राखिन करन्यापाई अन दुसरं काय. मी पन येड्यापुन येडा बनून गेलोन काय छावनींत, अन लागलों भीक मागायला. तत तर काय भारूच उडालाया. एक हंतोय, मी संबर लांड झोडिपनार. दुसरा हंतोय, अर गड्या मला तेवड चटणीलाबी पुरनार नाहींत. तवर तकड तिसरा मार मिशीला ताव देवून, चार शिव्याबिव्या हासडून, अर गदडीच्याहो, यात काय अरूथ हाय, मी तर खुद बाछाची मुंडी कापून दादासाहेबांच्या म्होर टाकून झागीर पटकावनार नव्ह! सवारानीं पर काय अकशी बोलन्याचा रंगच उडवून दिलाय.

विं०—वाहवा! मल्हारराव, कमाल आहे आपल्या दूरदर्शीत्वाची! दुर्दैवानं आपल्या विचारांची किंमत करणाराच कुणी उरला नाहीं. याचं नांव स्वामीभक्ति; जा तूं फक्कड काम केलंस (अंगावरील वस्त्रें देतो.) कां, चैन झालीना?

जा०—हंजी काय इचारावं. थोराचं देनंच तसं. (स्वगत.) चला गेनबा, तुमीबी वाइच आपलं खलपाटनं ठिवा पाजून. तुमास्निबी पोटापुरतं धाइस बोकाड झोडिपलं पाहिजेत. (जातो.)

विंचूर०—ह्या आजच्या बातमीवरून, तिकडं शिंद्यांनीं तर काय कल्होळच उडवून दिला आहे. सुभेदार साहेबांनीं ही अशी शक्कल

लढवली, मिळून या दोन्ही दिग्पालानीं आपलं कर्तव्य चोख बजावलं ह्मणायचं! पण विंचूरकर, तुमच्या अंतःकरणाला रुतलेल्या शतशः काट्यांतला एक कांटा तरी या जन्मांत निघेल काय! 'खोगीरभरती--रमणा--सहस्त्रभोजन' इत्यादि पदकांची--छे, पण माळ कशाची! हें अप्रतिष्ठेचं दाव, कधीं तरी तोडून तुह्मीं मोकळे व्हाल काय! शत्रूंच्या सहस्त्रावधि शिरांची आहुती देऊन क्रव्याग्नीला संतुष्ट करणारे विंचूरकर रमण्यांतले यःकश्चित् भटुरगे ठरले अँ! ठीक आहे! दादासाहेब, जी गोष्ट आज कैक दिवस आगीसारखी मनांत धुमसत राहिली आहे, ती पेट घेऊन हा विठ्ठल शिवदेव रमण्यांतला भटोबा आहे कीं, रणमैदानांतला विद्वान् पंडित आहे, ह्याची खात्री होण्याचा प्रसंग अगदीं हाताशीं भिडला आहे! अहंमदशहाच्या उरावर लाथ मारून, धुळींत उताणा पाडून, त्याच्या नरडीला नख तुह्मी लावतां कीं मी लावतों, एवढंच आतां पाहणं आहे! अहंमदशहा! लाहोर सोडून आमचा डोळा चुकवून---पळून आलास काय? कुठंही गेलास ह्मणून आमच्या हातून आतां तुझा जीव बचेल कायरे? विंचूरकर, पानपतांत फक्त निराश होऊन तुह्मी माघार घेतलीत, तेवढ्यानं तुमच्या नांवाला काळिमा लागून, देशविघातक मंडळीच्या यादींत तुमचं नांव दाखल झालं! पण परमेश्वरालाच तुमच्या मनाची, तुमच्या विचारांची कींव येऊन, तुमचं खरं स्वरूप जगाला दाखवून देण्याचा हा दुसरा प्रसंग, त्याच कृत्याबद्दल, त्याच लोकांशीं आपण होऊन त्यानं आणून दिला, हा कपिलाषष्ठीचा योग जर या जन्मांत घालवलात, तर मात्र तुमच्यासारखे भित्रे, अवसानघातकी---साऱ्या दुनयेंत कुणी नव्हते, असा शेरा तुमच्या नांवावर बसून, तुमच्या घराण्यांतल्या प्रत्येक पुरुषाला आपली मान खालीं घालून निर्लज्ज स्थितींत सारा जन्म काढावा लागेल. (पाहून) पण हा काय चमत्कार आहे! हा गृहस्थ माझी पाठ ह्मणून बिलकुल सोडीत नाहीं. काय अलिकडं यांची वृत्ति बनून गेली आहे! हिंदुस्थान या विषयावांचून

त्यांना दुसऱ्या कशाचा ध्यासच नाहीं. एक ‘सूड’ याच्याशिवाय यांच्या दृष्टीला दुसरं कांहीं दिसतच नाहीं! पण स्वारी आपल्याशींच कायससं बडबडत आहे. आपण अंमळ नजरेआडच उभं रहावं---(दूर जातात.) (आपल्याशीं विचार करीत दादासाहेब येतात.)

दादा०---ज्या गोष्टीबद्दल जगाच्या उत्पत्तीपासून अगणित उलथा-पालथ उडून गेली असेल, पृथ्वीचा एक बोटभर तुकडासुद्धां रक्तानं भिजल्यावांचून राहिला नसेल, जिच्याबद्दल कोणच्याही तत्ववेत्त्याचा मतभेद सांपडणार नाहीं, जी परमेश्वराची उत्कृष्ट देणगी, माणूस---जनावर---पशू---पक्षी---किडा---मुंगी यांचं जें मुख्य भूषण, किंबहुना सारं जीवित्व, जें राष्ट्राचं मुख्य भाग्य, जी देशाची मुख्य कर्तृत्वशक्ति, अशी जर कांहीं त्या सर्व शक्तिमान् प्रभूनं अजब किमिया निर्माण केली असेल, तर ती फक्त एक स्वतंत्रता! आणखी याच्या उलट सारीं पातकं, सारीं कडक शासनं गाळून त्यांचा जर कांहीं जालीम अर्क त्यानं काढून ठेवला असेल तर तो एक फक्त परदास्य! हाय! हे देवी स्वतंत्रते! अनादिकालापासून, प्रत्येक खरा आर्यपुत्र, तुझी मूर्ति आपल्या हृदयमंदिरांत स्थापन करून तुझा स्तुतिपाठ करीत, तुझ्या सेवेला हात जोडून तत्पर असतांना, वरचेवर त्यांच्या अंतःकरणांतून पळून जाऊन त्यांना निर्जीव कां करतेस! आमच्या गरीब आर्यमातेंत आणि तुझ्यांत असा कोणचा जबरदस्त सवतीमत्सर पडला आहे, ह्मणून तूं नेहमीं, आमच्या आईवर परवशतेचा विषप्रयोग करून तिची संतति अशी रोगग्रस्त करून सोडतेस! बोल, असं मौन धरून, जगांत आमचं हसं करूं नकोस! तुझ्या स्तोत्रांत जर कांहीं अशुद्ध उच्चार आमच्या तोंडून निघत असेल, किंवा तुझ्या आराधनेंत कांहीं न्यून पडत असेल, तर खुशाल सांग. तुझ्याच आमच्यावरच्या पूर्वीच्या कृपादृष्टीनं अजून आमच्या मनोवृत्ति चांगल्या शाबूत आहेत. नाहीं---नाहीं तुला दया येत! हाय! आर्यमाते, अग तूं तरी आपल्या

सवतीचीं आर्जवं कर, ऐक. जगन्नियंत्याची, तुझ्या पूज्य पतीची, आमच्या पालनकर्त्या बाबांची ती पट्टराणी आहे. काय? तूं काय ह्मणतेस? तुह्मी मला कोट्यवधि पोरं असून, मी तिचीं आर्जवं कशीं करूं! तुमच्या मनगटांत जोर असेल तर तिला पकडून आणून द्या माझ्या ताब्यांत, ह्मणजे मी तिला इथं कायमची कैदी करून टाकतें! बरोबर--तुझाही अभिमान रास्त आहे. यापुढं तुझी सारी भिस्त आमच्यावर असणार. पोरं झालीं, ह्मणजे बायका सवतींना जुमानित नाहींत असं ह्मणतात तें खरं. पण पोरं मात्र तशीं अभिमानी पाहिजेत! आमच्यांत अभिमान आहे कां! हाय!!

विं०—काय यांच्या मस्तकांत या वेळेला, अनंत विचारांची लढाई जुंपून राहिली आहे! छे! पण ही फार वेळ चालूं दिली तर या सध्याच्या लढाईला उशीर व्हायचा. हें नाहीं कामाचं. (प्रकाश) रावसाहेब, अभिमान असल्यावाचून कां ही सूड घेण्यापर्यंत मजल आली?

दादा०—सूड-विंचूरकर हा कसचा सूड! असे कैक सूड आह्मीं उगवूं. पण या मुसड्यांनीं आर्यांच्या अंतःकरणांत शिरून, त्यांच्या सद्विचारांचा फितूर पाडून, (उरास हात लावून) या सिंहासनावरून स्वतंत्रता देवीला हुसकून, साऱ्या आर्यावर्ताचा जो सत्यानास करण्याचा पाया घातला आहे, तो जमीनदोस्त होऊन, ज्या दिवशीं अभिमान ही वस्तु हिंदुस्थानांत सांपडते—असं साऱ्या जगाला वाटेल, त्याच दिवशीं आह्मीं खरा सूड घेतला असं ह्मटलं पाहिजे! विंचूरकर, पानपत ज्याच्या पासंगाला पुरणार नाहीं असं रणकंदन आतां माजवून, एका घटकेंत, वैराग्नीच्या ज्वाळा--समशेरीच्या आघाताबरोबर निघणारे विजेचे लोळ—शेषाच्या टाळूला तिडिक आणणारा लत्ताप्रहार—दिग्गजांचं चूर्ण करणाऱ्या मुठींचा तडाखा—काळाचं काळीज फाडणारी गर्जना--रक्ताच्या नद्या—मांसाचा चिखल--हाडांचे पर्वत--जें जें तुह्मीं पुराणांतरीं वाचतां,

त्यांचा प्रत्यक्ष देखावा तुमच्या डोळ्यापुढं उभा करीन! हत्तीच्या गंडस्थळावर चढलेला सिंह, तें गंडस्थळ फोडून त्यांतून वाहणारा मद तर पिऊन जाणारच! अहो अहंमदशहाचा सूड तर आतां हां हां ह्मणतां घेईन! पण विठ्ठलराव, तुह्मी मागं पहा! अहो, या साऱ्या मुसंड्यांना काळाच्या घाणींत एकदम चुरडून—डुनयेंत होते कीं नव्हते असं करून—माझ्या भाऊच्या इच्छेप्रमाणें ज्या दिवशीं स्वतंत्रतादेवीच्या मुकुटावर साम्राज्याचं दिव्य छत्र धरून तिला आपण सुप्रसन्न करूं, त्याच दिवशीं सूड—नुसती सूडाची खरी व्याख्या आह्मा हिंदूंना चांगली समजली आहे असं सिद्ध होणार! तोंपर्यंत कसचा सूड.

विं०—रावसाहेब हें मला समजत कां नाहीं! दुष्ट रोगांनीं सारं अंतरंग कुजून गेलेल्या एखाद्या तोंडापुरत्या गोऱ्यागोमट्या वेश्येप्रमाणं आपली हल्लींची स्थिति आहे हें मी जाणतों; पण अनंत व्याधि एकदम कशा बरं दुरुस्त होतील! आधीं प्रथम त्या रोगांना वाढूं देणारी ही सांथ तर नाहींशी करूंया, मग देतां येतील इतर रोगांना औषधं!

दादा०—वः! या पाण्यांतल्या खेकड्यासारख्या अहंमदशहाला तुह्मीं सांथीची उपमा देतां, यावरून अजून तुमच्या पोटांत कसं धडधड करतं आहे हें मला चांगलं कळलं. इतके भिऊं नका! तुमचा ल्हानसा चाकूसुद्धां ही सांथ नाहींशी करण्याची युक्ति तुह्मांला सांगेल.

विं०—ठीक! एकून मला आपण इतका शूर समजतां! पण माझी गोष्ट असूंदे. घोडा मैदान जवळच आहे, कायतें येईलच दिसून ह्मणा. पण आतां पुढचा विचार सांगा पाहूं काय तो? (राजेबहादूर येतात.)

दादा०---अहो, तुह्मां लोकांच्या लाजा तरी कुठं गेल्या! तुमच्या वाडवडलांच्या, खुद्द तुमच्या तोंडाला अपयशाचं काजळ फासून, आर्य-मातेला--तुमच्या लेकीबाहिणींना उघड्या करून, तुमच्या भाईबंदाच्या प्रेतांचे ढीग रचून, तुमच्या अब्रूला---लौकिकाला---स्वातंत्र्याला कैद करून तुमच्या उरावर नाचत जाणारे हे मुसंडे धडधडीत तुमच्या डोळ्यांपुढं उभे असून, अजून कसले आपल्या बोडक्याचे विचार करतां! तुह्मांला विचार करीतच जन्म काढायचा असेल, तर या मिशा भादरून घ्या संन्यास! आणखी मग बसा खुशाल विचार करीत! आणि याची जर लाज वाटत असेल, तुमच्या अंगांत थोडासा माणूसपणा असेल, तुह्मीं जर अन्नच खात असाल, तर आतां पुढचा विचार या तुमच्या समशेरींनाच विचारा! सरदारहो, आतां दुसरा कसला विचार! हीच ती वेळ! याच वेळेस माझा विश्वास अंबारींतून पडला! इथूनच पानपतांत तुमचं प्रालब्ध फिरलं! तो पहा सूर्यनारायण अगदीं मध्यावर आला. पहातां काय, द्या त्याला बारा तोफांची सलामी, आणखी करा एकदम हरहर महादेव! मी तुह्मांला आज फार तकलीफ देत नाहीं. सामन्याला मैदानांत उभे असलेल्या साऱ्या शत्रूंची खबर घेऊन, प्रत्येकाची छाती फोडून, रक्ताचीं लाखों कारंजीं मी एकटा सुरू करतों! तुह्मीं फक्त जे पळून जातील त्यांना ओढून माझ्याकडं फेकून द्या ह्मणजे बस्स. हा सूड उगवलाच ह्मणून समजा! (एक हुजऱ्या येतो.)

हुजऱ्या---छावणीबाहेर एक वकील उभा आहे. हुकूम होईल तर---

दादा०---अरे, या वकीलांचं एखादं पेव तर फुटलं नाहीं! दर मुक्कामास वकील! राजे, तुह्मीं एकदां या साऱ्या वकीलांना एका कोंडवाड्यांत कोंडून द्या चोरांना पेटवून! दुनया नाडली या गुलामांनीं!

विं०--पण येईनाका. दिला वाटे लावून झालं मोकळं. उगीच कां एखाद्याची अप्रतिष्ठा करावी. जा--जारे सोड त्याला छावणींत. (हुजऱ्या जातो.)

दादा०—अहो पण उशीर नाहीं कां होत! या उन्हाच्या तापानं अहंमदशहाच्या नरडीचं रक्त सुकून गेलं ह्मणजे मग आज कशी तिलां-जली होणार! मी तर चाललों. तुह्मीं बसा आपले खुशाल वकिली करीत. (व० येतो) हा आलाच. हं–बोलरे बोल बोवा कुठला काय ते झपझप. जास्तकम चऱ्हाट असेल ते उद्यां सकाळीं येऊन वळ.

व०—या शेजारच्या छावणींतून अहंमदशहाकडून—

दादा०—बस्स–बस्स! एक चकार शब्द पुढें बोलूं नकोस! माझी तर ही तयारीच आहे. त्याला ह्मणावं, तात्बडतोब आपल्या राज्याची–आपल्या दौलतीची–आपल्या जनानखान्याची कायती व्यवस्था लाव! कृतकर्माबद्दल परमेश्वराची माफी मागायची असेल तर मागून घे! याउपर या जगांत कशाची आशा ठेवूं नकोस! दादानं तुला एवढी फुर-सत दिली, हे त्याचे मोठे उपकार समज! चल जा. ऊठ–ऊठ आधीं.

व०—छे–छे, श्रीमंत दयावंत व्हा. ते आपल्याला शरण आहेत. आपला पराक्रम न समजून त्यांच्या हातून झालेल्या अपराधाची एकवार माफी द्या. त्यांची–त्यांच्या देशाची–त्यांच्या तख्ताची सारी अब्रू, मान जी ही शिक्का कट्यार, ती त्यांनीं आपल्या पायांवर ठेवली आहे. आपल्या पोटचं पोर असं ते—

दादा०—गप–गप. अरे अहंमदशहा, मोठ्या दिमाखानं चंग बांधून हिंदुस्थानांत आलास! हिंदूंच्या उरावर नाचून, हिंदु स्त्रियांच्या अंगाला हात लावून, भाऊ, विश्वास, अप्पा, जनकोजी यांच्यासारख्या निःसीम देशभक्तांच्या मुडद्यांचे ढीग रचून, हिंदूंची अब्रू, मान, स्वातंत्र्य

यांच्यावर विस्तव ठेऊन, साऱ्या हिंदुस्थानाला हाय-हाय लावलीस! आणखी आतां निलाजऱ्यासारखा मला शरण येऊन आपले प्राण वांचवावे ह्मणतोस! थूः! थूः!! लेका तुझ्या तोंडावर! आणखी-(वकलिस) मात्रगमन्या, तूं हिंदु असून त्यांची वकिली करायला आलास! निर्लज्ज!

विं०—हा तर निर्लज्ज दिसतोच आहे. आमचीच मंडळी पुढं करून काम साधून घ्यायची युक्ति त्या लोकांना मोठी नामी साधून गेली आहे. अहंमदशहा मुसलमान वकील पाठवतो कशाला! तो पक्कं जाणून आहे त्याची इथं काय वाट लागेल ती.

दादा०—आणखी हा चोर तरी आतां किती वेळ जगणार आहे! निरोप सांगण्यापुरता या वेळेला याला ठेवला पाहिजे. जा वकील, त्याला ह्मणावं, अनंत जन्म घेऊन तूं जरी क्षमा मागत राहिलास, तरीसुद्धां तुझी दया याउपर कुणालाही यायची नाहीं! तुझीं अनन्वित कृत्यं सहन करून तुला जिवंत सोडण्याइतके हिंदु लोक अजून षंढ झाले नाहींत! तुझ्या नीच कृत्याचं योग्य प्रायश्चित्त, एवढीच गोष्ट, तुला देणगी ह्मणून त्यांच्याकडून आत्तां तावडतोब मिळेल! जा, हाच निरोप! अगदीं अक्षरशः अस्सं सांग! ह्मणावं, जर तूं खऱ्या मुसलमानबीजाचा असशील, तर आतां या दादाशीं सामना दे! खऱ्या लढवय्याचं पाणी तुझ्या अंगांत काय असेल तें आतां दाखीव! या दादाच्या हातून तुझं एक चिटपाखरूंसुद्धां आतां जिवंत सुटणार नाहीं हें पक्कं समजून ऐस! सामन्यांत दादा तुझ्या उरावर बसेल! तुझ्या नरडीचं हाड दातांनीं कडाकड फोडून पुरा-पुरा सूड उगवील! उगवील नव्हे! आत्तां-आत्तां एका घटकेंत उगविणार! वकील, ही पहा, तुझ्या अफगाण बादशहाची शिक्का कट्यार, दादानं जोड्याच्या ठोकरीनं झुगारून दिली. (झुगारून देतो.) अस्सं सांग! जा! मध्यें एक शब्द चोरून पापांत पडूं नकोस! हो चालता!

व०—(जातांना) आतां मात्र अफगाण लोकांचं नशीब खास फुटलं! [मुजरा करून जातो.]

दादा०—सरदारहो, शूर मर्दहो, वकिलांच्या नादांत गुंतवून कदाचित् त्याचा पळून जाण्याचा विचार असेल. उठा, पहातां काय! घाला हात! तुमच्या कुलदेवतेला! आणखी तुमच्या सर्वस्वाचा घात करून पळून जाणाऱ्या या चोरांचीं हाडं चिंबून उभे पेटवून, यांच्या माना चराचर कापून द्या दाखवून हिंदूंच्या सूडाचा मासला! पहा, एक इसम जिवंत सुटला, तर तो परमुलखांत तुमची अपकीर्ति सांगेल! आटपा! घाला झडप! ती पहा तुमची दुःखानं गांजलेली आर्यमाता, तुमचे मर्द हिम्मत-बहाद्दर पूर्वज—पानपतांत गार झालेले भाऊसाहेब, तुमचे सारे देशबंधू तुमच्या कृतीकडं अगदीं डोळे लावून वाट पहाताहेत! थांबा! साऱ्या गोष्टी डोळ्यापुढं उभ्या राहून, संतापानं हें दादाचं शरीर पेटलं! यापुढं इतक्यांत आपली प्रतिज्ञा पुरी करण्यासाठीं, हा दादा, अहंमदशहाच्या छातीवर चढून, त्याचं नरडं, काळीज आपल्या दातांनीं काडकाड फोडतो आहे असंच तुह्मी पहाल! सूड! सूड!! सूड!!!

(सर्व मंडळी हर हर करीत गिलच्यांवर जातात.)

प्रवेश २ रा.

स्थळः—अहंमदशहा याची अटकेवरील छावणी.

पात्रेंः—अहंमदशहा व त्याचे सरदार. (अहंमदशहा आपल्या सरदारास उत्तेजन देत येतो.)

अहंमदशहा०—मेरे बहादुरो! जिसइरादेनें मुझे यंहा लेआया, वो तुह्मारी तलवारोंकी बदौलत पुराहोकर, हंमनें उन जाँबाज और जरी मऱ्हेटोको शिकस्तभीदी! मगर, ये खुदायातआलाको नामंजूर हुवा. और वो चाहताहै, के उनको ऐसी शिकस्तेफाष मिले के फिर कभीं सर न उठावें! तुमनें अभि हमारे एलचीको कह्यते हुये सुनाहै, के हंम

आजीज आये, मेरी कटार और अफगानी सिक्का उनके पैरोपर रखा गया, तोभी राघोबादादा मानतां नहीं. वो नशेयेनखवतमे सरशार होकर अपनी शुजाअतपर बडा ऐटताहै! और साफ कहेताहै, के हंमनें औरतोंकी तऱ्हे उनपर हमलाआवरी कीं. और हिम्मत है, तो मेरा सामना करो! हं, चोर--डाकू--लुटेरे बगैरा बुरेबुरे कलाम अपनी नापाक जबानसे कह्यकर, हंम्मेसे एककोभी जिंदा न छोडेगा, ऐसा ताना करताहै! और रूबरू बहकताहै, के तुमको जभाँ करके खूनआलूदा हातोंसे तुह्मारी औरते और बच्चोंकी मुहपर तमाचे मारूंगा! और तुह्मारी औलादको गुलाम बनावुंगा. ऐ शेर दिलजवानो! ऐ जरी पहेलवानो! अगर तुमको इनबातोंकी कुच शर्म होगी तो तलवारे म्यानसे निकालो! और इस मूर्जीको एकवख्त मौतका मजा चखादो! देखो, वही करना जो तुह्मारे शाँयाहै. तुह्मारी कौमके बूढो--तुह्मारे मुल्क वो तख्त, तुह्मारी औरेत, और तुह्मारे पाक मजहब, इस सबकी कुचभी तुमको गैरत या पासदारीहो, तो फौरन बढो! और शमशेरे आबदार दुष्मनपर ऐसी चमकावो, के तुह्मारानाम जवाँमर्दीके दफ्तरकी पहिली सतरमे लिखा जाय! और उस सुजाअतका नमुना दिखादो, जो आरबके खूनका नतिजाहै! और इस्लामके गोदमे पलीहै! हमारे लाखो लोग पानिपतमे काम आचुके! और गोहंम हमारे मुल्खको जाये, ताहंम एकरोज मरनाहै! दुष्मनके नाशायस्ता कलाम सुनकर, मुकाबिलेको बुलाते हुये पीटदिखाना, जवाँमर्दीका मूह सियाह कर लेना है! इस्से बेहेत्तरहै, के यंही मरजाय! या ऊस मुतकबिर दादाका सर नेजेपर चढाकर खूसीसे आपने मुल्खको चले जाये! दुनयामे आकर नाम कमाव! या जान गमाव! (तोफा होतात) सुनो, तुमको चौंकाकर हुशियार होनेके लिये गनीमने तोफे दागी देखो, अलम इस्तादा कियागया! निकले, फौरन घुसकर पानिपतकी याद दिलादो! अगर तुममे हिम्मतेमर्दाना, और जैारेबाजू न हो, और आपना रू सियाह करना चाहतेहो, तो पहिले मुझे कत्तल करो!

प० सरदार—क्या कह्यते शहासाहेब! क्या हिंदुस्थानमे आब्रु खाकमे मिलानेको हं आये हैं! जानगई तो मुजायका नहीं! मगर मुल्ककी इज्जत हरगीज न जाने देंगे!

दु० सरदार--ये क्या बडी बातहै! एक आनमे उस नालायखको रोते पीटते वापिस भेजदेंगे! भाऊसाहेबनें क्या बालबीका किया, तो अब ये कुच करेगा! मालुम होताहै के उसकी कजाने उसे यंहा खिच ले आयाहै!

अहंमदशहा०--ऑफरी! ऐ मर्दो, तुह्मोर इस मर्दाना कालामने मुझको ऐसी हिम्मत दिलाई, के मुझमे एक हातींकी ताकद आई! देखो, आये, मिसले शेरके यकाक इन गोसफंदोंपर झपटो.

(दीन दीन करीत जातात.)

प्रवेश ३ रा.

स्थळ०—अटकेची समरभूमि.

पात्रे:—श्रीमंत रघुनाथराव दादासाहेब; अहंमदशहा अबदाली; विंचूरकर; राजेबहादर; जयवंतराव (होळकराचा सरदार) व उभय पक्षांकडील मर्द वगैरे. (होळकरांचे सरदार जयवंतराव मोठ्या लगबगीनें आपल्या पथकानिशीं प्रवेश करतात.)

जयवंत०—शूर मर्दहो, आजपर्यंत श्रीमंत धनीसाहेबांना न समजूं देतां त्यांच्या छावणीबरोबर ज्या प्रसंगासाठीं आपण मजला मारीत आलों, तीच ही सुभेदार साहेबानीं सांगितलेली वेळ! तुह्माला अमूक करा ह्मणून सांगण्याची ही वेळ नव्हे! बस्स, फक्त एवढंच लक्षांत ठेवा, कीं सुभेदार साहेबांची अब्रू गेली, ती तुमची गेली! अहंमदशहाच्या फौजेंत इतक्या मजेनं घुसून कत्तल उडवा, कीं खासा स्वारींना अखेरपर्यंत त्याचा पत्ता लागूं नये! ऐका! (हरहर महादेव अशा गर्जना

होतात.) ही सलामी झडली! झाली---घनचक्कर उडाली! पहा, पानपत--दुसरं पानपत पसरलं! तो पहा महाकाळ हांका फोडीत चालला प्रळय करीत! नुसतीं लिंबं---लिंबं उडवतोय! शाबास! शाबास दादासाहेब! आर्यवीरांच्या जलाल समशेरीचं खरं प्रदर्शन आज तुह्मी उघडलंत! हाच सामना! हाच सूड! लागले, लागले पळायला सैरावैरा शहाचे लोक! अहाहा! तो पहा, श्रीमंतानीं आपला घोडा नेमका अहंमदशहाच्या तोंडावर फेकला! चला, द्या लगाम सोडून! घोड्यांना इतकी जोरानं टांच द्या, कीं श्रीमंत येऊन भिडतात न भिडतात इतक्यांत या चोरांची तळी उचलून, अहंमदशहाचं शिर त्यांच्या पायापुढं ठेवून, ठोका मुजरे! आणखी दाखवा होळकरशाहीची राजनिष्ठा! जय मल्हारी!!

(हरहर करीत सैन्यांत घुसतात.)

(अफगाण लोक सैरावैरा धांवत येतात.)

प॰—हॅं, ये आदमी है—या आफते अस्मानी है! जो हमारी बीखवोबुनियाद नाबूद करनेके लिये नाजील हुयी है! हाय! खुदाया! बचा ले!

(राजेबहाद्दर धांवत येऊन)

राजे॰—चला, देवाकडंच चला! ह्मणजे तो तुह्मांला रौरवनरककुंडांत झांकून ठेऊन तुमचा चांगला बचाव करील! [त्या शिपायांची कत्तल करितात.] पाठवतों आतां साऱ्यांनाच तुमच्या अल्लाकडे एकदम! सूड! (जातात.)

[दुसरा शिपाई येतो.]

दु॰—खुदाया! हमे किले नहीं चाहिये, ठानोकी जुरूरत नहीं, और हिंदुस्थानके तर्फ हम कभी नजर उठाकर न देखेंगे. मगर, इस शैतानके चुंगलसे रिहाई दे!

(विंचूरकर धांवत येतात.)

विं०—नको कसा! अरे हा घे हिंदुस्थानचा प्रसाद! (त्याची कत्तल उडवतात.) पळतोस नाहीं कां! शाबास! वाहवारे मर्द! उडवा! (हरहर करीत जातात.)

(तिसरा शिपाई येतो)

ति०—देखो आया! दर्यामे कुँतकर अपनी जाने बचावो. हाय खुदा! किसवास्ते हंपर इतना कहेर करतां है!

(जयवंतराव धांवत येतात)

जयवं०—अरे, तुमच्याच कृतीचं प्रायश्चित्त! अगदीं आतां सव्याज माप घ्या! यंरे दिलदार! ढीगाचे ढीग द्या लोटून एकेका आहुतीला! (कत्तल करून हरहर करीत जातात.)

(चवथा शिपाई धांवत येतो)

च०—हाय! ये तमाम दुनयाको डुबो देगा! फिर हं क्यंकर जी सकते है! खुदाया, हमारी मदत कर!

(विंचूरकर धांवत येतात.)

विं०—आला, आला खुदा मदत करायाला! (कत्तल उडवितात.) ही घे मदत! शेफरलात नाहींरे! निःशस्त्र लोकांची कत्तल करून, त्यांच्या प्रेतांचे ढीग रचतांना कशी हौस वाटली! पर्वत--पर्वत पाडतों चोरानों तुमच्या मुंड्यांचे आतां!

(हरहर करीत जातात.)

(अहंमदशहा अबदाली येतो.)

अहंमदशहा—हाय! मेरे अकसर सिपाई कतल होगये (रडूं लागतो.) हंमेसे एकभी जिंदा नहीं रहेता, जो इस अखीर हालतके मुल्कमे जाकर बयान करे! हाय! जिसतरफ मेरे प्यारे लडके, सैंकडो सरदार, लाखो सिपाई गये, उसीतरफ मुझकोभी जाना चाहिये.

वरना सब दुनिया मुझको बदनाम करेगी! हाय! देखो मौत अपना कब्जा करनेकोहै! इलाही! बचा!

(पळून जाणार इतक्यांत दादासाहेब येऊन त्याला धरतात.)

दादा०—अरे! थांब—थांब! हिंदुस्थानची अब्रू घेऊन, या काळाच्या दाढेंतून सुटून पळून जातोस! पण जाशील कुठं! (अहंमदशहास पालथा पाडून दादासाहेब त्याच्या उरावर बसतात.) अहंमदशहा! माझ्या पवित्र आर्यमातेला भ्रष्ट करून, माझ्या पूज्य आर्य भगिनींची नालस्ती करून, या माझ्या कृतांतासारख्या पिढीजाद शूर आर्यबंधूंच्या शुभ्र कीर्तीला कलंक लावून, जगद्वंद्य आर्यधर्माची थट्टा करून, माझ्या पाठच्यापोटच्या पोरांची कत्तल करून पळून जातोस! हिंदुस्थान ह्मणजे तुला काय वाटलं? हिंदुलोक ह्मणजे तूं कोण समजलास? कायरे! अं! (तोंडांत भडकावून.) या तुझ्या वस्ताद कर्दनकाळ--सैतान राघुभराऱ्याला विसरलास!

अहंमदशहा--श्रीमंत, श्रीमंत--

दादा०—गप! गप! एक शब्द—नुसतं तुझ्या देवाचं स्मरण करूं देण्याइतकी सवड द्यायला मला फुरसत नाहीं! कारण, ते पहा! माझं भीमकर्म पहाण्यासाठीं मोठ्या कौतुकानं विमानांत बसून आलेले माझे पूर्वज कंटाळून परत जाऊं लागले! हे सुरासुरहो! हे आकाशस्थ देवतांनो! छत्रपतिमहाराज! बाबा! आप्पा! भाऊराया! थांबा, आतां एक निमिष वांया जाणार नाहीं! हे पंचमहाभूतांनो! तुह्मीं साक्षीला उभे रहा! तुमच्या समक्ष, आर्यमाता-आर्यभगिनी-आर्यधर्म यांचा छल करणाऱ्या या चोराच्या, आर्यपुत्रांच्या नांवाला काळोखी लावून पळून जाणाऱ्या या भामट्याच्या, साऱ्या आर्यावर्ताला पिळून, माझ्या निराधार आर्य बंधूंच्या माना चराचर कापणाऱ्या या खाटकाच्या नरडीला, पानपतांत गार झालेल्या नरवीरांना याच्या ताज्या–उन्हुनीत रक्ताची तिलांजुळी

देण्याकरितां, हिंदुपदपादशाहीच्या या नोकरानं–श्रीमंत बाजीराव साहेबांच्या शुद्ध उत्पत्तीपासून उत्पन्न झालेल्या या रघुनाथानं–आपल्या प्रतिज्ञेंतला प्रत्येक शब्द–शब्द खरा करण्यासाठीं, हा पेशकब्ज लावला पहा! सूड! सूड!! सूड!!! (अहंमदशहाच्या नरडीस पेशकब्ज लावतात) अरेरेरे! एक शब्द विसरला! हें हाड दातांनीं काडकाड फोडून, याच्या रक्ताचे घुटके–घुटके घेतले पाहिजेत! सूड! सूड!! सूड!!! (रक्त पिणार इतक्यांत रणजितसिंग शीक व इतर सर्व सरदार धांवत येतात.)

रणजितसिंग—(दादासाहेबास मागें ओढून) हां-हां हां! 'मुसलमानांचें रक्त पिऊन ब्राह्मणपणा बुडवायचा आहे कीं काय?' सूड पुरा उगवलात! आतां यांत काय उरलं आहे! रावसाहेब, शांत व्हा! जरा शांत व्हा!

दादा०—(रणजितसिंगाकडे रागानें पहात) काय! सूड झाला! अरे सूडाचं मुख्य काम तर अजून व्हायचं आहे! सरदारहो, पहातां काय! त्या माझ्या साक्षात् सूर्यावतार भाऊला, गिलच्यांचा पुरा सूड उगवून पानिपतचा योग्य मोबदला तुह्मी दिलांत, एवढं कळण्यासाठीं बाराशें तोफांची सलामी द्या! आणखी, या चोरांच्या हाडांचे अटकेवर बुरूज रचून, त्यांच्यावर हिंदुपदपादशाहीचे भगवे झेंडे--जरीपटके द्या दिगंतरांत फडकावून! तोपर्यंत, मी–स्वतः, दरींखोरीं--वाळवंट--डोह यांत कुणी छपून बसला आहे कीं काय याची खात्री करून घेतों! सूड! (हरहर करीत जातात.)

सर्व०—धन्य! धन्य बाजीरावसाहेब आपली स्वदेशाचा संताप नाहींसा करणारी संतति!! (महाराष्ट्रसिंह गर्जना करीत जातात, तोफांची सरबत्ती होते.)

समाप्त.